# माणूस

शनिवार
१० डिसेंबर १९७७
७५ पैसे

व्यापाऱ्यांनी मंत्र्यांना हाताशी धरले.
एका चांगल्या योजनेचा
गळा घोटला गेला.

□ □

तिरपुडे संतप्त झाले.
'पुरोगामी' मोहिते हतबल आहेत.

□ □

'त्या बाळराजांना सांगा
घेऊन बसा तुमचा तुम्ही महाराष्ट्र!'

□ □

मंत्रिमंडळ शरण जाते.

□

जनता पक्ष स्वस्थ आहे.

□

माहितगार

साप्ताहिक माणूस

वर्ष सतरावे–अंक अठ्ठावीस

१० डिसेंबर १९७७

मूल्य पंचाहत्तर पैसे

# दादांचे मंत्रिमंडळ व्यापाऱ्यांना अखेर असे शरण गेले !

माहितगार

आदिवासी भागात एकाधिकार पद्धतीने खरेदी–विक्रीचे व्यवहार करण्यात येत आहेत. ही योजना रद्द करू नका, या योजनेत आदिवासीचे हित आहे, हे सांगण्यासाठी आदिवासीची शिष्टमंडळे आदिवासी कल्याण-मंत्री नाशिकराव तिरपुडे यांना पंचवीस नोव्हेंबर १९७७ रोजी भेटली. शिष्टमंडळा-बरोबर तिरपुडे यांची चर्चा झाली त्यावरून महाराष्ट्र मंत्रिमंडळातील मंत्री एकमेकां-वर कसे तुटून पडत असतात याचे आणि महाराष्ट्राच्या राजकारणाचेही दर्शन घडते. मंत्रिमंडळ पूर्णपणे पोखरले गेले असून त्याच्या हातून व्यापारी–दलाल आदी हितसंबंधितांचे राजकारण कसे खेळले जात आहे यावरही प्रकाश पडतो. एकाधिकार म्हटला की काही जणाचा पोटशूळ उठतो. हा पोटशूळ काँग्रेस-वाल्यांच्याच पोटात उठतो असे नव्हे जनता पक्षवाल्यांच्याही पोटात उठतो ! जनता पक्ष व काँग्रेस यांच्यात मला तरी कसलाच फरक वाटत नाही. जनता पक्षाने तीस वर्षांच्या सत्तेतील काँग्रेस पक्षाची मक्तेदारी मोडली; परतु पिळवणूक करणाराची मक्तेदारी मोडून काढण्यात जनता पक्षाचे सरकार फार काही करू इच्छित नाही. काँग्रेस पक्ष जनता पक्षा-वर तो प्रतिगामी असल्याची टीका करीत आहे. महाराष्ट्रात यशवंतराव मोहिते यांनी जनता पक्षाचे प्रतिगामित्व उघडे करून दाखविण्याची भूमिका घेतली आहे. त्या भूमिकेचे स्वागतच करायला हवे; पण मोहिते ज्या मंत्रिमंडळातील एक सदस्य आहेत त्या महाराष्ट्रातील काँग्रेस सरकारचे प्रतिगामित्व लपवून ठेवून ही भूमिका पार पाडण्यास जाणे दांभिकपणाचे ठरेल ! जनता पक्षाच्या केंद्र-सरकारने घेतलेल्या भूमिकेमुळे एकाधिकार-कापूस खरेदी योजना धोक्यात आली आणि महाराष्ट्र सरकारने या परिस्थितीचा फायदा घेऊन चांगल्या योजनेचा गळा घोटला. या प्रकरणी केंद्रावर ठपका ठेवण्यास जागा तरी आहे; पण आदिवासी योजनेचे काय ? व्यापारी–दलाल याच्याकडून आदिवासीचे शोषण होते; ते थांबविणारी आदिवासी योजना रद्द करा असा आग्रह केंद्राने धरलेला नव्हता. **मग महाराष्ट्र सरकार या योजनेचा गळा का घोटीत आहे ?** महाराष्ट्र सरकार हे कृत्य करण्यास धजावत आहे ते कोणामुळे ? पिळल्या गेलेल्या आदिवासीमुळेच की आदिवासीचे शोषण करणाऱ्या व्यापाऱ्यां-मुळे ? याचे उत्तर महाराष्ट्रातील पुरोगामी मत्र्यानी दिले पाहिजे किंवा उत्तर न देताही आदिवासीचे कल्याण करू पाहणारी योजना चालू ठेवण्याची जबाबदारी तरी त्यांनी पार पाडावी.

आदिवासीची व्यापारी–दलाल याच्या तावडीतून सुटका व्हावी म्हणून महाराष्ट्र सरकारने आदिवासी भागातील त्यांच्या मालाची खरेदी–विक्री व्यापाऱ्यानी करण्यास बंदी केली. त्यामुळे सुरुवातीला पणन महासघा-मार्फत व पुढे आदिवासी विकास महामंड-ळाच्या वतीने आदिवासी भागात आदि-वासीच्या मालाची खरेदी सुरू झाली त्यामुळे आदिवासीच्या मालाला तिप्पट–चौपट भाव मिळू लागले आणि व्यापाऱ्याच्या मगरमिठी-तून हळू हळू सुटका होऊ लागली. या योजने-नुसार आदिवासीचा केवळ मालच खरेदी केला जाणार होता असे नव्हे. आदिवासी भागातील सहकारी सस्थाही आदिवासीनीच चालवायच्या होत्या आदिवासी योजनेचे हे स्थूलमानाने स्वरूप होते. व्यापारी आदि-वासीची वरई चार ते बारा आणे किलो या भावाने खरेदी करत त्या वरईसाठी योजने-

सपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे
¤
वार्षिक वर्गणी :
**चाळीस रुपये**
¤
प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.
¤
राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यानी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच सस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.
¤
**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव पेठ,
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०
¤
दूरध्वनी : ४३४५९
¤

मुळे आदिवासीला दोन-अडीच रुपये किलो हा भाव मिळू लागला नाशिक जिल्ह्यातील पेठ-सुरगणा तालुक्यात आदिवासीचे चागल्या प्रतीचे भात चाळीस रुपये क्विंटलप्रमाणे व्यापाऱ्यानी तवार होण्यापूर्वीच खरेदी करून टाकले होते. या भाताला एकशेवीस रुपयावर भाव सरकारी खरेदीमुळे मिळाला. पुणे जिल्ह्यातील आबेगाव-जुन्नर येथील आदिवासीना अकरा ऑक्टोबर १९७७ पासून नोव्हेंबर अखेरपर्यंत महिन्याभरात त्याच्या हिरडा आदी मालाबद्दल दहा लाख रुपयाची किंमत मिळाली. एवढे भाव आदिवासीनी आपल्या आयुष्यात कधीच पाहिले नव्हते! शकरराव चव्हाण यांना कॉंग्रेसजन संकटराव म्हणत होते. त्या काळात शंकरराव चव्हाण मुख्य मंत्री असताना त्यानी ही योजना प्रयोग म्हणून सुरू केली होती. धुळे जिल्ह्यातील नवापूर व अमरावतीमधील मेळघाट या दोन तालुक्यात शकररावांनी प्रयोग म्हणून ही योजना लागू केली. दोन्ही तालुक्यात अनुभव चागला आला तर ही योजना राज्यातील सर्व आदिवासी भागांना लागू करण्यात येणार होती.

आदिवासीचे दुर्भाग्य संपलेले नाही. दीपावळीच्या नोव्हेंबर महिन्यातच सरकारने लेखणीच्या एका फटकाऱ्याने व्यापाऱ्यांच्या दबावाला बळी पडून आदिवासीचे आशेचे दीप मालवून टाकले. ही योजना रद्द करा असे केंद्राने सांगितलेले नसताना महाराष्ट्राच्या पुरोगामी सरकारने ही योजना रद्द का केली? व योजना रद्द होऊ नये म्हणून एकोणचाळीस मत्र्यांपैकी किती मंत्र्यानी आटापीटा केला? किती मंत्र्यांनी व्यापाऱ्याची बाजू मांडली? व्यापाऱ्यांची बाजू मांडण्यामागचे कारण काय? हे सारे पुरोगामी कॉंग्रेसजनासाठी तरी बाहेर आणले गेले पाहिजे. १९७६ च्या महाराष्ट्र जनजाती आर्थिक परिस्थिती सुधारणा कायद्याच्या प्रामुख्याने पुढीलप्रमाणे तरतुदी आहेत

( १ ), ९ ऑक्टो. १९७६ पर्यंत ज्या आदिवासीनी सावकाराची कर्जे काढली असतील त्याची कर्जे पूर्णपणे माफ होतील. ( २ ) आदिवासी भागात सरकार वगळता इतराना व्यापार करता येणार नाही. ( ३ ) आदिवासी भागातील सहकारी सस्था आदिवासी चालवितील व ( ४ ) खासगी सावकाराना सावकारी करण्यास बदी करण्यात येईल. आदिवासी भागात इतराच्या सहकारी सस्था असल्या तरी त्या या कायद्यामुळे आदिवासी संस्थात विलीन करावयाच्या होत्या. ही तरतूद राजकारणाच्या मुळावर उठली तर व्यापाऱ्याचे कुरणच संपले! त्यामुळे राजकारणी व व्यापारी याचे सगनमत झाले. शकरराव चव्हाण मुख्यमत्री होते तोपर्यंत या दोन्ही हितसबधितांची मात्रा चालली नाही. नेतृत्वात बदल झाला आणि या सगनमताची चलती सुरू झाली. मुख्यमंत्री वसतराव पाटील यांनी सर्वांना बरोबर घेऊन जाण्याचे धोरण ठेवले. साहजिकच या धोरणामुळे एकामागून एक सवलती मिळू लागल्या

## नवापूरचे उदाहरण

खरेदी-विक्रीचे, तसेच सावकारीचे व्यवहार बद झाल्यामुळे व्यापाऱ्याचे हितसबंध कसे दुखावले गेले, याची सविस्तर चर्चा करण्याची आवश्यकता आहे असे मला वाटत नाही. ते लगेच समजू शकते. राजकारणी या योजनेच्या मुळावर का उठले हे पाहणे आवश्यक आहे. त्याकरिता प्रयोग म्हणून सुरू केलेल्या धुळे जिल्ह्यातील नवापूर तालुक्यात सहकारमत्री शिवाजीराव पाटील यांचे शिरपूर हे गाव येते. योजनेनुसार आदिवासी भागातील सहकारी संस्था आदिवासीच्या संस्थेमध्ये विलीन करावयाची होती आणि आदिवासीची सस्था आदिवासीनीच चालवायची होती. कायद्यातील या तरतुदीमुळे शिरपूर येथील सस्था आदिवासीनीच चालविणे क्रमप्राप्त झाले. या व अशासारख्या सस्थामार्फत ज्या व्यक्ती जिल्हा सहकारी बॅंका, मध्यवर्ती बॅंका हे याचे पदाधिकारी बनले होते ते आपल्या या पदांच्या जोरावर राजकारण करीत. जिल्हा बॅंका किंवा मध्यवर्ती बॅंका याच्यावर जाण्याची शिडीच आदिवासीच्या ताब्यात गेली तर आपल्या स्थानाचे काय? हा विचार राजकारण्यांपुढे आला आणि त्याचे राजकारण सुरू झाले. व्यापाऱ्यानी असे राजकारणी, त्या भागातील मंत्री याना जवळ केले. त्याच्या कारवाया सुरू झाल्या. सहकारी सस्थानातील आपले स्थानच उखडून टाकणारी कायद्यातील तरतूद अंमलात येऊ नये याकरिता प्रयत्न करण्यात आला. आदिवासीच्या सस्थेत त्या भागातील सस्था विलीन करण्याची तरतूद जून १९७७ मध्ये काही भागाकरिता स्थगित करण्यात आली मत्र्यानेच ही स्थगिती मिळविली. कायद्याच्या एखाद्या कलमाला स्थगिती देण्यामागे काय कारण होते? तीही काही भागातच! मंत्रीमहाशयाचे स्थगितीमुळे समाधान होण्यासारखे नव्हते. त्यापुढची पायरी गाठण्यात आली. आदिवासी एकाधिकार योजनेतून नवापूर तालुकाच तेवढा वगळावा याकरिता प्रयत्न सुरू झाला. **नवापूरमधून ही योजना रद्द करण्यासाठी व्यापारी व त्या भागातील एका खासदाराने सरकारकडे निवेदन पाठविले आहे. या निवेदनांची भाषा एक आहे. एकाच टाइपरायटरवर ते टाइप केले आहे. इतकेच नव्हे तर दोघांच्याही निवेदनांत झालेल्या चुकाही एकसारख्याच आहेत. या एकाच गोष्टीवरून व्यापाऱ्यांनी कोणाला हाताशी धरले आहे, ते स्पष्ट होते. एकटा नवापूर तालुकाच योजनेतून का वगळावयाचा तेही स्पष्ट होत नव्हते.**

सप्टेंबर अखेरीस मत्रिमंडळाची बैठक भरली. तीमध्ये या योजनेसबंधी विचार करण्यात आला. तेव्हा आदिवासी कल्याणमंत्री नाशिकराव तिरपुडे व इतर मत्री यांच्यात शाब्दिक चकमक झडली. त्यानंतर या प्रश्नावर चकमकी झडतच राहिल्या आहेत. 'पश्चिम महाराष्ट्रात या कायद्याची काय वाट लावायची असेल ती खुशाल लावा, विदर्भात आम्ही या कायद्याची अमलबजावणी केल्याशिवाय राहणार नाही!' असे नाशिकराव तिरपुडे यानी सप्टेंबरच्या अखेरीस झालेल्या बैठकीत सहकारमत्री शिवाजीराव पाटील, गृहराज्यमत्री रमेश वळवी यांना उद्देशून म्हटले. तिरपुडे याची ही अक्षरशः एकाकी लढत चालली आहे. ते हितसंबधितापुढे हतबल ठरले आहेत. योजनेतून नवापूर तालुकाच वगळला तर त्यामागचे राजकारण उघडे पडणार होते. म्हणन सरकारने शक्कल लढवली. येथे सरकारचा सबध येत असल्यामुळे 'शक्कल' हा शब्द वापरावयाचा! एखाद्या सामान्य माणसाने अस

प्रकार केला असता तर 'शक्कल' या शब्दाऐवजी 'बनवाबनवी' केली हाच शब्द चपखल बसला असता ! नवापूर वगळण्यासाठी ही योजना सात तालुक्यांत लागू करण्याचा निर्णय घेतला. कायद्याची व्याप्ती दोनऐवजी सात तालुक्यापर्यंत वाढवत आहोत, अशी मखलाशी करत सरकारने नवापूर तालुका कायद्यातून अलगद वगळला. तिरपुडे यांनी चार ऑक्टोबर १९७७ रोजी पत्रकार परिषद घेतली. 'आदिवासींचे शोषण थांबवणाऱ्या आदिवासी एकाधिकार खरेदी–विक्री योजना आम्ही आता ११ ऑक्टोबरपासून सात तालुक्यांत लागू करत आहोत. आतापर्यंत ही योजना दोन तालुक्यांत लागू करण्यात आली होती. तिचे क्षेत्र आणखी वाढवले जात आहे.' असे तिरपुडे यानी या पत्रकार परिषदेत सांगितले व या तालुक्यांची नावे जाहीर केली. पेठ–सुरगणा (नाशिक), आबेगाव–जुन्नर (पुणे), मेळघाट–गडचिरोळी (अमरावती) व सिरोंचा (चंद्रपूर) अशी सात नावे तिरपुडे यानी जाहीर केली. 'ही योजना प्रयोग म्हणून सुरू केली तेव्हा नवापूर तालुका त्यामध्ये होता आणि योजनेची व्याप्ती इतर ठिकाणी वाढवत असताना नवापूरला का वगळण्यात येत आहे ?' असा प्रश्न तिरपुडे यांना मी विचारला तेव्हा त्यांनी प्रथम उत्तर देण्याची बरीच टाळाटाळ केली होती; परंतु बऱ्याच छेडाछेडीनंतर, '**नवापूर तालुका योजनेतून वगळण्याचा निर्णय राजकीय आहे. ही योजना या तालुक्याला लागू करू नये म्हणून हितसंबंधितांनी प्रयत्न केले आहेत. हितसंबंधितांची लॉबी तयार झाली असून ती मी मोडून काढणार आहे.**' असे तिरपुडे यांनी मोठ्या आत्मविश्वासाने सांगितले होते. '**तुमच्या मांडीला मांडी लावून हे हितसंबंधित बसलेले आहेत !**' असे मी म्हणालो, तेव्हा तिरपुडे यांनी हसत हसत '**तुम्ही म्हणता ते खरे आहे !**' असे उद्‌गारही काढले होते.

नवापूर तालुका योजनेतून वगळण्यात यश आल्यानंतर हितसबंधित व त्यानी हाताशी धरलेले राजकारणी आणखी चटावले. ज्या सात तालुक्यांमध्ये योजना लागू करण्यात आली होती त्या सातही तालुक्यांमधून योजना हाणून पाडण्याचे प्रयत्न सुरू झाले. तिरपुडे यानी पत्रकार-परिषदेत निर्णय सांगितल्यानतर बरोबर महिन्याने सरकारने ही योजनाच रद्द करण्याचा निर्णय घेतला आणि तो लपवून ठेवून त्याची अंमलबजावणी सुरू केली.

## संतप्त तिरपुडे

तीन नोव्हेंबर १९७७ रोजी रात्री नागपूर येथे मंत्रिमंडळाची बैठक भरली. या बैठकीत आदिवासी भागात एकाधिकार तत्त्व लागू करण्याचा निर्णय बदलला गेला. हा निर्णय घेतला त्याच्याआधीच एक–दोन दिवस विधानसभेने पहिल्या कायद्यात दुरुस्ती केली. एखाद्या भागात ही योजना लागू करण्याचे किंवा ज्या भागात योजना लागू करण्यात आली आहे त्या भागातील योजना रद्द करण्याचे अधिकार, सरकारकडे देण्याची दुरुस्ती कायद्यात करण्यात आली. यामुळे सरकारला योजना रद्द करण्यासाठी कायदा घेऊन विधानसभेपुढे येण्याची आवश्यकता राहिली नव्हती. कोणत्याही क्षणी योजना रद्द करण्याचे अधिकार सरकारकडे एकवटले गेले. याचा धोका किती जणानी ओळखला होता ? हेही काहीच नाही. **दुरुस्त केलेल्या विधेयकाला राष्ट्रपतींची संमती मिळाल्यानंतरच त्याचे कायद्यात रूपांतर होते व तो अस्तित्वात येतो. २७ नोव्हेंबर १९७७ पर्यंत राष्ट्रपतींनी दुरुस्ती विधेयकावर सही केलेली नाही. ही सही होण्यापूर्वीच महाराष्ट्र सरकारने कायद्याला मंजुरी मिळाली आहे असे समजून ३ नोव्हेंबर १९७७ च्या बैठकीत सात तालुक्यांतील योजना रद्द करण्याचा निर्णय घेतलेला आहे. कायद्याला राष्ट्रपतींची मंजुरी मिळण्यापूर्वीच व्यापाऱ्यांच्या तोंडात आदिवासींना देण्याचा निर्णय घेतला हे कळू नये, म्हणून सरकारने तो जाहीर केलेला नाही; पण योजनेची अंमलबजावणी मात्र थांबली आहे. ती थांबवण्याचे आदेश नागपूरहूनच देण्यात आले होते.** ३ नोव्हेंबर रोजी मंत्रिमंडळाने निर्णय घेण्यापूर्वी मुख्यमंत्री वसंतराव पाटील याच्याकडे राज्यातील आदिवासी भागामधील व्यापाऱ्याची शिष्टमंडळे एस्. टी., ट्रकमधून भरभरून गेली होती.

नागपूर येथे ३ नोव्हेंबर रोजी रात्री झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीतही नाशिकराव तिरपुडे अतिशय सतापाने बोलले. मुख्य मंत्री वसतराव पाटील याना उद्देशून तिरपुडे म्हणाले, '**हा प्रश्न (आदिवासी योजना) राजकीय आहे व तो राजकीय म्हणूनच सोडवला पाहिजे. आपला पक्ष व्यापाऱ्यांच्या मगरमिठीत आहे. त्यांच्या मगरमिठीतून पक्षाला सोडवता येत नसेल तर दादा, आपण आदिवासींना व्यापाऱ्यांच्या मगरमिठीतून कसे सोडवणार आहोत ?**' यशवंतराव मोहिते यांचा या योजनेला पाठिंबा आहे; पण आपल्या सरकारचे धोरण पाहून ते हतबल झाले आहेत. 'सिनिक' बनले आहेत. तिरपुडे एकटेच मंत्रिमंडळाच्या बैठकीत आदिवासींची बाजू मांडत होते. अर्थात त्याचा काहीही उपयोग होणार नव्हता ज्या नवापूर तालुक्याला योजनेतून वगळण्यात आले त्या तालुक्यात आदिवासींच्या दहा सोसायट्या आहेत. त्यापैकी आठ सोसायट्यानी ठराव करून योजना नवापूरला लागू करावी अशी मागणी केली आहे. मंत्रिमंडळाच्या बैठकीत ( ३ नोव्हें. ) तिरपुडे यांनी याही गोष्टीचा उल्लेख केला तेव्हा **गृहमंत्री रमेश वळवी म्हणाले, 'या ठरावावरील सह्या खोट्या आहेत !' वळवींच्या विधानाने तिरपुडे आणखीनच संतापले. तिरपुडे दादांना म्हणाले, 'दादा, तुमच्याकडे व्यापारी येतात. आमच्याकडे आदिवासी येतात. हा तुमच्या आमच्यामध्ये फरक आहे !'**

## बाळराजांचा विरोध

एकाधिकार खरेदी योजना आपल्या हिताची कशी आहे याची कल्पना व अनुभव आदिवासींना येत आहे.त्यामुळेच त्यांची शिष्टमंडळे सरकारकडे येऊ लागली आहेत. २५ नोव्हेंबर १९७७ रोजी पुणे जिल्ह्यातील आदिवासींचे एक शिष्टमंडळ तिरपुडे याना भेटले. पुणे जिल्हा आदिवासी उपयोजनेचे उपाध्यक्ष चिंतामणराव मोरमारे यांच्या नेतृत्वाखाली आदिवासींचे शिष्टमडळ तिरपुडे यांना भेटले. तेव्हा तिरपुडे म्हणाले, 'योजना रद्द करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला असल्याने तुम्ही मुख्यमंत्र्यांना भेटणे योग्य ! मी तुमच्या बाजूचाच आहे. आदिवासी योजनेच्या प्रश्नावर मी मंत्रिमंडळाचा राजीनामाही देण्यास तयार आहे !' हे शिष्टमडळ पुण्या-

पृष्ठ ३२ वर

# अवती - भवती

शरद कृष्णन्

## □ दिवस चौकशी कमिशनचे

एक एप्रिलला केंद्रीय गृहमंत्र्यानी लोकसभेमध्ये तीन चौकशी आयोग नेमण्याची घोषणा केली आणि घोषणेप्रमाणे तीन आयोग नेमले जाऊन कामाला प्रारंभ झाला या विविध आयोगापैकी सर्वांत महत्त्वाचा आयोग अर्थातच शहा आयोग...

आणीबाणीतील अत्याचाराची चौकशी करण्यासाठी नेमण्यात आलेल्या या एक सदस्य चौकशीमंडळाच्या रोज प्रसिद्ध होणाऱ्या कामकाजवृत्तामुळे शहा आयोगाच्या अहवालाबाबत आणि न्यायमूर्ती शहा यांच्याबद्दलही सर्वसाधारण नागरिकामध्ये विलक्षण उत्सुकता आहे ही उत्सुकता लक्षात घेऊन सर्व इंग्रजी व प्रादेशिक दैनिकानी अगदी पहिल्या पानावरील ऐसपैस जागा शहा आयोगासाठी राखून ठेवली. आकाशवाणी व दूरदर्शन यानी रोजच्या कामाचे वृत्तात सादर केले. मातब्बर मंडळींच्या साक्षी प्रसिद्ध झाल्या आणि प्रकरण रंगू लागले चढत्या क्रमाने रंगत गेलेल्या या कामकाजाचा उत्कर्षबिन्दू म्हणजे इंदिराजी आयोगासमोर येतात की नाही याबद्दल असलेली उत्सुकता! बाईंनी आयोगासमोर येण्याऐवजी जे निवेदन पाठविले त्यामध्ये चौफेर दुगण्या झाडल्या होत्या आणि तरीही आयोगाने पुन्हा हजर राहण्याबाबत बाईंची विनवणी केलीच तर अशा या आयोगाचे सूत्रधार न्यायमूर्ती शहा हे भारताचे सेवानिवृत्त मुख्य न्यायाधीश सर्वोच्च न्यायालयामध्ये काम केलेल्या सेवानिवृत्त न्यायमूर्तींचा परिचय देण्यात आलेला आहे. तसेच प्रत्येक न्यायमूर्तींचे छायाचित्रही त्याच अल्बममध्ये चिकटविण्यात आले आहे. उत्सुकतेपोटी हा अल्बम चाळायला घेतला तर न्यायमूर्ती शहाचे एक जुनाट छायाचित्र आणि केवळ दहा ओळीमध्ये नोंदलेली त्यांच्याबद्दलची माहिती पहावयास मिळते त्यामध्ये केवळ त्यांच्या व्यवसायीन गुणवत्तेची जत्री आढळते.

न्यायमूर्ती शहा याना जवळून ओळखणारी न्यायखात्यामधील मातब्बर मंडळी त्यांच्याबद्दल अतीव आदराने बोलतात कडक शिस्तीचा, न्यायप्रिय न्यायमूर्ती असा त्याचा लौकिक आहे जयतीलाल छोटालाल शहा याचा जन्म १९०६ साली अहमदाबाद येथे झाला. तेथील आर. सी. हायस्कूलमध्ये त्यानी शिक्षण घेतले, तर महाविद्यालयीन शिक्षण मुंबईच्या एल्फिन्स्टन महाविद्यालयातून पूर्ण केले. १९४९ साली अहमदाबाद येथे त्यानी वकिलीस प्रारभ केला आणि पुढे ते मुबई उच्च न्यायालयामध्ये न्यायमूर्ती म्हणून काम करू लागले. दहा वर्षे उच्च न्यायालयामध्ये काम केल्यावर १९६० साली त्याची सर्वोच्च न्यायालयामध्ये नेमणूक झाली. १९७० साली ते भारताचे मुख्य न्यायाधीश झाले आणि याच पदावरून निवृत्त झाले. न्यायमूर्ती शहा याना चार मुले आहेत. त्याच्या पत्नीचे निधन झाल्यानतर त्यानीच मुलांची देखभाल केली. मोठा मुलगा वकील असून त्याहून लहान असलेला नामांकित सर्जन आहे. स्वतः न्यायमूर्ती सेवानिवृत्त झाल्यानतर मुबईत येऊन स्थायिक झाले. मुबईमध्ये त्याचा स्वत:चा बगला वगैरे नाही. ते फ्लॅटमध्ये राहतात. सर्वोच्च न्यायालयामध्ये काम करत असताना न्या. शहा यांनी नि:पक्षपाती न्यायमूर्ती म्हणून लौकिक सपादन केला होता. त्याचासमोर एक दावा हरलेल्या सर्वोच्च न्यायालयामधील एका नामांकित वकिलाने त्यांच्याबद्दल प्रतिक्रिया व्यक्त करताना असे म्हटले होते की, खुर्चीमध्ये न्यायमूर्ती शहा असले की न्याय मिळणार याबद्दल नेहमीच खात्री वाटत असे. असा हा ज्येष्ठ न्यायमूर्ती आणीबाणीमधील अतिरेकाबाबत नेमण्यात आलेल्या आयोगाची सूत्रे सांभाळत असल्याने, आणीबाणीच्या कालखंडामध्ये ज्यानी मनमानी केली अशी अनेक लहान-थोर आणि अति थोर मंडळीही हादरली आहेत काही खुसपट काढायचे म्हणून मेनका गांधी याच्या सूर्य मासिकाने एक १९४० सालामधील जुने प्रकरण उकरून काढून या कर्तव्यकठोर न्यायमूर्तीवर शिंतोडे उडवण्याचा प्रयत्न केला आहे. बरे, काढलेले प्रकरण जोरकस आहे असेही नव्हे. न्यायमूर्ती शहा यानी दिलेल्या निकालपत्रामुळे कोणा ओ. पी. गुप्ता नावाच्या सरकारी अधिकाऱ्याला सेवामुक्त व्हावे लागले. लोकप्रतिनिधींना हाताशी धरून त्याने न्यायमूर्ती शहा याच्याविरुद्ध उठाव करण्याचा प्रयत्न केला; पण हे प्रकरणही त्याच्या अगावर शेकले लोकप्रतिनिधींनी दिलेल्या सह्या मागे घेतल्या आणि काही पदरी पडण्याऐवजी गुप्तासाहेब एक महिन्यासाठी तुरुंगात गेले. असा हा सारा किस्सा सूर्य मासिकाने चुकीच्या रंगानी रगवला आहे. त्या सर्व प्रकरणाची सोयिस्कररीत्या पुनर्रचना करण्यात आली आहे. न्यायमूर्ती शहा यानी संपूर्ण खोटी माहिती आपल्या निकालपत्रामध्ये नोंदवली आहे, असा आरोप सूर्य मासिकाने आपल्या लेखामध्ये केला आहे. न्यायवर्तुळामध्ये काम करणाऱ्या मंडळींनी या लेखाची घृणास्पद आणि असत्याने भरलेला लेख अशी संभावना केली असून न्यायमूर्तींना बदनाम करण्याचा हेतुपुरस्सर प्रयत्न केल्याबद्दल खेद व्यक्त केला आहे. हे सारेच प्रकरण पुन्हा न्यायालयामध्ये जाण्याचीही शक्यता आहे. अर्थात आजही सूर्य मासिकामधील या लेखाचा कोणीच गंभीरपणे विचार करत नाही. आज सगळ्याचे लक्ष लागून राहिले आहे ते आयोगाच्या कामकाजाकडे आणि संभाव्य निष्कर्षाकडे! खेरीज आयोगाने काढलेल्या निष्कर्षाचा नेमका परिणाम काय होईल, याबद्दलही सर्वसाधारण जनतेला उत्सुकता आहे. आज

पृष्ठ २६ वर

# निवडणूक-वारे

## नागालँडचा धडा

**वा. दा. रानडे**

ईशान्य भारत व दक्षिण भारतात निवडणूक-वारे वाहू लागले आहेत. नागालँडच्या विधानसभा–निवडणुका गेल्या महिन्यात झाल्या. या महिनाअखेरीस त्रिपुरामध्ये निवडणुका असून आसाम, मेघालय, मणिपूर या ईशान्य भागातील इतर राज्यात फेब्रुवारीमध्ये निवडणुका होतील. त्याच वेळी महाराष्ट्र, आंध्रप्रदेश व कर्नाटक या दक्षिणेकडील तीन राज्यांत विधानसभेच्या निवडणुका आहेत. दरम्यान काही पोटनिवडणुकाही होत आहेत. राजस्थानात मुख्यमंत्री शेखावत यांच्या जागेची व दुसऱ्या एका जागेची पोटनिवडणूक नुकतीच झाली. उत्तर प्रदेश आणि विहार मुख्यमंत्र्यांच्या जागाच्या पोटनिवडणुकाही याच महिन्यात आहेत.

नागालँडच्या निवडणुकांचे निकाल केवळ त्या राज्याच्या दृष्टीनेच नव्हेत तर ईशान्य विभागाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत. विझोल याच्या नेतृत्वाखाली तेथे सयुक्त लोकशाही आघाडीने ६० पैकी ३५ जागा जिंकून निर्विवाद बहुमत मिळविले व आपले मंत्रिमंडळही बनविले. तीन वर्षांपूर्वीच्या निवडणुकात हुकमी बहुमत कोणत्याच पक्षास मिळाले नव्हते. आघाडीस त्या वेळी २५ जागा मिळाल्या होत्या व काही अपक्ष सभासदाच्या पाठिंब्याने आघाडीने मंत्रिमंडळ बनविले होते; पण सधिसाधू पक्षांतरामुळे ते फार काळ टिकले नाही. आघाडीला या वेळी हुकमी बहुमत मिळाल्याने ती स्थिर सरकार स्थापू शकेल सत्तारूढ आघाडी आणि जनता पक्ष यांच्यातही सघर्ष होण्याचा सभव नाही, कारण नागालँडमध्ये जनता पक्षच अस्तित्वात नाही आणि केंद्रातल्या जनता सरकारला आघाडीने पाठिंवा दर्शविला आहे. तेव्हा पश्चिम बगाल आणि त्रिपुरामध्ये मार्क्सवादी आणि जनता पक्ष यांच्यात जसे संघर्ष निर्माण झाले तसे नागालँडमध्ये होण्याची शक्यता नाही.

प्रादेशिक पक्षाना काँग्रेसमध्ये सामील करून घ्यावे असे इंदिरा गांधीचे धोरण होते. त्यानुसार नागालँड नॅशनॅलिस्ट ऑर्गनायझेशन ( एन्. एन्. ओ. ) या पक्षाचे विसर्जन करण्यात येऊन तो काँग्रेसमध्ये विलीन झाला व नागालँडमध्ये काँग्रेसने प्रथमच या वेळी निवडणुका लढविल्या, पण निवडणुकीचे निकाल पाहता काँग्रेसला या विलिनीकरणाचा फायदा झाला असे म्हणता येणार नाही. पूर्वीच्या निवडणुकीत एन् एन्. ओ ने २३ जागा मिळविल्या होत्या. काँग्रेस तेवढ्या जागाही टिकवू शकली नाही. तिला फक्त १५ जागा मिळाल्या. नागालँडच्या राजकारणात काँग्रेसचा प्रवेश झाला हे खरे; पण प्रभावी पक्ष म्हणून त्याला पाठिंबा मिळालेला नाही. असे का व्हावे ? प्रादेशिक पक्षानी राष्ट्रीय पातळीवरच्या पक्षात विलीन होण्यातच त्यांचे हित आहे ही भूमिका मूलतः चुकीची नाही; पण हे विलिनीकरण लोकांना योग्य व हिताचे असल्याची खात्री पटून स्वेच्छेने व्हावयास हवे, दडपणाखाली नव्हे. आणीबाणीत एन्. एन्. ओ. पक्षावर काँग्रेसमध्ये विलिनीकरणासाठी दडपण आले. हे विलिनीकरण खरे नव्हे, दडपणाखाली ते झालेले आहे, हे सर्वसामान्य नागा जनतेनेही ओळखले आणि विधानसभा–निवडणुकीत काँग्रेसचा मोठा पराभव करून त्यानी आपला कौल स्पष्टपणे दर्शविला.

या घटनेपासून राष्ट्रीय पातळीवरील पक्षानी धडा घेतला पाहिजे. प्रादेशिक पक्षाना आपल्यात सामावून घेण्याची घाई करता कामा नये. यासाठी दडपण तर मुळीच आणता कामा नये. नागालँडमधे जनतापक्ष स्थापण्याची घाई जनतानेत्यांनी केली नाही हे या दृष्टीने चांगले झाले. जनतापक्षाच्या धोरणानुसार कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांचा सच त्यांनी संघटित करावा. नागालँडमधील लोकाचे तातडीचे प्रश्न व निकडीच्या गरजा काय आहेत हे पाहून त्या दूर करण्याचा त्यांनी प्रयत्न करावा. त्यासाठी केंद्राकडून मदत मिळवावी. जनतापक्षाला आणि केंद्रातील जनता सरकारला नागाच्या प्रश्नाबद्दल खरोखरच आस्था आहे. त्याच्या विकासासाठी सरकार मदत देत आहे अशी लोकांची खात्री पटल्यावर जनतापक्षाबद्दल अनुकूल वातावरण निर्माण होईल. ध्येय-धोरणाच्या दृष्टीने जनतापक्षाजवळ असलेल्या प्रादेशिक पक्षाशी सहकार्याचे संबंध वाढवायला हवेत व जनतापक्ष तुमचा प्रतिस्पर्धी नसून मित्र आहे ही भावना त्यातून निर्माण झाली पाहिजे. विझोल यांच्या नेतृत्वाखालील संयुक्त लोकशाही आघाडीशी जनतापक्ष-नेत्याचे सहकार्याचे संबंध आहेत ते योग्यच आहे. न्याय्य प्रादेशिक मागण्यांची दखल घेणे हाच प्रादेशिक पक्षाच्या राजकारणातून येणाऱ्या सकुचितपणाला आळा घालण्याचा परिणामकारक मार्ग आहे. केंद्रातील जनतापक्षाचे असे धोरण असण्याची खात्री पटल्यावर संयुक्त लोकशाही आघाडीसारख्या पक्षाना आपले वेगळे अस्तित्व न ठेवता जनतापक्षात विलीन होऊन राष्ट्रीय जीवनाच्या प्रवाहात सामील व्हावे असे वाटू लागेल; पण हे सारे परिस्थितीच्या अनुभवातून स्वाभाविक परिणती म्हणून व्हायला हवे. दडपणाचा, सक्तीचा, श्रेष्ठत्वाच्या भावनेचा त्यात अंशही असता कामा नये. काँग्रेसकडून घडली तशी चूक आपल्या हातून होणार नाही अशी दक्षता जनतानेत्यांनी घ्यावयास हवी. मेघालय, मणिपूरमधील निवडणूक–धोरण या भूमिकेला अनुसरूनच ठरवायला हवे.

राजस्थानमधे नुकत्याच झालेल्या दोन पोटनिवडणुका जनतापक्षाने जिंकल्या. विधानसभा-निवडणुकीनंतर जवळजवळ सहा महिन्यानी या पोटनिवडणुका झाल्या. जनतालाट अजून कायम आहे हेच या निकालांनी दाखवून दिले. मुख्य मत्री शेखावत एका जागेसाठी उभे होते. गेल्या जूनमधील विधानसभा-निवडणुकीत जनता उमेदवाराने मिळविलेल्या मतापेक्षा अधिक मते त्यांनी मिळविली. दुसरी जागा मात्र जनतापक्षाने अवघ्या आठशे मतांनी जिकली; पण काँग्रेसने वजनदार उमेदवार या जागेसाठी उभा केला होता. तसेच जोधपूर जिल्ह्यात काँग्रेसचा प्रभाव आहे, या पार्श्वभूमीवर जनतापक्षाच्या या विजयाकडे पाहिले पाहिजे. राजस्थानमधील हा कौल लक्षात घेता बिहार व उत्तरप्रदेशचे मुख्य मत्रीही विजयी होतील; पण निवडणुकीतील विजयापेक्षाही

**पृष्ठ २५ वर**

परराष्ट्रीय घडामोडी

# चला सादात इस्त्राएल जाने !

चंद्रशेखर पुरंदरे

१९ नोव्हेंबरला ठीक आठ वाजता एक रशियन बनावटीचे लालपांढरे बोईंग ७०७ इस्त्राएलच्या बेन गुरियन विमानतळावर टेकले आणि जगाचे लक्ष केन्द्रित करून घेणारा इजिप्तचा अध्यक्ष अन्वर सादात मध्यपूर्वेच्या इतिहासात आपले नाव नक्की करत त्यातून बाहेर आला. विमानतळावर इस्त्राएलचा अध्यक्ष इफ्राएम कटझीर, पंतप्रधान मेनाहेम बेगीन, परराष्ट्रमंत्री मोशे दायान आणि माजी पंतप्रधान ७९ वर्षांची गोल्डा मायर इत्यादी त्याचे (जुने) शत्रू त्याच्या स्वागतासाठी हजर होते.

कदाचित्च एखाद्याच्या वाट्याला येणारा स्वागतसमारंभ सादातची वाट पहात होता. एकवीस तोफांची सलामी झडली आणि कैरो रेडिओवरून टेप केलेल्या इजिप्तच्या राष्ट्रगीताची रात्रभर प्रॅक्टिस करत असलेला इस्त्राएलचा लष्करी बँड वाजायला लागला.

विमानतळावर 'इजिप्तच्या अध्यक्षाचे इस्त्राएलची जनता स्वागत करीत आहे' असे सांगणारे हिब्रू, अरबी आणि इंग्रजी भाषेतील फलक फडकत होते इजिप्तच्या अध्यक्षाने इस्त्राएलच्या अध्यक्षाशी आणि नंतर पंतप्रधानाशी हस्तांदोलन केले. १९७३ च्या योम किप्पूरची कट्टर वैरी गोल्डा मायरशी हस्तांदोलन करताना सादातने 'मी या क्षणाची वर्षानुवर्षे वाट पाहिली होती' असे उद्‌गार काढले. १९७३ च्याच युद्धात कैरोपासून ६३ मैलावर येऊन ठेपलेल्या इस्त्राएलच्या तेव्हाच्या सेनापतीला—जनरल एरिएल शेरानला— ह्या प्रसंगाची आठवण करून देत 'मला तुला तिथे पकडायच होतं' असं सादात म्हणाल्यावर त्यानेही 'पण मी तुम्हाला इथं पकडलं !' असं चतुर उत्तर दिलं. काही दिवसच आधी सादातची ही भेट म्हणजे धूळफेक आहे आणि त्या निमित्ताने इस्त्राएलला गाफील ठेवून नव्या युद्धाची सुरुवात आहे, असे उद्‌गार काढणाऱ्या इस्त्राएलच्या सध्याच्या सरसेनापती मोर्दके गुरला आपण धूळफेक करत नसल्याचे बजावून बेन गुरियन ते जेरुसलेममधील किंग डेव्हिड हॉटेल हा प्रवास करण्यासाठी सादात मोटारीत बसला. संपूर्ण जेरुसलेम त्याच्या स्वागतासाठी रस्त्यावर हजर होते विसाव्या शतकातील या अनाकलनीय आश्चर्याचे, सादातचे स्वागत करून साक्षीदार होण्यासाठी त्याच्या शत्रूची जेव्हा धडपड चालली होती, तेव्हाच त्याचे मित्र त्याच्या नावाने बोट मोडत ठेवणीतल्या शिव्या त्याला मोजत होते.

९ नोव्हेंबरला या नाट्याची नांदी झाली. त्या दिवशी इजिप्तच्या पीपल्स असेंब्लीमध्ये आपल्या साडेतीन तासांच्या प्रदीर्घ भाषणाच्या शेवटी शेवटी सादातने भाषणाची लिखित प्रत बाजूला ठेवली आणि मध्यपूर्वेत शांतता प्रस्थापित करण्यासाठी मी जगाच्या दुसऱ्या टोकाला जायलासुद्धा तयार आहे; अगदी इस्त्राएलच्या पार्लमेंटमध्ये, क्नेसेटमध्येसुद्धा भाषण द्यायला तयार आहे, अशी घोषणा केली. त्या वेळी पार्लमेंटच्या श्रोतृवृंदात पॅलेस्टिनिअन लिबरेशन ऑर्गनायझेशन (PLO) चा अध्यक्ष यासीर अराफतही होता. त्याला हे ऐकून धक्का बसला असल्यास नवल नाही; पण तरीही आपल्याकडल्या 'मंत्र्याची आश्वासने' अशा पद्धतीचेच (म्हणजे ऐकून सोडून द्यायच्या पद्धतीचे) हे उद्‌गार असावेत, असाच सर्वांचा ग्रह झाला.

त्याच दिवशी म्हणजे ९ नोव्हेंबरलाच अय्ये आणि जेनजोन या दक्षिण लेबनानमधल्या दोन खेड्यावर तुफानी बॉम्बफेक करून, शंभर अरबांचे जीव घेऊन तीन पॅलेस्टेनिअन कॅम्प्स उद्‌ध्वस्त करून आणि पोर्ट तैरेचा विनाश करून इस्त्राएलची विमाने परतत होती. त्याच आठवड्याच्या पूर्वार्धात तीन इस्त्राएली लोकांच्या हत्येचे हे इस्त्राएली स्टाइलचे उत्तर होते. सीरिया हा देश लेबनानची सुरक्षा आपला मक्ता असल्यासारखा वागत असल्याने त्याचे नाक कापल्यासारखे त्याला वाटणे स्वाभाविक होते; पण सादातचे उद्‌गार भावनिक असतील म्हणून त्या दिवशी कोणीच त्याची दखल घेतली नाही.

पण ती दखल नेमकी इस्त्राएलच्या पंतप्रधानाने, मेनोहम बेगिनने घेतली. बहुधा १० नोव्हेंबरला इस्त्राएलचा हा पंतप्रधान बेगिन, परराष्ट्रमंत्री मोशे दायान, संरक्षणमंत्री वाइझमान आणि अमेरिकेचा इस्त्राएलमधील राजदूत सॅम्पुएल लेविस याची गुप्त बैठक होऊन या उद्‌गारावर सादातला पकडायचे ठरले असावे.

या साऱ्या प्रकाराची वस्तुतः बऱ्याच आधीपासून सुरुवात झाली होती. १९७३ सालीच युद्धानंतर रुमानियाने इजिप्त–इस्त्राएलमध्ये समेट घडविण्यासाठी पुढाकार घेतला होता. तेव्हा सादातने अनुकूलता दर्शवूनही गोल्डा मायरने प्रतिसाद दिलेला नव्हता. याच रुमानियाने या वेळीही या भेटीसाठी पुढाकार घेतला असावा. ३१ ऑक्टोबरला सादात रुमानियाची राजधानी बुखारेस्टला जाऊन रुमानियाच्या कॉसेस्क्यूशी बोलणी करून आलेला होता. याच कॉसेस्क्यूला बेगिनने महिनाभरच आधी भेट दिलेली होती. या बोलण्यामध्येच या भेटीची पूर्वतयारी झाली असावी.

११ नोव्हेंबरला मेनाहेम बेगिनने इस्त्राएली रेडिओवरून केलेले भाषण कैरो रेडिओवरून सहक्षेपित करण्यात आले. बेगिनचे भाषण इंग्रजीत होत. अर्थातच हा पूर्वनियोजित प्रकार होता. बेगिनने आपल्या भाषणात कुराणातल्या पाचव्या सुऱ्यातील 'आमचा या भूमीवरचा हक्क पारंपारिक आणि देवमान्य असा आहे' या वचनाचाही वैशिष्ट्यपूर्ण उल्लेख केला. १४ नोव्हेंबरला अमेरिकन टी. व्ही. वर मुलाखत देताना मात्र जेव्हा सादातने 'मी लवकरच इस्त्राएलला जाण्याचा विचार करीत आहे,' असे सांगितले तेव्हा खरी खळबळ माजायला सुरुवात झाली. त्या मुलाखतीतच त्याने आपण विनशर्त जाऊ हेही सांगितले व इस्त्राएलने आपल्या येण्याची वेळ ठरवावी

असे सांगून इस्त्राएलकडेच पुढची भूमिका सोपविली. बेगिननेही तातडीने शनिवारी दि. १९ नोव्हेंबर रोजी ही ऐतिहासिक भेट निश्चित केली.

मग मात्र सगळीकडे हलकल्लोळ माजला. सुदान, इराण, मोरोक्को आणि टयुनिशिया सोडता साऱ्या अरब जगताने या धक्क्यातून सावरताच सादातला अरबद्रोही म्हणून संबोधले. १९४८ पासून इस्त्राएलला भेट देणारा हा पहिलाच एका प्रमुख अरब राष्ट्राचा नेता असल्याने ही सारी राष्ट्रे विस्मयचकित झाली. प्रत्यक्ष इजिप्तमध्येही गभीर परिस्थिती निर्माण झाली. सादातचा परराष्ट्रमंत्री इस्माइल फाहमी या निर्णयाच्या निषेधार्थ राजीनामा देऊन बाहेर पडला. आदल्याच आठवडयात सोमवारी झालेल्या अरब राष्ट्राच्या परराष्ट्रमंत्र्याच्या बैठकीला तो हजर होता आणि त्यात पॅन-अरेबिझम या लाडक्या तत्त्वाचा उद्घोष करून परत एकदा इस्त्राएलचे अस्तित्व नाकारून त्याच्या विरुद्धचा लढा अधिक तीव्र करण्याचे सयुक्त पत्रक काढण्यात आले होते त्यामुळे त्याचे वागणे अनपेक्षित नव्हते. त्याच्या पाठोपाठ परराष्ट्रमंत्री म्हणून नेमलेला मोहम्मद रिआद हा तर राजीनामा खरडण्यापुरताच तासभर ऑफिसात जाऊन आला. जगाच्या इतिहासात हा बहुधा पहिलाच प्रसग असावा. त्यामुळे वातावरण एकदम तग बनले.

परंतु सादातने जे प्रचड धाडस केले ते सर्वस्वी एकाकी नसावे. जॉर्डनचा राजा हुसेन याने खाजगीरीत्या त्याला प्रोत्साहन दिले असावे. त्याचप्रमाणे इजिप्तमध्ये प्रचड पैसा ओतणाऱ्या आणि अत्यंत श्रीमंत सौदी अरेबियाशी या नाजूक प्रश्नावर संबध तोडणे इजिप्तला परवडण्यासारखे नाही. त्यामुळे जरी सौदे अरेबियाने या कृतीशी आपला सबंध नाही असे जाहीर केले असले तरी, राजा खलिदची मूक संमती असावी असा अंदाज करण्यास जागा आहे लिबियाने मात्र तात्काळ सबंध तोडले. इजिप्तमधल्या अडीच लाख लिबियन्सना ताबडतोब मायदेशी बोलाविण्यात आले. कर्नल गद्दाफी हा लिबियाचा प्रमुख आणि सादात हे अगदी अलिकडेच सबध बिघडल्याने जाहीररीत्या एकमेकांची उणी-दुणी काढीतच होते; परतु सिरियातूनही निषेधाचा खलिता आला. सिरियाच्या असदला १६ नोव्हेंबरला सादातने टेलिफोनवरून निमंत्रण केल्यावर असदने त्यालाच सिरियाला बोलाविले. त्यावरून सादात दमास्कसला पोचला; परंतु ती शिष्टाई असफल होऊन सिरियानेही प्रखर विरोधी भूमिका घेतली. लिबियाच्या गद्दफीने शेष अरब जगताला १९ नोव्हेंबर हा काळा दिवस मानण्याचे आवाहन केले.

प्रत्यक्ष इस्त्राएलमध्ये तर फारच औत्सुक्य निर्माण झाले. क्नेसिटने (इस्त्राएलचे पार्लमेंट) ताबडतोब सादातला भाषण देता येईल अशी व्यवस्था केली त्याचे हार्दिक स्वागत करण्याच्या ठरावाला १२० पैकी दोन कम्युनिस्ट सोडता सर्व खासदारानी पाठिबा दिला. अत्यत सावधचित्ते ही पूर्वतयारी होत असतानाच सुट्टीवर असणाऱ्या इस्त्राएलच्या सेनापती मोर्देके गुरने मंगळवारीच एका दैनिकाला मुलाखत देऊन सादातच्या प्रामाणिकपणाविषयी सशय व्यक्त केला आणि इजिप्तने इस्त्राएल गाफील ठेवल्याच्या भ्रमात राहू नये असा इशाराही दिला. ताबडतोब त्याला क्नेसिटपुढे बोलावण्यात येऊन संरक्षणमंत्र्याने त्यांची जाहीर हजेरी घेतली.

अशा रीतीने वाजतगाजत असलेली सादातची जेरुसलेम भेट सुरू झाली. २० नोव्हेंबरच्या सकाळी मुस्लिम धर्मात महत्त्वाच्या दृष्टीने तिसऱ्या असलेल्या जेरुसलेममधल्या अल्ट अक्सा मशिदीत सादात नमाज पढायला गेला. त्या वेळी कुर्बान बैराम हा मुस्लिम सण चालू असल्याने चार दिवसांची सुट्टी होतीच या मशिदीत इस्त्राएली सैनिकांच्या डोळयात तेल घालून चालू असलेल्या पहाऱ्यात सादातने संरक्षक अल्लाची करुणा भाकली. याच मशिदीत २० जुलै १९५५ ला जॉर्डनचा राजा अब्दुल्ला याचा PLO च्या लोकानी खून केला होता. तेव्हाही अब्दुल्ला असाच शांततेच्या प्रयत्नासाठी आलेला होता. मशिदीच्या इमामाने PLO च्या लोकांवर अन्याय न होऊ देण्याचे आवाहन सादातला केले. तो जेव्हा बाहेर आला, तेव्हा हजार-दीड हजार अरबांनी निदर्शने करून त्याला तो द्रोही असल्याचे लक्षात आणून दिले. इस्त्राएली तुरुंगात खितपत पडलेल्या अरबांचे अमानुष हाल केले जात असताना सादातने आपल्या भेटीने त्यांना फसविले, असे त्यांचे म्हणणे होते.

त्या दिवशी दुपारी क्नेसिटमध्ये सादातने सर्व १२० खासदारांच्या उपस्थितीत ऐतिहासिक भाषण केले. थिओडर हर्झ्लचा झिऑनिस्ट चळवळीच्या सस्थापकाच्या तैलचित्राखाली घाम टिपीत पचावन्न मिनिटं भाषण करताना सादातने देव हाच कर्ता, करविता, दयावत, सार्वभौम कसा, हे अनेक धर्मग्रंथातील उदाहरणांद्वारे सांगितले. त्याच्या भाषणात युद्धाचे दुष्परिणाम, युद्धाने होणाऱ्या विधवा या अरब नसतात अगर ज्यू नसतात, पोरकी मुले, मानवतेला कलक, युद्ध कसे वाईट वगैरे मुद्दे व अहिंसेचे महत्त्व सोडता प्रमुख पाच मागण्या होत्या. या मागण्याच सर्व अरब राष्ट्रे करीत आलेली आहेत आणि जरी सादातने काळिमा फासला असे म्हणत होती तरी सादातने त्या बाबतीत तडजोड नसल्याचे स्पष्ट केले. या पाच मागण्या अशा—

१. १९६७ पासून इस्त्राएलने व्यापलेल्या सर्व प्रदेशातून इस्त्राएलने अंग काढून घ्यावे.

२. पॅलेस्टेनियन लोकाचा स्वत.चे राष्ट्र असण्याचा हक्क मान्य करावा.

३. मध्यपूर्वेतील सर्व राष्ट्रानी सर्वमान्य अशा संरक्षित सीमांमध्येच रहावे.

४. सर्व राष्ट्रांचे परस्परांशी संबंध असावेत.

५. युद्धखोरीपासून परावृत्त व्हावे. यातील पॅलेस्टेनियन लोकांच्या पुनर्वसनाची मागणी हा इस्त्राएल-अरब संबधातील सर्वात महत्त्वाचा प्रश्न आहे, असा सादातने उल्लेख केला. हा प्रश्न सुटल्याखेरीज शातता प्रस्थापित होणार नाही असे बजावून त्याने अमेरिका हा तुमचा सर्वात जवळचा मित्र हे मान्य करतो असे निदर्शनास आणून दिले. तुम्ही धैर्याने या परिस्थीला सामोरे जा ! (जसा मी गेलो तसा) वगैरे भावनेला हात घालणारे भाषण केले. त्यात शेवटी त्याने 'जगाच्या या भागात तुम्ही राहू इच्छिता तर मी अत्यंत प्रामाणिकपणे तुमचे स्वागत करतो,' असे उद्गार काढले. यानतरच्या भाषणात मेनाहम बेगिनने पॅलेस्टेनियन्सचा प्रश्न टाळला. त्याने कोणतीही नाटयपूर्ण घोषणा अगर सवलत जाहीर केली नाही. शांतता अपरिहार्य असल्याचे त्यानेही मान्य केले. (फक्त आमची न् तुमची व्याख्या

वेगळी आहे !) भगवंतावर त्यानेही हवाला ठेवून आपण एक झाल्यास वाळवंटाची नंदनवने करू, गरिबी, भूक नष्ट करू असे फुगे उडविले. त्याच वेळी दुसऱ्या महायुद्धाच्या कत्तलीनंतर आम्ही जे उभे आहोत, ते वाकण्यासाठी अगर नष्ट होण्यासाठी नव्हे. धैर्यातून आम्ही जन्मलो. धैर्यानेच आम्ही जगू ! कोणत्याही धमकीपुढे नमणार नाही ! असे ठराविक भाषण केले. यात त्याने सादातच्या असामान्य धैर्याची प्रशंसा केली पण सादातने पुढे केलेल्या मैत्रीच्या हातावर वाटाण्याच्या अक्षताच ठेवल्या.

, आपल्या संपूर्ण भाषणात सादातने PLO चा उल्लेख केला नाही पॅलेस्टेनियन्सच्या हक्काविषयी त्याने सर्वांत महत्त्वपूर्ण प्रश्न असे सागितले; पण PLO ही त्यांची अधिकृत संघटना असल्याचे दर्शविले नाही.

या दौऱ्यात फक्त सादात व बेगिन यांची फक्त दोघाचीही बोलणी झाली; पण तपशील प्रसिद्ध झाला नाही.

एकूण 'एका आजीने एका आजोबाचे केलेले स्वागत' ही गोल्डा मायरची प्रतिक्रिया पुरेशी बोलकी ठरली. गोल्डा मायरने सादातच्या नवजात नातवाला दिलेली भेट आणि इस्राएलच्या अध्यक्षाच्या बायकोनें सादातच्या बायकोला दिलेली ही भेट वगळता सादातच्या खिशात काहीच पडले नाही.

'मानसिक दरी' अरुंद होण्यास मदत झाली; पण ज्या एका भेटीसाठी सादातने आपली राजकीय प्रतिष्ठा आणि आयुष्यही पणाला लावले त्या मानाने त्याला फारसे यश मिळाले नाही. अर्थात याची त्याला पूर्वकल्पनाही असावी. मुख्यतः सहा कारणांनी तो इस्रायलला जायला उद्युक्त झाला असावा.

१. इजिप्तची अतर्गत तुंबलेली अर्थव्यवस्था आणि राजकीय कोंडी फोडणे. (जानेवारीत झालेले विद्यार्थ्यांचे आंदोलन सादातने कसेबसे दडपले होते.)

२. युद्ध नाही आणि शातता नाही यामुळे अर्थव्यवस्थेवर पडणारा ताण.

३. स्पेअर पार्टस्च्या तुटवड्यामुळे युद्धाने या परिस्थितीला तोंड फोडणे इजिप्शिअन लष्कराला झेपण्यासारखे नव्हते

४. जिनिव्हा परिषदेच्या दृष्टीने अतिमंद प्रगती व अरबजगात घसरत असणारी इजिप्तची व सादातची प्रतिष्ठा.

५. अमेरिकन सरकार-कार्टरच्या अध्यक्षतेखाली काही पुढाकार घेईल याबद्दल झालेली निराशा. (ही बेगिनचीही झाली असावी.)

६. जिनिव्हामध्ये PLO ने भाग घेतल्यास आपण भाग घेणार नाही ही इस्राएलची अडेलतट्टूपणाची भूमिका होती. आज पॅलेस्टेनिअन ताकद पार कोलमडलेली आहे तेव्हाच नेमका कार्टर त्याना प्रतिष्ठा देऊ इच्छितो, त्याला शह देणे.

या प्रमुख कारणानी सादातने हा दौरा केला त्याचे परिणाम लक्षणीय आहेत.

१. अमेरिकेचे महत्त्व मध्यस्थ या नात्याने संपल्यातच जमा झाले.

२. अरब-राष्ट्रावर आर्थिक सामर्थ्यामुळे लादले गेलेले सौदी अरेबियाचे नेतृत्व व पॅलेस्टेनिअन जनतेच्या स्वयनिर्णयासाठी आणि लेबनानमध्ये हस्तक्षेप करण्यासाठी सिरियाने घेतलेल्या जबाबदारीने लादले गेलेले सिरियाचे लष्करी व राजकीय नेतृत्व संपले. परत एकदा इजिप्तकडे हा वारसा आला.

३. प्रथमच, अनधिकृतरीत्या का होईना, सादातने गोल्डा मायर व बेगिनकडून पॅलेस्टेनिअन्सचा प्रश्न ज्वलत असल्याचे वदवून घेतले. पत्रकार-परिषदेत गोल्डा मायरने हा प्रश्न असल्याचे व बेगिनने त्यावर आपल्याकडे उत्तरही असल्याचे सागितले.

४. इजिप्त व इस्राएलमध्येच फक्त द्विराष्ट्रीय करार कोणताही होणार नाही हे सादातने सागूनही, म्हणजे जो करार होईल, तो अरबराष्ट्रे आणि इस्राएल यांच्यातच होईल असे त्याने वारंवार सांगूनही, जर इस्राएलने अपेक्षित प्रतिसाद दिला नाही (आणि अजून तरी तो दिलेला नाही), तर इजिप्त एकटा पडून सिरियाकडे उर्वरित अरबाचे नेतृत्व जाण्याचा संभव आहे

५. इस्राएलने भ्रमनिरास केल्यास सादातच्या स्थानालाच सुरुंग लागण्याची शक्यता आहे. इजिप्तचा पंतप्रधान सालेम आणि या सगळ्या गडबडीत निर्णायक भूमिका वजावण्याची क्षमता असणारे लष्कर, सादातशी एकनिष्ठ ठेवणारा इजिप्तचा सेनापती गमेसी याचे अनुक्रमे सर्वसामान्य जनता व लष्कर यातील वजन व त्याची प्रखर राष्ट्रवादी पार्श्वभूमी लक्षात घेता रिक्तहस्ते परतलेला सादात हा इजिप्तचा राष्ट्रीय अपमान समजून ते त्याला दूर करणे असभवनीय नाही. याच वेळी PLO च्या एका सिरियाकडे झुकणाऱ्या गटाने सादातचा खून करण्याचा विडा उचलला आहे हेही नमूद करणे आवश्यक.

५) सिरिया-इराक-लिबिया-PLO-अल्जेरिया आणि दक्षिण येमेन हे सिरियाच्या नेतृत्वाखाली एकत्र होऊन परिस्थिती चिघळण्याची शक्यता आहे.

६) वेस्ट बँक या इस्राएलच्या लष्करी अमलाखालील वसाहतीच्या भवितव्यावर प्रमुख परिणाम दिसेल येथे ९००० इस्राएली व पधरा लाख अरब आहेत. इस्राएलने प्रथम त्याना स्वयशासन देऊन मग जॉर्डनच्या हवाली करावे असा समेटाचा मार्ग आहे. तो न अवलबिल्यास वरील परिणामाचे गाभीर्य वाढून मध्यपूर्वेची परिस्थिती अखड युद्धाप्रत पोचेल.

७) इराक आणि लिबिया या दोन राष्ट्रात आज तेढ आहे या दोन्ही राष्ट्रानी सादातचा उल्लेख उपहासाने केला व त्याची निर्भर्त्सना करीत त्याच्या या भेटीची वार्ता काळ्या चौकटीत दिली. हे दोन देश जास्त जवळ येण्याचा संभव आहे

सम्यक् अवलोकन करता, परिस्थिती दुसऱ्या सिनाई करारानतर होती तशीच वस्तुनिष्ठतेने आहे. सिरियाने तर स्वत. लॅबेनीज फॅलजिस्ट आणि इस्राएल यांच्या सहकार्याने PLO ची लेबनानमधील चळवळ दडपण्याचा प्रयत्न केला होता. द्विराष्ट्रीय वाटाघाटीही सिरिया व इस्राएल याच्यात चालू असल्याच्या वार्ता होत्या. अशा वेळी सिरियाने कदाचित आपला पुढाकार गेला म्हणून इजिप्तचा निषेध केला असणे शक्य आहे. तसेच जॉर्डनही उच्चस्तरीय वाटाघाटी करीत होता

या सर्वांचा राग अशासाठी आहे की, सादातच्या भेटीमुळे इस्राएलच्या अस्तित्वालाच मान्यता मिळाली आहे. जेरुसलेम ही राजधानी असलेले इस्राएल हे राष्ट्रच मध्यपूर्वेच्या नकाशावर नाही, या त्यांच्या प्रमुख भूमिकेला सादातने वास्तववादी भूमिका घेतल्याने तडा गेला आहे आणि ही मान्यता

आता अमान्य होण्यासारखी नाही.

एकट्या वेस्ट बँक कॉलनीत असणारे साडेसहा लाख पॅलेस्टेनिअन्स (इतर अरब राष्ट्रात विखुरलेले निराळेच) ही वस्तुस्थिती मात्र इस्राएलला जड जाणार आहे. भावनेचा खेळ वगळता, मेनाहेम बेगिन वा सादात, दोघाची स्थाने यामुळे डळमळीत होण्याची शक्यता आहे. सादातचा उल्लेख वर या संदर्भात आलाच. मेनाहेम बेगिनचे मंत्रिमंडळ ही संयुक्त आघाडी आहे. मोशे दायानने सादात इजिप्तला परतल्यावर 'सादातने आम्हाला युद्ध हाच पर्याय ठेवला आहे,' अशी त्याची संभावना केली. कारण व्याप्त प्रदेश सोडण्याची इस्राएलची तयारी नाही. वेस्ट बँक कॉलनीच्या बाबतीत त्याचे आणि बेगिनचे मतभेद होणे शक्य आहे. 'जर एखाद्या जबाबदार नेत्याने समझोता करण्याची तयारी दाखविलीच तर वेस्ट बँकचा विचार करू.' असे दायानचे त्या बाबतीत मत आहे, तर बेगिन सादातच्या व एकूण जगातील इस्राएलच्या परिस्थितीचा विचार करून निराळी भूमिका घेईल अशी अपेक्षा आहे. त्यामुळे बेगिनचा लिकुड पक्ष अल्पमतात जाणे संभवते. त्याचा उपपंतप्रधान यिगाल यादिन हाही या भेटी-प्रकरणावर फारसा खूष नाही.

अशा रीतीने एका दोलायमान परिस्थितीतून जात असणारी मध्यपूर्व इस्राएलच्या थंडपणामुळे आणखी विकट परिस्थितीला सामोरी जाईल असेच दिसते.

मधल्यामधे सादातच्या लक्षात मात्र ऑलिव्हची पानेही किडकी निघाली, शांततेचे कबूतरही उडून गेले आणि अध्यक्षाची खुर्चीही गायब झाली, हे येऊ नये!

आर्थिक टिपणे :

# रोजगाराचे दुर्लक्षित क्षेत्र

नारायण वैद्य । माजी उपमहापौर, पुणे

जम्मू–काश्मीरमधे दरवर्षी दीड कोटी रुपये किंमतीचे ग्रीन गोल्ड नांवाचे चांगले इमारती लाकूड जळण म्हणून जाळण्यात येते. खुद्द तेथील सरकारच सुमारे २० लक्ष रुपयाचे हे लाकूड तूट सोसून कमी दराने दरमहा रेशनपद्धतीने गिऱ्हाइकांना सरपण म्हणून पुरवते अशी बातमी एका वृत्तपत्रात आली आहे.

जम्मू–काश्मीरमधील या उपयुक्त इमारती लाकडाचा औद्योगिक उपयोग करणाऱ्या अनेक योजना यापूर्वी पुढे आलेल्या होत्या; परंतु त्या कागदावरून पुढे सरकल्या नाहीत असे कळते. मॉडिपॉन कंपनीने या लाकडापासून रेयॉन ग्रेड पल्प बनविण्याचा काही कोटीचा प्रकल्प उभारण्याची तयारी दर्शविली होती आणि प्रकल्पासाठी जम्मू प्रातातील चिनाब खोऱ्यातील घनदाट जंगलातले ग्रीन गोल्ड वापरण्याची हमी घेतली होती. सात वर्षांपूर्वी केंद्र सरकारने या कंपनीला प्राथमिक परवानाही दिला होता; परंतु त्या परवान्याची मुदत नुकतीच संपली आणि त्याची मुदत वाढविण्याची शिफारस करण्यास राज्य सरकार राजी नाही.

तीन वर्षांपूर्वी थापरसमूह आणि चित्रपट उद्योगातील श्री. रामानंद सागर यांनी मिळून काश्मीरमधे कागद कारखाना काढण्याची तयारी दर्शविली होती व त्यासाठी बारा कोटी रुपये गुंतवणुकीचा सर्वंकष प्रकल्प तयार केला होता; पण त्याचे पुढे काय झाले हे कळले नाही.

१९७१ साली केंद्रीय औद्योगिक विकास मंत्रालयाने या कामासाठी एक ऑफिस उघडावयाचे ठरविले व काश्मीर खोऱ्यात २१ कोटी ३६ लक्ष रुपये गुंतवणुकीच्या रेयॉन ग्रेड पल्पची निर्मिती करणारा कारखाना उभा करावयाचे ठरविले. आज ही योजना कोणत्या अवस्थेत आहे हे कळण्यास मार्ग नाही; परंतु आवश्यक असलेला कच्चा माल काश्मीरमधे या प्रकल्पासाठी मिळणे शक्य नाही असे रशियन तज्ज्ञ म्हणाल्याचे कळते. यावर येथल्या काही मंडळींनी आव्हानपूर्वक सांगितले की, राज्य जंगलविभागाच्या आकडेवारीनुसार केवळ पीर पंजाल डिव्हिजन वर्षाला आवश्यक असलेले २ लक्ष ३१ हजार चौरस मीटर लाकूड पुरवू शकेल.

जम्मू आणि काश्मीर इंडस्ट्रीज लि. या सरकारी मालकीच्या कंपनीने काही वर्षांपूर्वी क्राफ्ट पेपर तयार करणारा कारखाना उभा करावयाचे ठरविले होते. त्याची दररोजची उत्पादनक्षमता १०५ टनांची व लाकूड वापरण्याची वार्षिक क्षमता ४९,५०० टनांची होती. २९ कोटी रुपयांच्या या प्रकल्पाला नियोजनमंडळाने मान्यता दिल्याचे म्हणतात; परंतु कोठे माशी शिंकली ते कळत नाही.

उत्कृष्ट जातीच्या ग्रीन गोल्डचा उपयोग करणारा काही कोटीचा प्रकल्प काश्मीरमधे जेव्हा उभा राहील तो राहो! त्यामुळे काश्मीर खोऱ्यातील जंगलव्याप्त ग्रामीण भागातल्या गरिबांना रोजगार मिळेल हे खरे! परंतु तोपर्यंत दरवर्षी दीड कोटी रुपये किंमतीच्या चांगल्या लाकडाचा धूर करण्याचे कार्य तेथील सरकार जनतेच्या मदतीने करीत आहे! खरोखरीच त्या लाकडापासून रेयॉन ग्रेड पल्प उत्तम प्रकारचा तयार होऊ

शकतो का आणि त्यापासून चांगला चिवट कागद—जो पॅकिंगसारख्या उद्योगासाठी अत्यंत आवश्यक आहे—बनू शकतो का? तशी पूर्ण शक्यता असावी. कारण त्याशिवाय मॉडिपॉन किंवा थापर यासारखे उद्योगसमूह पुढे आले नसते. केंद्र सरकारच्या औद्योगिक विकास विभागाने किंवा शासकीय मालकीच्या जम्मू—काश्मीर औद्योगिक कंपनीने ज्या अर्थी याबाबत पुढाकार घेतला, त्या अर्थी यात निश्चितपणे तथ्य असले पाहिजे.

जम्मू—काश्मीरचा बराचसा भाग डोंगराळ आहे. काही ठिकाणी शेती आणि फळ-बागांवर तेथील लोकांचा उदरनिर्वाह चालतो; परंतु जंगलव्याप्त जनतेला उदरनिर्वाहाची नवनवीन साधने उपलब्ध करून देणे सरकारचे कर्तव्य आहे. नियोजनमंडळा-मध्ये वनविभागावर संशोधन करणारे अर्थ-तज्ज्ञ आहेत. त्यांनी देशाच्या विविध भागांतील जंगलाचा वेगवेगळ्या दृष्टिकोनातून अभ्यास करणे व जंगलांची वाढ सतत होत राहून जंगलसंपत्तीत कशी भर पडेल ते पहाणे अधिक गतिमान केले पाहिजे. जळण म्हणून साधे लाकूड वापरणे आणि ग्रीन गोल्डचा संपत्ती मिळवून देणारा उपयोग करण्याचा मार्ग शोधणे सरकारला अगदी शक्य आहे. अशा प्रकारचा कागदी लगदा तयार कर-ण्याचा कारखाना जम्मू—काश्मीरमध्ये काढणे आज आर्थिक दृष्ट्या परवडणारे नसेल तर या लाकडाचा चुरा किंवा फळ्या गरजू देशांना—लगदा तयार करण्यासाठी वा अन्य कारणासाठी—निर्यात होऊ शकतात का हे पाहिले पाहिजे.

या दृष्टीने मध्यप्रदेशातील बस्तर नावाने ओळखल्या जाणाऱ्या विस्तीर्ण जंगलपट्ट्याचा सर्व्हे घेण्याचे काम लवकरच सुरू होत आहे, ही मोठ्या समाधानाची गोष्ट आहे. कागद आणि कागदाचा लगदा तयार करणारा ३०० कोटींचा अतिप्रचंड प्रकल्प तेथे उभारता येईल काय आणि त्यासाठी लागणारे लाकूड भरपूर प्रमाणात पुरविण्याची क्षमता बस्तर जंगलाची आहे काय याचा अभ्यास सदर पाहणीत केला जाणार आहे. ही पाहणी दोन वर्षे चालेल आणि हिंदुस्थान सरकारला यासाठी एक कोटी रुपये खर्च येईल. सॅन्डवेल मॅनेजमेंट कन्सलटन्ट लि. या कॅनडातील कंपनीकडे हे काम सोपविण्यात आलेले आहे. बस्तर विभागात जंगल विकास करणे आणि जंगल साधनसंपत्तीवर आधारित कारखाने निर्माण करणे यासाठी जागतिक बँकेने चार कोटी रुपयांचे कर्ज मंजूर केले आहे. त्यातून सर्व्हेचा खर्च केला जाईल जागतिक बँकेने या संबंधात जो प्रकल्प मंजूर केला आहे, त्यात एक महत्त्वाचा भाग म्हणजे तेथील आदिवासींना तांत्रिक शिक्षण देणारे एक केन्द्र उभारले जाईल व त्या केन्द्रात इमारती लाकूड व इतर कामासाठी लागणारे लाकूड याची शास्त्रीय पद्धतीने तोड करणे आणि कापणे याचे शिक्षण दिले जाईल. या प्रकल्पातील आणखी एक महत्त्वाचा भाग म्हणजे उष्ण कटिबंधातील देवदार वृक्षाची प्रचंड प्रमाणावर लागवड करणे. या प्रका-रच्या देवदार वृक्षाचे वैशिष्ट्य असे की, कागद तयार करण्यासाठी लागणाऱ्या बांबू आणि साल या झाडांपेक्षा या वृक्षाची वाढ फारच झपाट्याने होते आणि याचे धागे बांबूंच्या धाग्यापेक्षा अधिक लांब असतात. अर्थात बस्तर जंगलाचा हा पहिलाच सर्व्हे नव्हे संयुक्त राष्ट्रसंघाच्या मदतीने केन्द्र सरकारने १९६५ ते १९६८ च्या दरम्यान या प्रकारचा सर्व्हे घेतलेला होता.

याबाबत असे सुचवावेसे वाटते की, प्रचंड कागदकारखान्यासारखे जंगलसंपत्तीवर आधा-रित अनेक उद्योग इतर जंगलव्याप्त प्रदेशाप्रमाणे येथेही निर्माण होऊ शकतील; परंतु सरकारने एक काळजी घ्यावी की, तंत्रज्ञ आणि अनुभवी व्यवस्थापन यांच्या-व्यतिरिक्त स्थानिक आदिवासींशिवाय बाहेर-च्यांना तेथे प्रवेश देऊ नये. (बैलाडिला प्रकल्पाच्या बाबतीत असे घडले आहे). सर्व तंत्राचे परिपूर्ण शिक्षण तेथील आदिवासींना देऊन त्याचाच उपयोग तेथील कारखान-दारांनी करून घेतला पाहिजे. तसेच जंगल-संपत्तीचा अधिक चांगल्या प्रकारे व तांत्रिक पद्धतीने उपयोग करून आधुनिक गरजा पूर्ण करू शकेल असा विविध प्रकारचा माल त्याच्याच पारंपारिक उद्योगातून कसा निर्माण करता येईल याचे शिक्षण तेथील आदिवासी जनतेला दिले पाहिजे.

## ☐ नवे पेय—सेव्हन-इन् वन

हिमाचलप्रदेशाने सफरचंदाच्या अर्का-पासून एक नवे पेय बनविले आहे. त्याचे नाव आहे 'सेव्हन-इन् वन.' भारत-जर्मन कृषि सहाय्यक कार्यक्रमाखाली उभारलेला कारखाना सफरचंदाचा अर्क तयार करतो. सीझनला दोन हजार टन सफरचंद गाळण्याची या कारखान्याची क्षमता आहे. सध्या लहान आणि मध्यम आकाराच्या बाटल्यांतून हा अर्क विकत मिळतो. 'सेव्हन-इन् वन' हे नाव मोठे अर्थपूर्ण आहे. एक म्हणजे एक बाटली अर्क आणि सहा बाटल्या साधे पाणी एकत्र केले की, सात बाटल्या सुरेख चवदार पेय तयार होते. दुसरे असे की, साखर, सोडियम, पोटॅशियम्, कॅल्शियम्, प्रोटीन्स्, लोह आणि व्हिटॅमिन्स् या सात घटकांचा हा संगम आहे साखर किंवा लिंबू याच्या ऐवजी चहामध्ये हा अर्क वापरता येतो. लहान मुलांना गार दुधातून, केक आणि आइस्क्रीम तयार करताना किंवा पावावर लावण्यासाठी याचा उपयोग होतो.

विशेष म्हणजे कोका कोलाला पर्यायी पेय म्हणून हे शोधून काढलेले नाही आणि कोका कोलापेक्षा हे स्वस्तही पडते—एका बाटलीला फक्त सत्तर ते ऐंशी पैसे. ☐

# अपहरणकर्त्यांच्या जगात !

**हल्ली ' विमान ' म्हटल्यावर त्या प्रवासातील गमतींजमतीची वर्णनं ऐकू येण्याऐवजी अपहरणाची भयानक बातम्याच अधिक ऐकू येतात. इतकच नव्हे तर आता विमानकर्मचाऱ्या-बरोबरच, विमानाचं अपहरण झालं तर कसं वागावं याचं शिक्षण, विमान-प्रवाश्यांनाही द्यावे की काय, असा एक मुद्दा आंतरराष्ट्रीय पातळीवर चर्चिला जात आहे. या वर्षाच्या पूर्वार्धात जपान आणि जर्मनीच्या विमानांचे अपहरण करून दहशतवाद्यांनी ही जखम पुन्हा ताजी केली आहे.**

**परतु यापूर्वीही विमानअपहरणाचे असेच किंवा याहूनही अधिक चित्तथरारक प्रकार घडलेले आहेत. त्यापैकीच १९७० साली दहशतवाद्यांनी एकाच वेळी केलेल्या पाच विमानांच्या अपहरणाची ही कथा....**

**डॉ. श्रीकांत मुंदरगी**

गेल्या दोन महिन्यात दोन विमानाची अपहरणे करण्यात आली. काही दिवसांच्या अंतराने घडलेल्या या घटनांनी सारे सुसंस्कृत जग घास्तावून गेले. चक्रावले. आकाशातून विहार करणाऱ्या धनवान मंडळीनी तर या अपहरणाचा धसका घेतलाच पण विमानात कधीही प्रवेश न केलेल्या लोकांनासुद्धा या हिंस्र, क्रूर व निष्ठूर प्रकाराचा उबग आल्यावाचून राहिला नाही. जपान सरकारने अपहरणकर्त्यांच्या सर्व मागण्या मान्य करून सरळ शरणागती पत्करली. त्यामुळे ते जरी सर्व उतारू व विमानातील कर्मचाऱ्याचे जीव वाचवू शकले तरी, त्यांच्या या लवचिक व दुर्बळ धोरणाविरुद्ध जपानी जनतेने कडक टीका केली. त्याउलट जर्मन सरकारने आक्रमक धोरण स्वीकारून अपहरणकर्त्यांवर आकस्मिक, चपळ हल्ला चढवून त्यांना नेस्तनाबूत केले व सर्व ओलितांना मुक्त करून जगाची प्रशंसा मिळवली. इस्रायलने घालून दिलेला कित्ता त्यांनी चपखलपणे गिरविला व जगातील सर्व दहशतवादी मंडळीना हादरवून टाकले. या दोन विमान-अपहरणानी वर्तमानपत्रांचे रकानेच्या रकाने भरून जात होते आणि जगाच्या निरनिराळ्या भागांत त्यावद्दल चर्चा होत होती. पण...

जगात एकाच वेळी पाच विमाने पळविण्याचा प्रकार १९७० साली घडला हे फारच थोड्या लोकाना आठवत असेल. सर्व युरोपीय देशाना घाम फोडणारी ही घटना ज्या नाट्यमय रीतीने घडत गेली ते वाचताना वाचकसुद्धा तितकेच भयचकित झाल्यावाचून राहणार नाहीत. पॅलेस्टाइन मुक्तिसैनिकानी (PLAF) यशस्वीरीत्या पार पाडलेले हे भयनाट्य म्हणजे अत्यंत धाडसी, परंतु क्रूर अशा साहसाचा कळस आहे. अपहरणाच्या इतिहासात ही घटना अद्वितीय असून भविष्यकाळात तिची पुनरावृत्ती होण्याची शक्यता फारच कमी आहे.

सहा सप्टेंबर– १९७०.

EL–AL Flight 219 तेल अव्हीव– ॲमस्टरडॅम– न्यूयॉर्कच्या या 707 बोईंग जेटमध्ये एकही सीट रिकामी नव्हती. ॲमस्टरडॅमच्या विमानतळावर जेव्हा त्या तरुण जोडप्याने प्रवेश केला तेव्हा अनेकांच्या मनात आले की, मधुचंद्रासाठी निघालेले हे नवविवाहित जोडपे खरोखर दृष्ट लागण्याजोगे आहे. पंचविशीतल्या तावूस केसाच्या व सडसडीत अंगयष्टीच्या तरुणाला शोभेल अशीच ती तरुणी होती... गव्हाळ वर्णाची, काळाभोर केसांची अन् कमनीय बांध्याची.

पण गंमत अशी की, हातात हात घालून एकमेकाना चिकटून चालणारे ते जोडपे मात्र एकमेकाशी एक शब्दही बोलत नव्हते. टुरिस्ट सेक्शनमध्ये बसलेल्या एका अमेरिकन म्हातारीला तेवढी एक गोष्ट सहजपणे खटकली; पण त्याबद्दल फारसा विचार करणे तिला जरुरीचे वाटले नाही. म्हणून तिने तो विचार झुरळासारखा मनातून झटकून टाकला; पण नेमके तेच सर्वांना महागात पडणार होते...

दुपारी एक वाजता विमानाने ॲमस्टरडॅम सोडले, ते एकशेअठ्ठेचाळीस प्रवाशांना पोटात घेऊनच. विमान जसजसे वर जाऊ लागले तसतसे प्रवासीही सुस्तावू लागले. अचानक साऱ्याच्या कानावर एक विचित्र किंकाळी पडली आणि सारे उतारू गोंधळून गेले टुरिस्ट सेक्शनमधील ते मघाशी चढलेले तरुण जोडपे दोन्ही रांगांच्या मधून प्रथम-वर्गाच्या विभागाकडे धावत होते आणि ओरडत होते... ' याल्ला ! याल्ला !! '

त्या तरुणाच्या हातात एक अगदी छोटेसे, जणू खेळणेच वाटावे असे, रिव्हॉल्व्हर होते आणि त्या तरुणीच्या हातात दोन छोटे गोलक होते. ते गोलक म्हणजे साधेसुधे चेंडू नसून हातबॉम्ब आहेत हे न सांगताही साऱ्यांच्या ध्यानात आले आणि हा काय प्रकार असावा याची साऱ्यांनाच भीतीदायक

जाणीव झाली.

ते जोडपे आता फर्स्टक्लासमधून सेवा विभागात (Service Lounge) पोहोचले. कर्मचाऱ्यासाठी असलेल्या त्या विभागाच्या पुढे लागूनच विमानाच्या कॉकपीटचे दार होते. ते आतून बंद होते.

तो तरुण दारावर धक्के मारत ओरडू लागला,

'दार उघडा! दार उघडा!'

आणि त्याची साथीदारीण उतारूकडे वळून ओरडली, 'माझ्या हातातील हात-बॉम्बच्या सेफ्टी पीन्स् ओढलेल्या आहेत!'

सेवाविभागात तीन कर्मचारी होते. मुख्य कप्तान अॅब्हराहम इसेनबर्ग, त्याचा सहाय्यक श्लोमो विदेर आणि हवाई सुंदरी जेनेट देमेरजीन. शिवाय प्रथमश्रेणीत विमानाचा एक सुरक्षा अधिकारी होता. तो नेमका याच वेळी कॉकपीटमध्ये गेला होता. दुसरा मात्र टुरिस्ट सेक्शनमध्ये होता. या साऱ्या कर्मचाऱ्यांना अपहरणाच्या वेळी कसे वागावे याचे स्वतंत्र शिक्षण देण्यात आले होते. वास्तविक इस्त्रायली विमान-वाहतुकीच्या साऱ्याच सेवकांना हा शिक्षणक्रम पूर्ण करावा लागतो.

दारावरचे धक्के ऐकून आतील सुरक्षा-अधिकारी चटकन् सावध झाला व आपण आत येण्यात चूक केली हे त्याच्या लक्षात आले. दार उघडावे तर अपहरणकर्त्यांना आत येण्याची मोकळीक मिळणार म्हणून, सेवाविभागातील कर्मचारी कदाचित परिस्थिती हाताळू शकतील या आशेने तो तसाच थांबला; परंतु त्याने आपली बंदूक आता सावरली होती. या उलट दार उघडेना म्हणून ते जोडपे गोंधळात पडल्यासारखे झाले. पण एक क्षणच! दुसऱ्याच क्षणी त्या तरुणाने वळून पिस्तुलाचा एक बार काढला. ती गोळी श्लोमोच्या पाश्वात घुसली अन् तो किंचाळला; पण भान सांभाळून तो त्या जोडप्याकडे वळून म्हणाला,

'असे वेडेवाकडे वागू नका! मी वैमानिकाला दार उघडण्याची विनंती करतो.'

श्लोमोने हिब्रू भाषेत मायक्रोफोनवर कप्तानाशी बोलणी केली, पण दार उघडणे म्हणजे शरण जाणे असे कप्तानाने सांगितले. त्यामुळे दार बंदच राहिले...

दार बंदच राहिलेले पाहून तो तरुण भडकला व त्याने हवाई सुंदरी जेनेचा एका हाताने गळा पकडला आणि पिस्तुलाची नळी तिच्या कानशिलावर टेकविली. तिला दाराजवळ नेऊन तो ओरडला,

'दार उघडा! नाही तर या पोरीला मी ठार मारीन!'

आता मात्र जखमी झालेल्या श्लोमोच्या लक्षात आले की, काही तरी हालचाल करणे आवश्यक आहे. जखमेवर हात ठेवून बसलेला श्लोमो हळूच उठला. त्याबरोबर त्या तरुणाने ते पिस्तूल जेनेटच्या कानशिलावरून काढून त्याच्यावर रोखले व म्हणाला,

'जास्ती शहाणपणा करू नको. आता मी परत पायावर गोळी झाडणार नाही. माझा नेम चुकत नाही!'

'मला परत एकदा कप्तानाशी बोलू दे,' पुढे येत श्लोमो म्हणाला अन् क्षणार्धात त्याने चित्त्यासारखी उडी घेतली आणि ते पिस्तूल डाव्या हाताने उडवून दिले व त्या तरुणाचे केस धरून तो त्याचे डोके दारावर आदळू लागला. जखमी झाल्यामुळे श्लोमो अगोदरच भडकला होता. एकमेकाला झोंबत ते दोघे खाली कोसळले. त्याच वेळी ती तरुणी आणि त्या तरुणाच्या हातून निसटलेली जेनेट प्रथम श्रेणीकडे पळाल्या!

या परिस्थितीचा अंदाज घेऊन वैमानिकाने एक विलक्षण कृति केली. त्याने विमान एकदम डाव्या बाजूला वळवून त्याचे नाक खाली करून एक जोरदार सूर मारला. त्यामुळे त्या तरुणीचा तोल जाऊन ती एका प्रवाशाच्या अंगावर कोसळली. न्यूयॉर्क येथे इन्कमटॅक्स प्रॅक्टिस करणाऱ्या हॅरी क्लार्कने या संधीचा फायदा घेतला आणि अंगावर कोसळलेल्या त्या तरुणीला कवेत घेऊन आवळले. त्याही परिस्थितीत तिच्या स्तनाचा स्पर्श होताच क्षणभर का होईना हॅरी गोंधळला व त्याची पकड थोडीशी ढिली झाली.

'मी विमान उडवून देईन!' ती जोराने ओरडून म्हणाली, क्षणार्धात भानावर येऊन तिच्या धमकीकडे दुर्लक्ष करीत एका हाताने तिचा गळा आवळीत हॅरी उत्तरला,

'ठीक आहे! आपण दोघेही मरू या!' आणि त्याने तिला अधिकच आवळण्यास सुरुवात केली. त्याची पकड इतकी आवळली गेली की, तिच्या हातातील बॉम्ब्स् गळून पडले. झाले...आता स्फोट होणार म्हणून साऱ्यांनी डोळे अन् कान घट्ट मिटले. एक मिनिट, दोन मिनिटं...पाच मिनिटं झाली पण...छे! बॉम्ब्सच्या सेफ्टी पीन्स मोकळ्या केलेल्याच नव्हत्या! ती एक नुसती धमकीच होती तर! साऱ्यांनीच सुटकेचा निश्वास सोडला!

त्या वेळी टुरिस्ट सेक्शनमधल्या सुरक्षा-अधिकाऱ्याने कॉकपीटच्या दाराशी जखमी अवस्थेत त्या तरुणाशी झगडणाऱ्या श्लोमोला पाहिले व तो पुढे धावला आणि त्याने नेम धरून त्या तरुणावर तीन गोळ्या झाडल्या. तो तरुण धाडकन खाली कोसळला. श्लोमोच्या पायातून रक्ताची धार लागली होती.

तो चाललेला दंगा...विमानाने अचानक मारलेला सूर.. हातातून गळून पडलेले बॉम्ब्स् ... मारामाऱ्या ... या साऱ्यामुळे विमानात आरडाओरडा सुरू झाला... विशेषतः बायका व मुलांनी किंकाळ्या मारायला सुरुवात केली; पण वेळ ओळखून श्रीमती मोथल या मध्यमवयीन स्त्रीने एक हिब्रू लोकगीत जोरजोराने म्हणायला सुरुवात केली आणि काही क्षणातच इतरांनी आपले सूर त्यात मिसळले.

...अचानक सुरू झालेले ते अपहरण काही मिनिटातच संपले होते...अयशस्वी होऊन.

तो तरुण बेशुद्ध झाला होता आणि त्याची साथीदारीण हॅरीच्या हातात बंदिवान झाली होती. तिच्या डोक्यावरचा काळ्या केसांचा टोप अचानक खाली पडला आणि तिचे भुरे केस त्यातून बाहेर पडले...

'अरेच्या! ही तर लैला खलिद! पॅलेस्टाईनची रणचंडी! ऑगस्ट १९६९ मध्ये TWA चे विमान पळविणारी देखणी लैला म्हणजे पॅलेस्टाईनची नायिका!' नकळत त्या सुरक्षा अधिकाऱ्याच्या तोंडातून हे उद्गार बाहेर पडले आणि सारेजण भयचकित होऊन तिच्याकडे पाहू लागले.

इस्त्रायलची महान शत्रू! एवढा महत्त्वाचा ठेवा घेऊन हे विमान वास्तविक इस्त्रायलकडेच वळायला हवे होते; पण...श्लोमो विदेर अतिशय जखमी झाला होता. त्याला वैद्यकीय मदतीची आवश्यकता होती अन् ते ओळखून विमान जवळ असलेल्या लंडनच्या हिथ्रू या विमानतळावर उतरवावे लागले.

आपल्या हवाईक्षेत्रात हा अपहरणाचा

प्रकार घडला आहे. म्हणून लैलाला आपल्याच ताब्यात देण्याचा आग्रह ब्रिटिश पोलिसांनी धरला आणि अगदी अनिच्छेनेच लैलाला त्यांच्या ताब्यात देताना सारे कर्मचारी अतिशय दुखावले गेले. कायदा आंधळा असला तरी तो मोडता थोडाच येतो ?

लैलाच्या साथीदाराला हॉस्पिटलात नेले गेले; पण तोपर्यंत त्याची नाडी बंद पडली होती. त्या गोळ्यानी आपली कामगिरी बजावली होती.

मध्यंतरीच्या काळात अपहरणाची बातमी रेडिओवरून ॲमस्टरडॅमला कळविण्यात आली होती. त्यामुळे तेथील EI–AI चा सुरक्षा अधिकारी गोंधळात पडला होता. उतारू विमानात चढण्यापूर्वी त्यांची नीट तपासणी झाली नव्हती, असाच याचा अर्थ होता. लैला खलिद आणि तिचा सहकारी आरग्युलो याना जरी त्याने नजरचुकीने विमानात सोडले असले तरी त्याने इतर दोन निग्रो प्रवाशांना प्रवेश नाकारला होता. सीमो ग्वीये आणि सॅगोन दिऑप या सेनेगलच्या दोन निग्रो विद्यार्थ्यांनी न्यूयॉर्कमार्गे सॅन्टिॲगो, चिली याची फक्त एकमार्गी (one-way) तिकिटे घेतली होती. सहसा परतीची तिकिटे न घेणाऱ्याची चौकशी केली जाते. कारण ती महाग पडतात व विशेष कारणाशिवाय इतकी जास्त रक्कम देणे परवडत नाही. त्यामुळेच 'माफ करा. EL–AL 209 ची फ्लाईट फुल आहे !' असे सांगून प्रवेश नाकारला गेलेले ते दोन विद्यार्थी पॅन एम्‌च्या O93 मध्ये घुसले. कारण ही ओपन तिकिटे होती. ती कोणत्याही कपनीला चालतात.

पॅन एम्‌चे नवे 747 जम्बो धावपट्टीवरून वेगाने आकाशाकडे झेपावू लागले आणि अचानक रेडिओ सदेश आला–

'सावधान ! कीपर 03. EL AL 209 ने प्रवेश नाकारलेले दोन सशयित बहुधा तुमच्या विमानात न्यूयॉर्कला जाण्यासाठी चढले असावेत. खात्री नसली तरी त्याच्याबद्दल सशय घेण्यास जागा आहे.'

747 च्या कप्तानाने . . . प्रीडीने . . . संशयिताची नावे नोंदवून घेतली आणि तो केबिनमधून जिन्यावरून सेवाविभागात आला. त्याने प्रत्येकाचे पासपोर्ट मागण्यास सुरुवात केली. तेव्हा ते दोन विद्यार्थी उठून उभे राहिले.

'क्षमा करा, सभ्य गृहस्थहो ! पण विमानतळावरून आलेल्या संदेशानुसार तुमची झडती घेणे आवश्यक आहे. मला वाईट वाटते, पण माझा नाइलाज आहे !' प्रीडी म्हणाला.

ते दोघे चकित झाल्यासारखे दिसले; पण तितक्याच सभ्यपणे म्हणाले,

'आम्हाला याचा अर्थच समजत नाही; पण तुमची इच्छाच असेल तर आमची काही हरकत नाही.'

प्रीडीने खाद्यापासून पायापर्यंत त्यांची तपासणी केली. त्यांच्या ॲटॅचिही उचकून तपासल्या हवाई सुदरीने त्याच्या सीटस् व त्याखालील जागा तपासली. सदेश चुकीचा होता म्हणून त्याने सुटकेचा निश्वास टाकला.

'माफ करा, मित्रांनो ! हा काही तरी गैरसमज झाला असावा !' उत्तरादाखल ते दोघे हसले.

विमान न थांबता वरवर जाऊ लागले. प्रीडीने ग्राउंड कट्रोलला सदेश दिला.

'सर्व काही ठीक काळजी नसावी.'

प्रीडीने कॉकपिटमध्ये प्रवेश केला अन् तो वैमानिकाला म्हणाला, 'या लोकाना सगळीकडे अपहरणकर्तेच दिसतात. वेडे आहेत साले !'

. . .काही मिनिटांतच ग्वीये एका हातात बॉम्ब व दुसऱ्या हातात पिस्तुल घेऊन धावला. ऑगस्टा स्नायडर या हवाई सुदरीच्या कपाळावर पिस्तूल टेकवून त्याने तिच्यासह जिना चढण्यास सुरुवात केली आणि दिऑप पिस्तूल व बॉंब सावरीत साऱ्या प्रवाशांना दरडावू लागला.. आणि काही अवधीतच आकाशात हे दुसरे अपहरण सुरू झाले

'दार उघडा !' ग्वीये ओरडला. पिस्तूल तिच्या बरगडीत खुपसल्याने तिने दारावर धक्का मारला ते ऐकून फ्लाइट इजिनियरने दार किलकिले करून पाहिले आणि चटकन् दार ढकलून ग्वीयेने आत प्रवेश केला.

'हात वर करा ! हे हायजॅकिंग आहे !'

ते ऐकताच प्रीडीने मनातल्या मनात स्वत.ला एक शिवी दिली. अन् रडार कोड ३१०० चे बटन चटकन् दाबले; पण ब्रिटिश रडारच्या पडद्यावर उमटलेले ते कोड ३१०० चे ठिपके तेथील साऱ्यांनाच अपरिचित होते. नुकताच कुठे अमेरिकेत त्या सदेशाचा वापर करण्यास सुरुवात झाली होती

'कोड ३१०० . . विमानाचे अपहरण.'

इतर कोणत्याच देशात या नव्या सदेशाची माहिती नव्हती फक्त काही तरी गडबड आहे एवढे मात्र ब्रिटिश सदेशवाहकाना उमगले.

मागून आत आलेल्या दिऑपने आज्ञा केली,

'विमान परत ॲमस्टरडॅमला वळवा !' आणि प्रीडीने ते प्रचड बोइंग वेगाने मागे वळविले . . .

त्या दोघाना पाहून प्रीडीने स्वतःलाच दोष दिला. 'मीच वेडा ठरलो, झालं !'

विमान मागे वळलेले पाहताच ग्राउडने विचारलं,

'विमान परत का वळवता आहात ?'

उत्तर नाही . . .

फ्लाइट कंट्रोलरने अंदाज बाधला.

'ठीक आहे. तर ताबडतोब आठ हजार मीटर्सवर खाली या, नाही तर समोरून येणाऱ्या विमानाशी टक्कर होईल !'

पण विमान वेगाने खाली उतरू लागताच ग्वीयेला संशय आला की, विमानतळावर इमर्जन्सी लँडिंगची तयारी करीत आहेत. तेव्हा खवळून तो ओरडला,

'काय करता आहात ?' आणि त्याने पिस्तूल प्रीडीच्या मानेत खुपसले

'शांत हो ! शात हो ! आम्ही तुम्हाला हवे तेथे विमान घेऊन जाऊ !' प्रीडी म्हणाला.

'आम्हाला मध्यपूर्वेतील कोणत्याही आसरा देणाऱ्या देशात न्या !' ग्वीये ओरडला.

त्याच वेळी प्रीडीने उतारूंना मायक्रोफोनवरून अपहरणाची कल्पना दिली. विमानात एकच गोधळ माजला.

ग्वीयेने प्रीडीच्या मागच्या खुर्चीवर बैठक ठोकली आणि शातपणे तो म्हणाला,

'हे माझे तिसरे अपहरण आहे.'

या उद्‌गारांनी प्रीडीचा जीव भाड्यात पडला. कारण नवोदित अपहरणकर्त्यापेक्षा अनुभवी लोकाशी वागणे अधिक सोपे असते. कारण नवोदित माणसाचा तोल केव्हा सुटेल याचा नेम नसतो.

EL–AL च्या अयशस्वी अपहरणाची बातमी साऱ्या युरोपियन विमानतळांवरील कट्रोलरूम्समध्ये समजते न समजते तोच पॅन

## दिऑपने आज्ञा केली : 'विमान परत ॲमस्टरडॅमला वळवा'

# त्या दोघांना पाहून प्रीडी म्हणाला, ' अखेर मीच वेडा ठरलो....'

एम् च्या अपहरणाची बातमी आली आणि त्यापाठोपाठ काही वेळातच एक बोइंग 707 आणि एक DC–8 ही विमाने मध्यपूर्वेकडे जाऊ लागली होती. या आणखी दोन विमानांचे अपहरण करण्यात आले.

तो काही योगायोग नव्हता की अपघातही नव्हता. विचारपूर्वक आखलेले ते एक योजनाबद्ध असे साहसी नाटय होते. त्यात भाग घेणारी सारी पात्रे म्हणजे पॅलेस्टाइन मुक्तिसेनेचे (Popular Front For The Liberation of Palestine.) दहशतवादी सैनिक होते. १९६८ व १९६९ साली केलेल्या दोन्ही विमानअपहरणाच्या सूत्रधारांनीच ही योजना आखली होती. डॉ. वाडीफ हद्दाद या नेत्याच्या सुपीक डोक्यातून निघालेली ही साहसी पण क्रूर कल्पना असावी हे जगाला खूप उशिरा समजावयाचे होते.

१९६७ साली पॅलेस्टाइन मुक्तिसेनेचा जन्म झाला माओ आणि लेनिन याचा आदर्श ठेवून क्रांतीची स्वप्ने उराशी बाळगीत इस्रायलने अन्यायाने व्यापलेली आपली जन्मभूमी पारतंत्र्यातून मुक्त करावयाची, हा त्याचा ध्यास होता. या संघटनेचे बहुसंख्य सभासद तिशीच्या आतील होते इस्रायलने व्यापलेल्या पॅलेस्टाइनच्या निर्वासिताच्या छावण्यात वाढलेली, घाणेरड्या परिसरात किमान अन्नावर पोसली गेलेली ही नवी पिढी, उराशी इस्रायलचा द्वेष बाळगीत वाढत होती. फक्त एक गोष्ट चागली होती. UNO ने चालविलेल्या चांगल्या शाळामधून शिकून तयार झालेल्या निकृष्ट शरिराच्या पण सकस मनाच्या या पिढीत क्रातीची मुळे खोलवर रुजली होती. पॅलेस्टाइनचे स्वातत्र्य हे एकच ध्येय उराशी बाळगून या तरुण मंडळीनी PFLP ची स्थापना केली आणि तिचे नेतृत्व बैरूतच्या मेडिकल कॉलेजमध्ये शिकून डॉक्टर झालेल्या वाडीफ हद्दादकडे दिले

इजिप्तच्या नासेरने अमेरिकेच्या सागण्यावरून युनोची शांतियोजना स्वीकारली आणि युद्धतहकुबी जाहीर केली. इतर राष्ट्रानी त्याचीच री ओढली आणि खवळलेल्या PFLP ने जिवाच्या आकांताने त्याला विरोध केला; पण त्याचा आवाज कोणापर्यंत पोचलाच नाही म्हणूनच हद्दादने चार विमानांच्या अपहरणाची योजना मांडली.

त्याच्यापाशी या अपहरणाच्या विषयात तज्ज्ञ असलेली मंडळी तयार होतीच आकाशमार्गाचे नकाशे, विमानयंत्राची उत्तम जाण, विमानतळावरील सुरक्षा व्यवस्थेचे बारकावे व त्यातील उणीवा आणि इलेक्ट्रॉनिक सूचकाना न दिसणारी हत्यारे व बॉम्ब इत्यादी अनेक आयुधानी सज्ज असलेली ही मंडळी भराभर बाहेर पडली.

एकाच वेळी चार विमाने अपहरण केली जातात फक्त एक अपहरण फसते आणि इतर तीन विमाने अज्ञात स्थळी जायला निघतात. कोणाला वाटले ती क्यूबाकडे जाणार, तर कोणाला वाटले अल्जिरियाला जाणार, पण PFLP बद्दल आस्था वाटणाऱ्या अनेक देशाना सोडून ती भलत्याच दिशेने निघाली होती. जणू ती विमाने हवेतच अदृश्य झाली होती त्या तीन विमानातील शेकडो उतारूच्या नातेवाइकानाच नव्हे तर युरोप, अमेरिका व इतर देशातील राज्यकर्त्यांना व जनतेला देखील चिंतेच्या घोर समुद्रात ढकलून ती तीनही जेटस् बेपत्ता झाली होती !

◻

आधुनिक जगातील जलद वाहतुकीचे साधन म्हणजे आकाशमार्गातून वेगाने धावणारी विमाने. नेमक्या या आकाशमार्गावरच ही धाड पडली होती. शेकडो उतारूसह तीन जेट विमाने बेपत्ता झाली होती. वॉशिंग्टन येथे राष्ट्राध्यक्ष रिचर्ड निक्सन याना ही बातमी कळविण्यात आली. तसेच इग्लडचे पंतप्रधान एडवर्ड हिथ, फ्रान्सचे राष्ट्रपती आणि इतर अनेक देशाच्या राष्ट्रप्रमुखाना ही बातमी कळविण्यात आली. युरोप, अमेरिकेच्या साऱ्या राजधान्या हादरून गेल्या. फोन खणाणू लागले. वर्तमानपत्राचे रकाने फोटो व अतिरजित बातम्यानी भरून जाऊ लागले. साऱ्या जगात हाहा:कार माजला. पॅलेस्टाइनच्या दहशतवाद्यानी युरोप-अमेरिकेसारख्या भाडवलदार व पुढारलेल्या देशाना खडबडून जागे करण्यासाठी केलेला हा कट यशस्वी झाला होता. फक्त ज्या शत्रूविरुद्ध त्यांचा खरा लढा चालू होता त्या इस्रायलने मात्र हा डाव हाणून पाडला होता. ...लैला खलिदवर प्रश्नाचा भडिमार चालू होता अन् ती शांतपणे बोलत होती.

'जगात कोणीही तटस्थ असूच शकत नाही. एक तर तो दडपशाही करणारा असतो वा दडपलेला असतो. स्वतःला तटस्थ व निष्पाप समजणारे ढोंगी असतात.'

'तुझा शेवट वाईट रीतीने होऊ शकतो. त्यापेक्षा तुझ्या सहकाऱ्याची नावे, त्यांचा ठावठिकाणा आणि इतर माहिती देऊन मोकळी का होत नाहीस ? तुझ्याबद्दल आम्ही सहानुभूतीने विचार करू.'

मुख्य अधिकाऱ्याने तिला सागून पाहिले.

'माझा शेवट होण्याचा प्रश्नच उद्भवत नाही माझे सहकारी स्वस्थ बसणार नाहीत. ते मला सोडविल्याशिवाय राहणारच नाहीत!' जसा तिच्या उद्गारात तसाच तिच्या चेहऱ्यावरही विलक्षण आत्मविश्वास दिसत होता.

लैलाच्या या विधानावर कुत्सितपणे हसणाऱ्या ब्रिटिश पोलिस अधिकाऱ्याना हे माहीत नव्हते की, आता आपले हसताना दिसणारे दात आपल्याच घशात जाणार आहेत.

◻

जॉर्डनची राजधानी अमानपासून साधारण ५५ किलोमीटर्सवर एक जुनाट धावपट्टी वाळवटात अंगावरची वाळू झटकीत शातपणे पडून होती. दुसऱ्या महायुद्धात ब्रिटिश हवाईदलाच्या लोकानी तात्पुरत्या स्वरूपाची ही पट्टी बाधून घेतली होती आणि तिला चीफ एअर मार्शल सर डावसन यांचे नाव दिले होते. महायुद्ध सपल्यानतर ती पूर्णपणे दुर्लक्षित झाली होती. हीच धावपट्टी दहशतवाद्यानी आपल्या ताब्यात घेऊन तिची जुजबी दुरुस्ती केली, दिवे लावले अन् त्या भागाला नाव देण्यात आले 'क्रातिकारकांचा विमानतळ.'

हिवाळ्यात पडणाऱ्या पावसामुळे ती धावपट्टी जलमय होऊन जाते; एरवी वर्षभर ती पूर्णपणे कोरडी व सपाट असते. या धावपट्टीला जोडणारा एकही रस्ता नाही. आसपास वस्तीही नाही.

TWA चे 707 बोइंग फ्रँकफूर्टहून निघाले होते. ५१ वर्षांचा अमेरिकन वैमानिक–कॅरोल वुडस् ते चालवीत होता. त्याच्या मानेशी पिस्तुलाची नळी लावून बसलेल्या आकर्षक मुलीने त्याला नकाशा दाखवून त्या धावपट्टीची माहिती दिली. उतरत्या उन्हात त्या भागावर बऱ्याच चकरा मारून तो दमला; पण त्याला ती धावपट्टी काही

दिसेना; परंतु सूर्यास्तानंतर थोड्याच वेळाने त्या अंधारलेल्या वाळवंटात पॅराफिनच्या समांतर दिव्यांची रांग दिसली अन् त्याने चटकन् त्या मुलीला ते दिवे दाखविले.

'हीच ती क्रांतिकारकांची धावपट्टी!' ती मुलगी ओरडली.

काही क्षणातच ते विमान धावपट्टीच्या दिशेने झेपावू लागले. धावपट्टीजवळ आल्यावर धावपट्टीच्या दोन्ही बाजूंना उभे असलेले सशस्त्र दहशतवादी सैनिक दिसले. वैमानिकाला भिती वाटली की विमान त्यांच्यावरून तर जाणार नाही ना! आणि विमान कसेबसे त्या धावपट्टीवर उतरले.

विमान थांबताच टुरिस्ट क्लासमध्ये पेंगत असलेल्या एका भारतीयाने शेजाऱ्याला प्रश्न केला,

'न्यूयॉर्क? न्यूयॉर्क?' जणू त्याला वाटत होते, ते विमान न्यूयॉर्कलाच उतरले आहे आणि लवकरच आपण गगनचुंबी इमारतींच्या चकाकत्या नगरीत विहार करू.

उत्तराऐवजी दार उघडून धडाधड आत शिरलेले सशस्त्र सैनिक पाहून तो अतिशय भांबावून गेला. आणि त्याने शेजाऱ्याला परत विचारले,

'न्यूयॉर्कच्या विमानतळावर सैनिक-उतारूंची तपासणी करतात का?'

शेजाऱ्याने कपाळावर हात मारून घेतला अन् तो एवढेच बोलला,

'नो न्यूयॉर्क! हायजॅकिंग! दे आर पॅलेस्टिनिअन गोरिलाज्!'

आत आलेल्या दहशतवाद्यांनी बंदुका सावरल्या; परंतु ते अतिशय सभ्यपणे वागत होते. ते लुटारू किंवा चाचे नव्हते. अतिशय शिस्तबद्धतेने त्यांनी विमानाचा ताबा घेतला.

'कोणीही वेडेवाकडे वागू नका! आम्ही तुम्हाला त्रास देणार नाही!' त्यांच्या पुढाऱ्याने प्रथमच जाहीर केले.

त्यांनी सर्वांचे पासपोर्ट, इतर कागदपत्रे गोळा केली व स्वतःचे फॉर्म्स देऊन उतारूंना ते भरण्यास सांगितले. एखाद्या मोठ्या विमानतळावर कागदपत्रांची छाननी व्हावी तसेच सारे चालले होते.

तोच आकाशातून घरघर ऐकू लागली. आणि पाठोपाठ स्विस ऐअरचे DC-8 खाली उतरू लागले. ते झुरिचहून निघाले होते. वाटेतच त्याला जॉर्डनकडे वळविण्यात आले. इस्रायलच्या अतिशय कार्यक्षम व चोख रडारवर टिपण्यात आलेल्या या विमानाला लाड विमानतळावरील ग्राउंड कंट्रोलने संदेश दिला, '२६० मार्गाकडे चला! म्हणजेच तेलअव्हीवच्या विमानतळावर उतरा.' पॅलेस्टिनिअन गोरिलाजनी अपहरण केलेले विमान इस्रायलमध्ये उतरविणे म्हणजे धोक्याला निमंत्रण हे विमानाचा कप्तान टेड प्रेवरने ओळखले व तो उत्तरला, 'आभारी आहोत. आमंत्रण स्वीकारणे अशक्य आहे!' आणि अखेर ते विमान गिया–खानाच्या क्रान्तिकारी धावपट्टीवर उतरले.

स्विस जेटमध्ये शिरून कागदपत्रांची तपासणी सुरू करीत एक दहशतवादी म्हणाला,

'तसदीबद्दल क्षमस्व! पण आमचा आवाज जगाच्या कानावर पोहोचविण्याचा दुसरा कोणताच मार्ग आमच्यापुढे शिल्लक नव्हता!'

'चांगल्या व शान्तिपूर्ण मार्गाने हे साधता आले नसते का?' एका स्त्री उतारूने विचारले.

'तुमचे देश व तुमची सरकारे चांगली व न्यायप्रिय असती, तर फार बरे झाले असते!' तो शांतपणे उत्तरला.

रात्रीचा अंधार पसरू लागला होता. विमानात लाइट्स नव्हते. खाद्यपदार्थांची टंचाई होती. त्या वाळवंटात या गोष्टी थोड्याच उपलब्ध होणार होत्या? टॉर्चच्या प्रकाशात शक्य ती सारी कामे उरकली जात होती. अंधाराबरोबर उदासीनता वाढत होती आणि लोकांचे मनोधैर्य खचत चालले होते.

सकाळी सूर्यनारायणाने किरणांचा प्रकाश वाळवंटावर टाकला आणि ती दोन विमाने... विसाव्या शतकातील आधुनिक तंत्राची साक्ष देणारी ती आकाशयाने वाळवंटात चोची खुपसून बसलेल्या शहामृगाप्रमाणे स्वस्थ बसली होती. आसपास दहशत-




आपल्या लहानग्याला डेन-टॉनिक वेळीच दिल्याने दात येते वेळी होणाऱ्या त्रासापासून त्याला आराम मिळेल व दात सुलभतेने येतील. मुलांना आनंदी ठेवा. खेळकर बनवा. डेन-टॉनिक द्या.

होमिओचे
डेन-टॉनिक

होमिओ लॅबोरेटरीज्
राममोहन रूपस्कूल शेजारी, गिरगाव, मुंबई-४

वाद्यांच्या राहुट्या पसरल्या होत्या. त्यांवर मुक्तिसेनेचा झेंडा फडकत होता. आणि दूर अंतरावर जॉर्डनच्या अधिकृत लष्कराचे रणगाडे व जीप्स सज्ज उभ्या होत्या. दहशतवाद्यांना तेवढीच काय ती दहशत होती.

पाण्याची टचाई अन् निराशेचा पगडा यातच दहशतवाद्यानी आणलेले अरबी पावमटण उत रूनी कसेबसे पोटात कोंबले आणि खिडकीतून दिसणाऱ्या सूर्यकिरणात सुटकेचे किरण कोठे दिसतात का, ते पाहू लागले. दोन्ही विमानात मिळून २८६ उतारू व २२ कर्मचारी होते.

दुपारी बारा वाजता वाळवंट जसे तापू लागले तसा भावनांचा प्रक्षोभ वाढत होता. आता यातून कोणता मार्ग निघणार? कसा निघणार? केव्हा निघणार? हे प्रश्न साऱ्यांच्या मनात घोघावत होते.

त्याच वेळी एक काळी शेव्हर्लेट गाडी विमानाजवळ आली. त्यातून जॉर्डन लष्कराचा प्रमुख, मार्शल हृदिथा बाहेर आला आणि दहशतवाद्यांच्या पुढाऱ्याशी— अबु फादी याच्याशी बोलू लागला,

'जॉर्डनच्या राजाना या गोष्टीचा धक्का बसला आहे. अरब जगताच्या अतिथ्यशीलतेला तुम्ही या कृत्याने डाबर फासले आहे शरमेने आमच्या माना जगापुढे झुकल्या आहेत.' आणि क्षणभर थांबून तो हळूच म्हणाला, 'कदाचित् राजा हुसेनना नाइलाजाने लष्कराचा वापर करून उतारूंची सुटका करावी लागेल...'

एक क्षणही न थांबता अबू फादी झटकन् उत्तरला,

'तर मग उतारूंसह दोन्ही विमाने आम्ही उडवलीच म्हणून समजा!'

अखेर बरीच बाचाबाची होऊन त्यावर तोडगा निघाला. स्त्रिया व मुलांना सोडण्यात यावे. याउलट जॉर्डनच्या लष्कराने विमानापासून एक किलोमीटर अंतरापर्यंत माघार घ्यावी. थर्मामीटरमधील पारा थोडा खाली उतरला.

TWA च्या विमानातील तपासणीत एकही इस्रायली पासपोर्ट सापडू नये याचे दहशतवाद्याना अतिशय आश्चर्य वाटले. कारण ते विमान तेलअव्हीवहून निघाले होते. त्यामुळे ते गोंधळून गेले; पण मध्यतरी विमानातील स्वच्छता करण्यासाठी विमानाखाली खड्डे खणण्यात आले होते. त्यातील घाणीच्या बुट्या तपासण्यात आल्या आणि गमत अशी की त्यात अनेक फाडलेले इस्रायली पासपोर्ट मिळाले. त्यामुळे हॅन्डबॅग्ज वगैरे तपासून अधिक पासपोर्टस् बाहेर काढण्यात आले. काहीना इस्रायल व अमेरिकेचे नागरिकत्व होते. बरेचसे अमेरिकेत वास्तव्य करून होते; पण एक कटू सत्य म्हणजे ते सारे ज्यू होते आणि हाच त्यांचा अपराध होता.

स्त्रिया व मुलांना जॉर्डन आर्मीच्या ताब्यात देण्यात आले; पण त्यात एकाही ज्यूला सोडण्यात आले नाही नीतिअनीतीची तत्त्वे पायदळी तुडविली की मग सारासार विवेकबुद्धी नष्ट होते हेच खरे. काही कुटुंबाची ताटातूट होताना हृदयद्रावक प्रसंग घडून आले.

एका अमेरिकन मैत्रिणीचा निरोप घेताना तिच्या ज्यू मित्राच्या डोळ्यात अश्रू आले.

'आम्ही इस्रायलमध्ये किबूटझमध्ये महिनाभर होतो. अमेरिकेत गेल्यानतर लग्न करायचे आम्ही निश्चित केले होते. आयुष्यात पहिल्यादाच मला अश्रू आवरता आले नाहीत.' तो प्रियकर गहिवरून उद्‌गारला.

एका अमेरिकन स्त्रीला तिच्या सात वर्षांच्या मुलीला घेऊन विमानातून उतरताना अडविण्यात आले. का? ती मुलगी ज्यू बापापासून झाली होती. सारे अवाक् झाले; पण बऱ्याच चर्चेनंतर त्यांची समजूत पटविण्यात आली आणि त्या मुलीला आईबरोबर जाऊ देण्यात आले.

स्त्रिया व मुलांच्या स्वातंत्र्याकडे घेऊन जाणाऱ्या बसेस सुटल्या न सुटल्या तोच पॉप्युलर फ्रंटच्या प्रमुखाकडून अमानहून रेडिओसंदेशावरून विचारणा झाली.

'तुम्ही एकही ब्रिटिश नागरिक सोडलेला नाही ना?'

'या दोन्ही विमानात एकही ब्रिटिश नागरिक नाही, पण हे कशासाठी विचारता आहात?'

प्रश्नाचे उत्तर येण्याऐवजी प्रश्नच विचारण्यात आला,

'दोनही विमानात एकही ब्रिटिश नागरिक नाही?'

संदेश थांबविण्यात आला. नवा पेचप्रसंग निर्माण झाला होता पॅलेस्टाईन मुक्तिनाट्याची नायिका लैला खलिद लडनपोलिसाच्या तावडीत सापडली होती आणि क्रांतिकारक धावपट्टीवर उतरलेल्या दोन्ही विमानात इंग्लंडचा एकही नागरिक नव्हता. ब्रिटिशांच्या ताब्यात सापडलेला हा मौल्यवान ठेवा सोडविण्याचा कोणताच मार्ग सापडत नव्हता शिवाय पळवून नेलेल्या पॅन एम् 747 चा संदेश अजून आलेला नव्हता. दुर्दैवाने लैला अपहरणात अयशस्वी झाली होती, पण या अयशस्वी नायिकेने १९६८ व १९६९ ही वर्षे आपल्या प्रखर कर्तृत्वाने गाजवून टाकली होती आणि युरोप–अमेरिकेतील देशाच्या विमानवाहतुकीच्या जगात आगळाच दरारा निर्माण केला होता. इस्रायलने अपहरण तर अयशस्वी केलेच; पण लैलाला पकडून 'मुक्तिसेनेचे' नाकच कापले होते.

म्हणूनच अमान येथे PFLP च्या नेत्याची बैठक झाली आणि लैलाच्या मुक्तीचा ठराव समत करण्यात आला काहीही करून लैलाला सोडविणे जरुरीचे होते. त्यावर अनेक तास चर्चा झाली, वाद झाले अन् अखेर मार्ग निघाला...

अपहरणकर्त्यांचे गणित अखेर थोडक्यात चुकलेच. चार विमाने पळविण्याची योजना आखून चार दिशाना धावलेले ते दहशतवादी इस्रायलच्या दणक्यात सापडले. EL–AL च्या काकदृष्टीने अचूक टिपून खड्यासारख्या वगळण्यात आलेल्या ग्वीये व दिऑपने जेव्हा राक्षसी 747 बोईंग ताब्यात घेतले तेव्हा थोड्याच वेळात त्याना कळून चुकले की, हे प्रचड विमान गिआ–खानाच्या म्हणजेच क्रांतिकारक धावपट्टीवर उतरू शकणार नाही. त्यामुळे काही काळ ते गोंधळात पडले. कारण मुळात 747 जंबो जेट पळविण्याची योजनाच तयार करण्यात आली नव्हती. EL–AL ने खोडा घातला म्हणून दिऑप व ग्वीयेंना आपला मोर्चा या विमानाकडे वळवावा लागला अन् नतर त्याच्या लक्षात त्याची चूक आली; पण आता उशीर झाला होता.

प्रीडीच्या मानेला पिस्तूल लावून ग्वीये शातपणे बसला होता; पण सलोनिकावरून उडत असताना पिस्तुलाची नळी बाजूला झाल्याचे प्रीडीच्या ध्यानात आले. त्याने

## 'तर मग उतारूंसह दोन्ही विमाने आम्ही उडवलीच म्हणून समजा!'

मागे वळून पाहिले. ग्वीये अन् फ्लाइट इंजिनियर दोघेही टॉर्चच्या प्रकाशात काही तरी शोधत होते. प्रीडीने प्रश्न केला,

'काय भानगड आहे ?'

'त्याच्या हातातील बॉम्बची कळ हरवली आहे.' फ्लाइट इंजिनियरने उत्तर दिले.

हे संशोधन चालू असताना ग्वीयेने हात-बॉम्बच्या कळीच्या भागावर आपला अंगठा दाबून धरला होता. थोड्याशा चुकीनेही विमानातील १५२ उतारू आणि १७ कर्मचारी प्राणास मुकणार होते; पण सुदैवाने ती कळ सापडली व तावडतोब बॉम्बला बसविण्यात आली.

सेवाविभागात हवाई सुंदरी ऑगस्टा दिऑपच्या पुढ्यात उभी होती. त्याने तिच्याकडे संत्र्याच्या रसाची मागणी केली. रसाचा ग्लास पुढे करताच दिऑप म्हणाला,

'तू थोडे पिऊन दाखव.'

ऑगस्टाच्या लक्षात आले की, त्याला आपण त्यात एखादी झोपेची गोळी तर मिसळली नसावी ना, अशी शंका आली असावी. तिने थोडासा रस घेतल्यानंतर त्याने तिच्या हातातूनच ग्लास तोंडाला लावला. त्याबरोबरच तिने खाद्यपदार्थांची एक बशीही पुढे केली. दिऑप भुकेला तर होताच; पण एका हातात पिस्तूल व दुसऱ्या हातात हातबॉम्ब होता. त्यामुळे त्याला ती बशी घेता येईना.

'तो हातबॉम्ब मी काही वेळ सांभाळू शकेन!' ऑगस्टा मिस्किलपणे म्हणाली.

तो गोंधळात पडला; पण क्षणभरच. त्याने चटकन हातबॉम्ब तिच्यापुढे केला. तिने तो हातात घेत प्रश्न केला,

'मी हा तुझ्या विरुद्ध वापरला तर ?'

'तर ... तर ... आपण कोणीच शिल्लक राहणार नाही, हे समजण्याइतकी तू खचितच शहाणी आहेस!'

त्याच्या या उत्तराने ती हसली. तिच्या मनावरचे दडपण थोडेसे का होईना, दूर झाले.

रात्रीच्या अंधारात ते बैरूतवर पोहोचले; परंतु त्या वेळी लेबानीज गव्हर्मेंट PFLP ना प्रतिकूल होते. त्यातून मुक्तिसेनेचे नेते क्रांतिकारकांच्या धावपट्टीवर त्यांची वाट पाहात होते. त्यामुळे बैरूतवर त्या विमानाच्या फेऱ्या सुरू झाल्या आणि ग्वीयेने खाली विमानतळावर संदेश पाठविला.

'PFLP च्या प्रतिनिधीला विमानतळावर बोलवा!' पण तो प्रतिनिधी सापडायला एक तास लागला आणि त्या काळात ते राक्षसी बोईंग अक्षरशः अधांतरी तरंगत होते. त्यातून त्या प्रतिनिधीची ग्वीये वा दिऑपशी ओळखच पटेना. त्यांच्या वादावादीत पंधरा मिनिटे गेली. तेवढ्या अवधीत विमानतळावर लेबनीज लष्कराची वाहने आणि माणसे जमा झाली. ते कळताच ग्वीये अधिकच भडकला. तो त्या PFLP च्या प्रतिनिधीवर रागावून बोलू लागला. त्याला मध्येच थांबवून प्रीडी म्हणाला,

'आता फक्त पंधरा मिनिटांचे इंधन शिल्लक आहे. निर्णय लवकर व्हायला हवा!'

हे ऐकताच लेबनीज लष्कराने विमान उतरू न देण्याचा निर्णय मागे घेतला आणि ते विमान बैरूतच्या धावपट्टीवर अलगद उतरले.

विमानतळावर पिवळ्या जीपमधून PFLP चा प्रतिनिधी आला अन् त्याने ओळखपत्र दाखविताच ओळख पटली; पण त्याबरोबरच त्याने एक लेखी संदेश दाखविला.

'कैरोला विमान न्या आणि नासेरच्या युद्धतहकुबीचा निषेध करा!'

'पण निषेध करायचा कसा ?' ग्वीयेने विचारणा केली.

'सँडविचेस!' उत्तर आले.

'सँडविचेस'... याचा अर्थ ... स्फोट...

थोड्याच वेळात PFLP चे आणखी सहा प्रतिनिधी विमानात चढले अन् हातातली पिस्तुले सावरीत ते प्रवाशांशी गप्पा मारू लागले. चहा-कॉफी देण्यात आली.... विमानात इंधन भरणे चालू होते; पण त्यातलेच दोन प्रतिनिधी हळूच विश्रांती व स्नानगृहात शिरले होते. त्यांनी बरोबर आणलेली अत्यंत कार्यक्षम स्फोटके बेसीन्स्, टब इत्यादींच्या मागच्या भागात चिकटवून टाकली होती.

विमानातील प्रवासी अन् कर्मचारी; अपहरणकर्ते व मुक्तिसेनेचे प्रतिनिधी यांच्याशी राजकीय गप्पा मारण्यात मशगुल झाले होते. स्नानगृहात काय चालले आहे हे त्यांना कळले असते तर सारेजण हादरून गेले असते.

त्यातील काही प्रतिनिधी हिरवा कंदील मिळताच विमानातून उतरून निघून गेले आणि विमान पुन्हा वर आकाशात जाऊ लागले. स्वनाशाची सर्व तयारी करून ते विमान ढगातून कैरोच्या दिशेने झेपावले आणि शांतपणे ते दोन स्फोटतज्ज्ञ विमानाच्या स्नानगृहातून रुमालाने तोंड पुशीत बाहेर आले. प्रवाशांना वाटले ते आपले धुतलेले चेहरे पुशीत आहेत. ते घाम पुसताहेत हे कुणाच्याच लक्षात आले नाही.

दोन तासांनी विमान कैरोवर घिरट्या घालू लागले. एका प्रतिनिधीने ऑगस्टाला विचारले,

'मला काड्यांची पेटी मिळेल का ?'

'विमान काही वेळातच खाली उतरण्याची तयारी करीत आहे. तो पहा कैरोचा विमानतळ!' खिडकीतून खाली बोट दाखवीत ती म्हणाली.

'धूम्रपान मना है' चा बोर्ड चमकू लागला हे तिने त्यांच्या निदर्शनास आणले. त्याच वेळी ग्वीये कॉकपिटमधून बाहेर आला व म्हणाला,

'तुम्हाला उतरण्यासाठी आठ मिनिटांचा अवधी आहे!' कर्मचाऱ्यांनी इमर्जन्सी डिबार्केशनची (तातडीने उतारूंना बाहेर काढणे) तयारी केली.

'पण मला काड्याची पेटी हवीच आहे!' तो मघाचाच प्रतिनिधी धारदार आवाजात ऑगस्टाला म्हणाला. ग्वीयेने तिच्याकडे रोखून पाहिले. तिने आपल्या हातातील काड्यापेटी त्याच्याकडे दिली. त्याने चटकन् स्नानगृहाच्या दारातून बाहेर काढलेल्या फ्यूजेस पेटविण्यास सुरुवात केली. तेव्हा कोठे ऑगस्टा आणि इतरांच्या लक्षात आले की, काय प्रकार चालला आहे.

विमान त्या वेळी शंभर मीटर्स उंचीवर होते; परंतु हा प्रकार प्रीडीच्या लक्षात आणून देताच त्याने त्या राक्षसी विमानाचे ताकदवान ब्रेक्स झटकन् लावले आणि धावपट्टीच्या सुरुवातीच्या भागातच विमान जोराने थांबले. कर्मचाऱ्यांनी विमानाचे दार अक्षरशः ढकलून उघडले.

त्या उंच विमानाला एक वेगळा असा मजला दाराशी जोडण्यात येतो. कारण इतर विमानांप्रमाणे याला उतरणारी शिडी चालत नाही; पण तो मजला जोडण्याइतपत अवधी

होताच कोठे ? त्यामुळे इमर्जन्सी स्लाइड्स् आपोआपच फुगविण्यात आले होते आणि अक्षरशः दीड मिनिटात सारे उतारू त्या स्लाइड्स्वरून ढकलून बाहेर काढण्यात आले आणि इतर कर्मचाऱ्यांनीही धावण्यास सुरुवात केली.

अगदी शेवटपर्यंत ग्वीये पिस्तूल रोखून उभा होता. तो चटकन् उठला आणि प्रीडी व त्याच्या सहकाऱ्याला म्हणाला,

'मित्रानो, आता आपण पळू या ! गुड-लक ! गुड बाय ! '

आणि त्या तिघानी कॉकपिटच्या दारातून उडया घेतल्या. ते विमानाच्या पंखाखालून धावत असतानाच पहिला स्फोट त्यांच्या कानावर आदळला. प्रीडीच्या मानेवर त्या हादऱ्याने धक्के बसल्यागत होताच तो आणखी वेगाने धावत सुटला. त्याच वेळी रायफलच्या गोळयाचे आवाज ऐकू येऊ लागले आणि सारे जण जवळच उभ्या असलेल्या चार-पाच एअरबसेसमध्ये घुसत होते.

ग्वीये धावत असतानाच इजिप्शियन सैनिकांनी त्याला पकडले. PFLP च्या इतर प्रतिनिधीनाही सैनिकानी घेरून टाकले; पण विरुद्ध दिशेने पळत असणाऱ्या ऑगस्टाने पाहिले. . . .

त्या स्फोटात हादरणाऱ्या विमानाच्या ज्वाळात चमकणारा दिऑपचा चेहरा तिला काही अंतरावर दिसला. अतिशय समाधानाने व विजयी मुद्रेने तो ते स्फोट पाहात उभा होता. त्याच वेळी शेजारून पळत जाणाऱ्या एका मध्यमवयीन अर्जेंटिनाच्या स्त्री उतारूला त्याने पाहिले. तो चटकन् पुढे झाला व त्याने तिला पडता पडता सावरले तिचा एक पाय मोडला होता. त्यामुळे तिला पळता येत नव्हते. त्याने आधार देऊन तिला एका बसजवळ आणले. दुसऱ्या एका म्हाताऱ्या प्रवाशाच्या डोक्याच्या जखमेतून रक्त वाहात होते. दिऑपने आपला रुमाल चटकन काढून त्याच्या डोक्याला बांधला. मघाशी निष्ठुरतेने वागणारा हाच तो एक अपहरणकर्ता आहे हे ऑगस्टाला खरे वाटेना. तिला वाटले बहुधा इजिप्शियन पोलिसापासून बचाव व्हावा म्हणून तर त्याने हा पवित्रा स्वीकारला नसावा ना ? मग आपणच त्याला पकडून द्यायला हवे असा विचार तिच्या मनात येतो न येतो तोच जवळ आलेल्या इजिप्शियन पोलिसापुढे जात दिऑप म्हणाला,

'मी दिऑप, दुसरा अपहरणकर्ता!' आणि त्याने शांतपणे हातकड्यासाठी आपले हात पुढे केले.

थोड्याच वेळात दुसऱ्या एका PANAM च्या विमानाने त्या सर्व उतारूना व कर्मचाऱ्याना घेऊन न्यूयॉर्ककडे उड्डाण केले. कैरोच्या विमानतळावर प्रत्येक स्फोटाबरोबर विमानाच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडत होत्या आणि त्याच वेळी या येणाऱ्या साऱ्या बातम्यांनी इजिप्तचे अध्यक्ष नासेर याच्या काळजाचा ठाव घेतला होता. या अपहरणाच्या बातम्या कदाचित त्यांची अखेरच जवळ आणत असाव्यात

**( उत्तरार्ध पुढील अंकी )**


## प्रकाशित झाले

# टच

कालच्या
बायसिकल थीव्हजपासून
आजच्या
चोमाना डुडीपर्यंतच्या
पंधरा
देशी-विदेशी
चित्रपटांची
ओळख

अशोक
प्रभाकर
डांगे

राजहंस प्रकाशन, पुणे ३०.
दहा रुपये


टॉलस्टॉय पुस्तक योजनेतील सभासदानी आपले पुस्तक ५ डिसेंबरपासून संस्थेच्या कार्यालयातून घेऊन जावे.

पुस्तके

# भूमिपुत्र

## तटस्थ वृत्तीचा अभाव

कोणत्याही माणसाचे चरित्र लिहायचे म्हटले की त्या माणसाचे जीवनकार्य समजावून घेणे आवश्यक आहेच; पण त्याहूनही त्या कार्याचा मागोवा तटस्थ वृत्तीने घेणे हे अधिक आवश्यक आहे. 'भूमिपुत्र' हे राजा मंगळवेढेकरांनी लिहिलेले विखे पाटील याचे चरित्र आहे ही शका प्रथमपासूनच येते. हे चरित्र लिहिताना लेखक विखे पाटील यांच्या कार्याने भारावून गेला आहे व त्यामुळे या तटस्थ वृत्तीचा अभाव इथे प्रकर्षाने जाणवतो.

विखे पाटील याचे नाव केवळ प्रवरेच्या परिसरातच नाही तर महाराष्ट्रातील औद्योगिक क्षेत्रात सर्वश्रुत आहेच. एका गरीब शेतकरी कुटुंबात जन्म घेतलेल्या त्या माणसाने, औद्योगिक प्रगतीसाठी स्वत:चे आयुष्य वेचले. कारखानदारीच्या क्षेत्रात खाजगी मालक आणि बडे भाडवलदार यांचीच मक्तेदारी असताना सहकाराचे तत्त्व हे त्यानी आपल्या जीवनाचे ध्येय मानले. त्यासाठी उभी हयात कष्ट घेतले. त्याच्याच परिश्रमातून अखिल भारतातील पहिला सहकारी साखर कारखाना प्रवरा येथे उभा राहिला. औद्योगिक क्षेत्राप्रमाणेच शैक्षणिक, सास्कृतिक आणि सामाजिक प्रगतीसाठी त्यानी प्रयत्न केले.

विखे पाटील याच्या या कार्याचा आढावा एकूण चार भागात घेतला आहे. हे चार भाग काळानुसार आणि त्यांच्या कर्तृत्वविकासानुसार पाडले आहेत. विखे पाटील याचे चरित्र लिहिताना १९०१ ते १९६४ या काळातील महाराष्ट्रातील सांस्कृतिक आणि सामाजिक जीवनाचे चित्रण, त्यातील ठळक वैशिष्टये आणि घडून आलेले बदल याचे वर्णन वारकाव्याने केले आहे. विसाव्या शतकाच्या सुरुवातीला शेतकऱ्यांची स्थिती अत्यत हलाखीची होती. सावकाराकडून होणारे अत्याचार, जबरदस्ती आणि ४।५ वर्षांनी सामोरे जायला लागणारा दुष्काळ यामुळे शेतकरीवर्ग हवालदिल झाला होता. त्याच्या कर्जबाजारीपणाचे वर्णन करताना मंगळवेढेकर लिहितात. '...१८९९ ते १९०० च्या दुष्काळानंतर मुबई प्रातातील एकचतुर्थांश शेतकऱ्याना आपल्या जमिनी सोडाव्या लागल्या. या संदर्भात बोलताना 'रॉयल कमिशन ऑफ अॅग्रिकल्चर'ने लिहिले आहे की, शेतकरी हा कर्जात जन्माला येतो, कर्जात वाढतो आणि कर्जातच मरण पावतो. शेतकरी आणि कर्ज यांची सांगड ही जवळजवळ १०० वर्षांपेक्षा जास्त काळाची आहे...'

अस्पृश्यतेच्या भ्रामक पण खोलवर रुजलेल्या कल्पनांचे वर्णन करताना त्यानी दिलेले उदाहरणही असेच बोलके आहे. 'पोथी चाललेली असायची. वक्ता नि श्रोते तल्लीन असायचे; पण तेवढचात जर काठीच्या घुंगुराचा आवाज आला तर ताबडतोब पोथीवाचन बंद व्हायचे. काठीच्या घुगुरावरून कळायचे की कोणी अस्पृश्य दारी येत आहे. तो येत आहे हे कळावे म्हणूनच काठीला घूघुर लावलेले असायचे. कारण पोथीपुराणातला पवित्र शब्द त्या पाप्याच्या कानी पडून तो विटाळू नये याची ती खबरदारी घेतलेली असे!'

अशा प्रकारचा अशिक्षित समाज, शेतकऱ्यांची विकट परिस्थिती या पार्श्वभूमीमुळे विखेपाटील याचे कर्तृत्व अधिक उठून दिसते. विखे पाटील यांचे व्यक्तिचित्रण करताना त्याच्या लहानपणापासूनचे अनेक लहान-मोठे प्रसंग लेखकाने रंगवून सांगितले आहेत; पण या प्रसंगावर स्वत:चे भाष्य करायचा मोह लेखकाला टाळता आलेला नाही. त्यामुळे पाल्हाळ लावल्यासारखे झाले आहे. 'पेरणी जवळ आली असताना बैलांना खायला घालायला वैरण नाही म्हणून हताश झालेल्या महाराला विखे पाटील यांनी आपणहून मदत केली.' आता हा प्रसग विखे पाटील यांच्या करुणेची साक्ष पटविणारा आहे का बाणेदारपणा दाखविणारा आहे हे समजण्याइतका वाचक नक्कीच सुज्ञ असतो, पण अशासारख्या लहान-लहान प्रसंगांवर सुद्धा लेखकाने अनावश्यक भाष्य केले आहे त्यामुळे सुरुवातीलाच म्हटल्याप्रमाणे हे एक केवळ स्तुतिस्तोत्र म्हणून लिहिले आहे की काय अशी शंका पुन्हा पुन्हा येते. अर्थात विखे पाटील यांचे व्यक्तिचित्र प्रसंगामधून उभे केल्यामुळे ते अधिक चागले वठले आहे हे नाकारता येणार नाही. त्यांच्या न्यायी वृत्तीचे दर्शन घडविताना; हरवलेली घोडी कोणाची हे ठरविताना पाटलांनी दाखविलेले व्यवहारचातुर्य, भाडवलशाहीची चाहूल लागल्यावर त्यांची सहकारी कारखान्याची योजना, शेअर्स खपविताना आलेले अनुभव, दागिने गहाण टाकून शेअर्स घेणारे शेतकरी, पाटलांवरचा त्यांचा विश्वास, पण विलंब लागल्यामुळे या वर्गात निर्माण झालेली बेचैनी हे सर्वच प्रसंग लेखकाने वारकाव्याने मांडले आहेत. काही वेळी मात्र ते वस्तुस्थितीशी विसंगत वाटतात. उदाहरणार्थ शेअर्स्‌मध्ये गुतविलेले पैसे कुणी परत मागायला आले की विखे पाटील सागायचे, 'पैसे मागायचा अधिकार माझा आहे. पैसे परत द्यायचा अधिकार मात्र मला नाही!' असे स्पष्टपणे सांगूनही शेतकरी पैसे द्यायचे. एका शेअरसाठी तीनशे रु. देणे हे कर्जबाजारी असलेल्या शेतकऱ्याना नक्कीच जास्त होते. तरीही ते हे पैसे द्यायचे, 'खुशीने द्यायचे' अशासारखे प्रसंग खटकतात.

विखे पाटील यांचे व्यक्तिचित्र रंगविताना कारखान्याचा एक यशस्वी सूत्रधार व चालक, जागृत नागरिक, अस्पृश्यांचा उद्धारकर्ता, स्त्रीशिक्षणाचा पुरस्कर्ता यासारख्या विविध भूमिकांमधून त्याचे दर्शन लेखकाने घडविले आहे. या विविध भूमिका पार पाडताना विखे पाटील याचे अंदाज, काम करण्याची पद्धत, विचार अगदी बरोबरच असत, असे लेखक प्रत्येक ठिकाणी पटवून देतो; पण पुस्तकाच्या शेवटी मात्र तो जाता जाता का होईना एक मोघम उल्लेख करतो, की 'हा प्रपच माडताना कधी त्यांना कुणाला दुखवावे लागले असेल, कधी कुणी अजाणताही दुखावला गेला असेल, क्वचित कधी आपलातुपला असा भावही प्रकट झाला असेल, कधी आग्रहाला हट्टाचे स्वरूप प्राप्त झाले असेल, तर कधी आणखीही असेच काही घडले असेल; पण माणूस हा गुणदोषानीच बनलेला असतो म्हणूनच तो 'माणूस' Human असतो!'

'माणूस हा गुणदोषांनी बनलेला असतो'

हे एक सर्वमान्य विधान लेखक करतो; पण प्रत्यक्षात मात्र केवळ गुणाचाच उदोउदो सातत्याने करीत राहतो. त्यामुळे सारेच प्रसग अतिशय एकांगी वाटतात. विखे पाटील हे एक परिपूर्ण पुरुष वाटू लागतात.

पुस्तकाच्या सुरुवातीला ही एक चरित्र-कहाणी आहे असा उल्लेख केला आहे, पण प्रत्यक्षात वाचताना मात्र ते एक चरित्रवजा माहितीपत्रक आहे असे वाटते. साखर कारखानदारीची आणि उसाच्या शेतीची बारीकसारीक माहिती तांत्रिक ज्ञान, त्यातील धोके याचे तपशीलवार वर्णन यात आहे आणि ह्या सर्व गोष्टीची प्रत्यक्ष माहिती करून घेण्यासाठी लेखकाने घेतलेले कष्ट नक्कीच कौतुकास्पद आहेत. या चरित्रातील अजून एक उल्लेखनीय भाग म्हणजे या पुस्तकाची भाषा ! भाषेच्या साधेपणातील सौंदर्यामुळे आणि शैलीमुळे पुस्तकातील रुक्ष तपशील सुद्धा बरेच सुसह्य झाले आहेत. या पुस्तकात मत्री, महामत्री याची अनेक भाषणे उध्दृत केली आहेत; परतु ही भाषणे विखे पाटील यांचे मोठेपण पुन्हा पुन्हा बिंबविण्या-खेरीज काहीही सागत नाहीत. त्यामुळे पुस्तकात 'तोच–तोच' पणा अतिशय आला आहे.

या पुस्तकातील एकूण चार भागांपैकी प्रत्येक भागाआधी झाडाचे चित्र काढले आहे छोटयाशा फादीतून हळूहळू आकारास आलेला एक डवरलेला डेरेदार वृक्ष, विखे पाटील याच्या सामान्य जीवनातून उभे राहिलेले एक कर्तृत्वशाली व्यक्तित्व दर्श-विण्यास पुरेसा सूचक असला तरी त्यात विशेष असे काही नाही. मुखपृष्ठावरील विखे पाटील यांचे अस्सल मराठमोळा वेषा-तील चित्र, पाठीमागे दाखविलेला सूर्य योग्यच आहे. पुस्तकाचे भूमिपुत्र हे नावही आशयाला पूरक आहे.

या पुस्तकाला यशवंतराव चव्हाणानी प्रस्तावना लिहिलेली आहे; पण पुस्तकात समाविष्ट केलेले त्यांचे विखे पाटील याच्या-वरील भाषण हेच प्रस्तावनेचे सूत्र घेऊन त्यानी अधिक विवेचन केले आहे., त्यामुळे विवेचन चांगले असूनही त्यात वेगळे असे काहीच वाटत नाही,

विखे पाटील याच्या औद्योगिक जीव-नाची ओळख हे पुस्तक करून देते; पण औद्योगिक क्षेत्रात नव्याने पाय रोवायचे म्हटले की येणाऱ्या सभाव्य अडचणीशी ओळख, ते जर अलिप्त भावाने लिहिले असते तर, अधिक चागल्या प्रकारे करून देऊ शकले असते.

–मृणालिनी रानडे

**भूमिपुत्र**
ले. राजा मंगळवेढेकर
प्रवरा प्रकाशन, प्रवरानगर
जि. अहमदनगर.

---

# आमचे ग्रंथालय

## The Stationary Ark By Gerald Deurrel

(An account of the author's own ideal zoo at Jersey )
Collins,
Pages 159, Rs. 56/– (3·75£).

---

'आमचे ग्रथालय' या सदराखाली मी 'माणूस'मध्ये इंग्रजी पुस्तकांचा परीक्षणवजा परिचय असे एकंदर ५० लेख लिहिले ह्या लेख ५१ वा आहे. मध्यंतरी काही लोकानी पत्राद्वारे किंवा समक्ष वाचना-लयात येऊन हे सदर आवडल्याचे कळवले आहे. श्री. ना. सी. फडक्यांनीसुद्धा यंदाच्या अजलीच्या दिवाळी अकात हे सदर लोकप्रिय झाल्याचे कळवले आहे

या सदराबद्दल आलेली पत्रे चाळताना परवा माझ्या सहज एक गोष्ट लक्षात आली. गेल्या पधरा महिन्यात मला शभरेक पत्रे सहज आली असतील; पण या पत्रात एकाही स्त्रीचे पत्र नाही असे मला दिसले. स्त्रिया असली सदरे वाचत नाहीत काय? की त्याना ती पचत नाहीत? ज्या लोकांना जे पचत नाही त्याची ते टर उडवतात असे दिसते. मला अल्बेर कामूच्या Mersault चे एक वाक्य आठवले, "A man's beauty represents inner, functional truths : his face shows what he can do. What is that compared to the magnificient uselessness of a woman's face ?'

दुर्दैवाने माझ्या वाचनालयात स्त्री कर्म-चारीच जास्त आहेत; पण त्यातले कुणी magnificient ही नाही व useless ही नाही.

असो. एक माणूस स्वत:चा असा प्राण्याचा बाग करू शकतो का? आणि तोसुद्धा साधा नव्हे अगदी आदर्श, आगळा व वेगळा. या पुस्तकाचा लेखक गिराल्ड डरेल यानी हे करून दाखवले आहे. डरेलचे म्हणणे असे आहे की, अगदी खुल्या सफारी पार्कमध्ये सुद्धा प्राण्याचे हाल होऊ शकतात; पण विस्तीर्ण पटांगणामुळे कधीकधी पहाणाऱ्याला ते हाल दिसत नाहीत, एवढेच.

आत्तापर्यंत कैक वन्य प्राणी निर्वंश झाले आहेत. माणसाच्या होणाऱ्या आर्थिक प्रगती-मुळे कित्येक जगले साफ झाली आहेत. वाढत्या प्रदूषणामुळे नदीचे पाणी घाण होते. ते पाणी माणसे व इतर प्राणी पितात. त्याशिवाय 'पोचर्स' (चोरून प्राणी मारून कातडी, शिंगे वगैरे विकणारे ) सुद्धा वन्य-जीवनाचा ऱ्हास करीत असतात. गिराल्ड डरेल म्हणतात, ज्या फादीवर माणूस बसला आहे त्यालाच तो कुऱ्हाडीचे घाव घालीत आहे. आता बरेच लोक म्हणतात, वाघ ह्या प्राणी निर्वंश झाला तर आम्हाला त्याचे काय? पण या जीवसृष्टीतील सर्व जीव एकमेकावर अवलबून असतात. वरकरणी तसे वाटत नाही. समजा, शेतात उदीर फार नासाडी करतात. तर त्याला खाणारे साप आहेत हा सापाचा उपयोग. या रीतीने सर्व जीवसृष्टी मिळून एक गोफ तयार झाला आहे. त्याला homeostasis म्हणतात. पृथ्वीवरील हा homeostasis अत्यत नाजूक धाग्यानी टिकून आहे. ते सतुलपण राखण्या-साठी वन्य जीवन टिकून राहण्याची अत्यत आवश्यकता असते.

मद्रासमध्ये एक सापाची बाग आहे ना ? कोणी एका व्हिटेकर नावाच्या माणसाने ही बाग एकटयाने केली आहे, पण गिराल्ड डरेलच्या प्राण्यांच्या बागेत एकाच जातीचे प्राणी नाहीत. त्याच्या बागेत ऑरंगऑटँग, सरपटणारे प्राणी, अस्वले, गोरीला, टॅपीर्स (हे थोडेसे डुकरासारखे व थोडेसे ऱ्हाईनॉस-रॉससारखे दिसणारे अमेरिकेतले प्राणी आहेत.) सिंह, कॉलॉबस ( आंगठा नसलेले व

लाब केसांचे आफ्रिकेतील वानर) आणि इतर किती तरी प्राणी आहेत. या सर्व वन्य प्राण्यांची निगा ठेवताना लेखकाला काय काय अनुभव आले व त्याला कोणत्या गोष्टी शिकायला मिळाल्या याचे गिराल्डनी या पुस्तकात खुमासदार शैलीत वर्णन केले आहे.

गिराल्ड डरेल दोन वर्षांचा असतानाच त्याला प्राण्याचे वेड लागले. डरेलचा जन्म जमशेटपूर येथे झाला. शेवटी त्याच्या प्राण्यांवरच्या प्रेमाची परिणिती जर्सी झूमध्ये झाली. जर्सी झू ही प्राण्यांची बाग तर आहेच; पण तेथे प्राण्यांवर संशोधनही केले जाते. इतर बागाप्रमाणे जर्सी झूमध्ये प्राण्यांना कैदेसारखे वाटत नाही. डरेलला लाल फितीमुळे किती त्रास झाला याचे वर्णन त्याने सफाईदारपणे केले आहे. त्याला कुठे यश व कुठे अपयश आले तेही त्याने सांगितले आहे. कधीकधी तो वन्य पशूंची रहाणी पाहून भारावून जाई तर कधीकधी प्राण्यांच्या संगतीत तो हतबुद्ध होऊन जाई.

एकदा एक बबून (मोठ्या माथ्याचा, आखूड शेपटीचा व थोडेसे कुत्र्यासारखे तोंड असलेला आफ्रिकन व अरेबियन वानर) डरेलला जवळ येऊ देत नव्हता. कारण डरेलच्या हातात इंजेक्शनची सुई होती. समोर २०० आफ्रिकन प्रेक्षक गंमत पहात होते. गिराल्ड डरेलने लगेच आपले कपडे काढले व इंजेक्शनची सुई आपल्या अगभर फिरवली तेव्हा कुठे त्या बबूनच्या डोक्यात शिरले की, आपल्याला ही सुई फार लागणार नाही.

ओरँगओटँग आता जगात कमी होत चालले आहेत. सुमारे १५।२० वर्षांत या दुर्मिळ वानराची जात नाहीशी होईल असे गिराण्ड डरेल म्हणतात. ते पुढे असे सुचवतात की, या ओरँगओटँगना बंदिस्त अवस्थेत पिल्ले व्हायला हवीत. (काही प्राण्यांना बंदिस्त अवस्थेत पिल्ले होतच नाहीत) पण मला वाटते, बदिस्त अवस्थेत अशा वन्यजाती टिकवून ठेवण्यापेक्षा ती निर्वंश झालेली बरी. गिराल्ड डरेलचा प्राण्यांचा बाग अगदीच आदर्श आहे. मान्य; पण पिंजरा सोन्याचा जरी असला तरी पिंजरा तो पिंजराच.

प्राण्याना sex चे ज्ञान मोठ्यांकडून मिळते. लहान प्राणी मोठ्या प्राण्यांना sex act मध्ये बघतात. तसेच लहान प्राण्याची काळजी आपली आई कशी घेते हे सुद्धा ते समक्ष बघतात; पण समजा एखादा प्राणी अगदी लहान असताना बदिस्त केला गेला तर तो मोठा झाल्यावर त्याला ते ज्ञानच प्राप्त होत नाही व 'ब्रीडिंग'च्या वेळी त्याला शिकविताना फार कठीण जाते.

आणि प्राण्यांना औषधे देणे म्हणजे तर यमयातनाच. डरेल म्हणतात प्राण्याची शुश्रूषा करताना फ्लॉरेन्स नाईटिंगल सुद्धा खचली असती. अर्थात दुखतंय कुठ हे काही प्राणी दाखवीत नाहीत. केळ्यात किंवा चॉकोलेटमधे किंवा मांसात लपवून औषध दिले तरी ते खात नाहीत. जणू आपल्यावर विषप्रयोगच चालला आहे अशा रीतीने प्राणी ही औषधे टाळतात आणि एक्सरे व इंजेक्शन म्हणजे आपल्या आयुष्यातील धोका असेच त्यांना वाटते. आजारी प्राण्यांना औषधे देण्यासासाठी चाणक्याची सुज्ञता व नारदाची चतुराई लागते. म्हणजे आता कुणी 'व्हेट' (Veterinary doctor) दिसला की हॅटस ऑफ करा. (अगदी लहान मुलाचे डॉक्टर्स (पॅडिअॅट्रीशियन्स) हे सुद्धा आम्ही 'व्हेटस्' आहोत म्हणून मिरवीत असतात!

आजारी प्राण्याना त्यांच्या दवाखान्यात हलवावे की नाही याविषयी दोन मते आहेत. काही लोक म्हणतात की आजारी प्राण्याला दवाखान्यात हलविलेले बरे. कारण त्याचा संसर्ग इतर प्राण्यांना लागू शकतो व दवाखान्यात स्वच्छतेचे वगैरे वातावरण असते म्हणून प्राणी लवकर बरा होण्याची शक्यता असते. याउलट भोवतालच्या परिस्थितीतील वदल व त्याच्याच जातीच्या प्राण्यांपासून अलिप्तता या दोन गोष्टीमुळे आजारी प्राणी depress होऊन जातो व शेवटी मरतो असे गीराल्ड डरेल यांना वाटते.

एक बेबी गोरीला आजारी पडतो त्या वेळेला त्याची किती काळजी घेतली जाते ते वाचून थक्क झालो. या गोरीलाला डायरिया होतो. आधी त्याला लॉमॉटील तीन वेळ दिले जाते. त्याचा काही उपयोग होत नाही. त्याच्या स्टूलमध्ये E. coli चे जंत आढळतात.


**SOME NEW TITLES RECEIVED**

1. The Case That Shook India – Prashant Bhushan — Rs. 35/–
2. My Laugh Comes Last – (Bestseller–Thriller)– James Hadley Chase — Rs. 10/–
3. Dubai– (Bestseller– novel of intrigue & suspense)– Robin Moore — Rs. 18/90
4. Howard Hughes–(Bestseller–Best book on one of the richest man of the world)– James Phelan — Rs. 16/–
5. State Of BLood– (Bestseller–Read about the atrocities of the cannibal Amin)– Henery Kyemba — Rs. 18/90
6. Wilson Jones–(Biography of the famous billiard player)– A T P. Sarathi — Rs. 6/–
7. Papa Hemingway– Bestseller–Intimate account of the great author) A. E. Hotchner — Rs. 6/40

**मराठी**

१. सत्तांध– (आणीवाणीवर लेख)– अशोक जैन व अरुण साधू — रु. १५/–
२. क्रिकेट–वेध– (क्रिकेटविषयक गमतीदार लेख)– शिरीष कणेकर — रु. २५/–
३. बाजार– (कथासंग्रह)– व्यंकटेश माडगूळकर — रु. ८/–
४. रसास्वाद– वाङ्मय आणि लेख– (कै. वा. म. जोशींच्या व्याख्यानमालेतील लेख)– माधव आचवल — रु. ५/–

★ 'फिनिक्स'चे सभासदत्व ही आपल्या उच्च अभिरुचीची साक्ष आहे!

**दि फिनिक्स लायब्ररी**

७२७ सदाशिव पोस्टासमोर, पुणे ३०

यावर त्याला क्लॉरंफॅनिकॉल, टॅट्रासायक्लीन, स्ट्रेप्टोमायसिन, नीऑमायसीन वगैरे ॲन्टी-बायोटिक्स दिले जातात. तरी आपला पेशंट आजारीच! त्याला इंट्राव्हीनस द्रव्य देता येत नव्हते. कारण तो स्वस्थ झोपत नव्हता. त्यामुळे त्याच्यावर इतर अनेक उपाय करण्यात आले.

इंग्लडमध्ये मांजर, कुत्री व इतर प्राण्यांना कधी कधी विलमध्ये मोठ्या रकमा दिल्या जातात असे मी बऱ्याच वेळा वाचतो. SPCA (Society for prevention of Cruety to animals) सुद्धा तिकडे अगदी कार्यरत असते. आपल्या पुण्यात सुद्धा जगलीमहाराज रोडवरच्या प्रदर्शनाच्या मालकावर खटला भरण्यात आला होता. कुणी एका पार्शी बाईने हा खटला भरला होता. मालकावर आरोप होता की प्राण्यांना फारच लहान पिंजऱ्यात कोडले आहे. अर्थात बाई SPAC ची मेंबर असावी.

मी असे सुचवतो की कुणीतरी आता M S C काढावे (Society for the prevention of cruelty to Men)

पुस्तकाचे नाव Stationary Ark तसे कल्पक आहे. जेव्हा प्रलयकाल येतो तेव्हा Noah च्या बोटीत प्राण्याच्या प्रत्येक जातीतील एक नर व एक मादी घेऊन Noah त्याच्या Ark (boat) मध्ये सटकतो. गिराल्ड डरेल त्याच्या झू मध्ये वन्य प्राण्याना निर्वंश होऊ देत नाही म्हणून त्याला Stationary Ark नाव दिले आहे.

एकूण पुस्तक A Grade चे आहे.

—जे. एन्. पोंडा
फिनिक्स लायब्ररी

---

## साभार पोच

१) श्रीगुरुचरित्र बोधामृत
ले. पुरुषोत्तम भगवत देव
गोकुळ मासिक प्रकाशन, पुणे
पृष्ठे २६२, कि. १२.५० रु.

२) आषाढातील एक दिवस (नाटक)
ले. मोहन राकेश. अनु. विश्वनाथ राजपाठक
कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.
पृष्ठे ६४, कि. ५ रु.

३) अभिव्यक्ती
ले. भास्कर गिरधारी
अनमोल प्रकाशन, पुणे २
पृष्ठे ९६, कि. १० रु.

४) स्वरोवर (काव्यसग्रह)
लक्ष्मीकांत प्रामाणिक
मराठवाडा साहित्य परिषद प्रकाशन औरंगाबाद
पृष्ठे ५६, कि. ७ रु.

५) प्रकाशयात्री जयप्रकाश,
प्रा. चंद्रकात पाटगावकर
अजब पुस्तकालय, कोल्हापूर.
पृष्ठे १०८, कि. ९ रु.

६) जयप्रकाश : एक संभाषण
श्री. श्रीपाद जोशी
किर्लोस्कर प्रेस प्रकाशन, पुणे ९.

---



**लेखक : पु. ल. इनामदार । राजहंस प्रकाशन, पुणे । मूल्य : वीस रुपये**

# टेक इट लाइटली

संजीव मंगरूळकर

## □ अखेर माझा निर्णय चुकला

एखाद्या वेळी अगदी पुरेपूर विचार करून बचत करण्याचा निर्णय करावा, एखाद्या गोष्टीसाठी फुकटचा उडणारा पैसा वाचवावा आणि मागाहून या अगावुक बचतीच्या शहाणपणाचाच पश्चात्ताप करण्याची पाळी यावी अशी दुर्दैवाची वेळ आयुष्यात फार क्वचित येते. कारण बचतीसाठी किंवा एकूण पैसा मिळविण्यासाठी आवश्यक असा आर्थिक दृष्टिकोनच आपल्याला लाभलेला नाही अशी माझी आतापर्यंतच्या अनुभवावरून अगदी पुरेपूर खात्री झाली आहे; पण गमत अशी की, असा बचतीचा पश्चात्ताप करण्याची वेळही माझ्यावर परवा आली. गोष्ट आपल्या पुण्यातल्या साहित्यसमेलनातलीच आहे पुण्यात नुकतेच अखिल भारतीय (की वैश्विक ?) मराठी साहित्य समेलन पार पडले. पुण्यनगरीत बऱ्याच कालावधीनतर भरलेला हा साहित्यिक, सांस्कृतिक मेळा. *तेव्हा तो थाटामाटाने, वाजत–गाजत होणार* हे ओघानेच आले पुणेकरमंडळी तशी हौशी आहेत. पुण्यात चौकाचौकात गणपती बसतात. पुण्यात नवरात्रात ठिकठिकाणी देवीदेखील बसतात. 'शेळी हा प्राणी गरीब की दुष्ट ?' यासारख्या विषयावरसुद्धा पुण्यातील प्रमुख वृत्तपत्रांतून साधकबाधक, रंजक, बोधप्रद चर्चा होतात. इतकेच काय पुण्यातील महानगरपालिकेच्या सभा तर देशभर गाजतात. तेव्हा अशा या पुण्यातले हे मराठी साहित्य संमेलन, त्याचा महिमा तो काय वर्णावा ? हे समेलन 'याचि देही, याचि डोळा' पाहाण्याची इच्छा साहजिकच आमच्या बऱ्याच मित्रमडळीना होतीच. तेव्हा त्यांनी या घरच्या संमेलनात सहभागी होण्याचे ठरविले आणि इथेच नेमका मी तो घातक आणि दुर्दैवी निर्णय घेतला. शहाण्यासारखा विचार केला आणि समेलनापासून दूर राहिलो. संमेलनात सहभागी होण्यासाठी 'साहित्य' म्हणून एकवीस रुपयांची जरुरी होती. एवढे साहित्य सहजासहजी उभे करणे आपल्यासारख्या सुमार वकुबाच्या माणसाला शक्य नाही. तेव्हा हे संमेलन खास बड्या साहित्यिकांसाठी आहे आणि आपण याबाबतीत तटस्थपणे बचतीची भूमिका घेणे इष्ट आहे असा विचार मी केला आणि माझ्या या भूमिकेचे वेडेवाकडे समर्थनही करीत सुटलो. एकवीस रुपयांवर पाणी सोडून स्वागतसमितीचे सभासद होणाऱ्या माझ्या मित्राची थट्टा करू लागलो. नाही तरी साहित्य समेलनात असतंच काय ? एक अध्यक्षीय भाषण, मराठी साहित्याचा परामर्श घेणारं. त्याची भूतकाळातली वाटचाल, टप्पे वगैरे सागणारं. त्याच उज्ज्वल भवितव्य अवास्तवपणे चितारणार आणि कुठे कुठे लेखकाला त्याच्या सामाजिक, नैतिक, राजकीय, कलात्मक इ. इ. बाधिलकीची जाणीव करून देणारं आणि हे सगळं करताना अगदी वैचारिकतेचा आव आणणारं, म्हणजेच तुम्हा–आम्हाला बोअर करणारं ! त्यानंतर एक कविसमेलन. यात *मराठीतील एकूणएक कवी हजेरी लावतात.* माझ्या एकदोन मित्रांनी समेलनात जाता यावं म्हणून काही नवनवीन कविता तयार केल्याही होत्या; पण या कविसंमेलनात कुठलीच नवी कविता म्हणायला पूर्ण बदी आहे असं त्यांच्या कानांवर आल्यामुळे त्यांना तो प्रयत्न सोडावा लागला आणि आता बाकी राहिला तो परिसवाद. याच एक वैशिष्ट्य म्हणजे तो धड अध्यक्षीय भाषणासारखा विचारपरिलुप्तही नसतो किंवा रात्रीच्या मनोरंजनाच्या कार्यक्रमांसारखा रजकही नसतो. तेव्हा तीन दिवसाचा अखड साहित्यिक 'बोअरडम' एकवीस रुपयांला विकत घेणाऱ्या माझ्या या मित्राची मी बरीच रेवडी उडवू लागलो.

तशी माझी पुण्यातल्या कुठल्याच औद्योगिक कंपनीशी ओळख वगैरे नाही. नाही तर अध्यक्षीय निवडणुकीत मतदान करता यावं म्हणून फुकटात तिकीट उकळणं मला सहज शक्य झाल असत. माझ्या काही मित्राना असं औद्योगिक कंपन्यानी दिलेल उसनं साहित्यिकत्व मिळालही; पण तिथही आम्ही अपुरे पडलो. इतकंच काय, पण माझ्या कित्येक मित्रानी तर भलताच मार्ग पत्करला संमेलनाला जाता यावं, म्हणून ते चक्क स्वयसेवकच झाले. त्यांना साहित्य, कला वगैरेमध्ये फारसा रस नव्हता; पण त्यांना पुलच्या चष्म्याची फ्रेम आणि कुठल्याशा साहित्यिकाचं धोतर जवळून पाहाण्याची इच्छा होती. ती त्यानी अशी पूर्ण केली, आमच्या स्वाभिमानी मनाला तेही मानवले नाही.

तर तात्पर्य असं की, मी साहित्य समेलनाला गेलो नाही आणि म्हणूनच आयुष्यातल्या एका रोमहर्षक अनुभवाला पारखा होण्याची वेळ माझ्यावर आली. म्हणजे माझा समेलनाबाबतचा अदाज अगदीच चुकला, अस नाही. दरवर्षीप्रमाणे यदाचं अध्यक्षीय भाषणही खूपच विचारपरिप्लुत वगैरे झालं. अध्यक्षांच्या साहित्यविषयक विशाल दृष्टिकोनाचा *त्यात पूर्वीप्रमाणेच प्रत्यय आला. ते भाषण* पुरेस लाबलचकही झाल. त्यात लोक पुरेपूर बोअरही झाले आणि हा कटाळा व्यक्त करण्यासाठी म्हणून त्यांनी मंडपात गप्पाचे, पत्त्यांचे अड्डेही टाकले. म्हणजे हे सगळ पूर्वीसारखच झालं. इतक की नावीन्याचा आळ यायला नको म्हणून अध्यक्षानी कित्येक गोष्टीचा उल्लेखही कैला नाही. भारतात मध्यतरी आणीबाणी येऊन गेली. त्याचा साहित्यावर काही परिणाम झाला असण्याची शक्यता आहे किंवा याबाबतीत लेखकाचे कर्तव्य काय यासारख्या सामान्यांच्या जिव्हाळयाच्या विषयाना त्यानी हातच लावला नाही. कविसमेलनही तस नेहमीसारखंच भव्य, दिव्य झालं. मराठीभाषेचे सर्व कवी मचावर पाहायला मिळाले. त्याच्या जुन्याच कवितांना नवीन दाद मिळाली. नेहमीसारखाच एक खुसखुशीत, ठिसूळ आणि विसविशीत परिसंवाद झाला आणि याबरो-

बरच रात्री मनोरंजनाचे स्वतंत्र कार्यक्रमही झाले. नाही म्हणायला एक-दोन विशेष घटना या कार्यक्रमांबाबतही घडल्याच. माजी अध्यक्षा दुर्गा भागवत यांनी तडितेप्रमाणे मंचावर अचानक आगमन करून भल्याभल्या साहित्यिकांची भंबेरी उडवून दिली. अध्यक्षीय कार्यक्रमांच्या वेळी लोकांचे मनोरंजन होईल असा हा एकुलता एक कार्यक्रम आणि दुसरी एक घटना मनोरंजनाच्या कार्यक्रमाबाबत झाली. तेव्हा सादर करण्यात येणारे 'तरुण तुर्क म्हातारे अर्क' हे नाटक अश्लील असल्याचा दावा पुण्यातील संस्कृतिरक्षकानी केला. पुणेकर त्यांच्या सुसंस्कृतपणात कधीच माघार घेत नाहीत. त्यातून हे नाटक जरी व्यावसायिक रंगभूमीवर अनेक वेळा झाले असले तरी ते साहित्यसमेलनासाठी अश्लीलच आहे असा निर्वाळा संस्कृतिरक्षकानी दिला. त्यासाठी मोर्चा, संप, निदर्शने इ. अहिंसक उपाय योजण्याची धमकीही दिली; पण हा सर्वच पेचप्रसंग सयोजकांच्या आणि सस्कृतिरक्षकांच्या समजसपणामुळे सुटला. सयोजकांनी एक गंमत केली. या नाटकाच्या निवडीमागची वैधता व्यक्त करून या वैध निवडीबद्दल दिलगिरी व्यक्त केली आणि अशा रीतीने हे अश्लील नाटक श्लील म्हणून साहित्यसंमेलनात सादर करण्यास सस्कृतिरक्षकांनी परवानगी दिली. अशा जागरूकतेमुळेच केवळ आज पुण्यातील सस्कृती टिकून आहे.

इथपर्यंत सगळं समेलन तस पारपरिक झालं. ते बुडल्याच फारस दुःख मला नाही; पण खरी गमत शेवटच्या दिवशीच झाली. इतके दिवस साहित्यचर्चेसाठी वापरल्या गेलेल्या व्यासपीठाचा उपयोग सर्व प्रकारच्या सामाजिक, राजकीय, धार्मिक, जातीय अन्यायांविरुद्ध आवाज उठविण्यासाठी केला गेला. शे-दीडशे लोकांनी हजारो लोकासमोर घुडगूस घालून समेलनाला एक वेगळेच परिमाण प्राप्त करून दिले. या काळात अनेक विषयावर अनपेक्षित रीतीने मौलिक मतप्रदर्शन केले गेले कुणी अध्यक्ष पु. भा. भावे याचा जयजयकार केला. कुणी त्याचा 'मुर्दाबाद' केला. कुणी अध्यक्षाच्या मयतीला जाण्यावर काव्य रचू लागले. कुणी दुर्गा भागवताचा उदो उदो केला, कुणी जयप्रकाशाच्या जयजयकाराचे नारे दिले, कुणी दलिताचा आवाज उठविला, कुणी जातीयवादाविरुद्ध दड थोपटले. सपूर्ण मंडपाला एखाद्या तालीम-आखाडचाचे स्वरूप देण्यात आले. थोडया वेळाच्या अवधीतच मंडपात एकाच वेळी इतके विविध विषय हाताळले गेले की, ही परिस्थिती अजून थोडा काळ राहाती, तर ऱ्होडेशियातील वर्णविद्वेषाचा छडादेखील याच मडपात लावण्याचा कित्येकाचा विचार होता. कित्येकांनी या मुक्त विचारस्वातंत्र्याचा गैरफायदा घेतल्याचे ऐकून आहोत. मंडपात तीस-पस्तीस लोकांच्या एका गटाचे नेतृत्व भालेराव नावाचे कुणी एक गृहस्थ करीत होते. हा भालेरावांचा गट फक्त दोनच घोषणा देत होता असे सांगतात-'पु. भा. भावे मुर्दाबाद' आणि 'भालेराव झिंदाबाद.' या घोषणा ऐकून तर कित्येक जातिवत व्यावसायिक निदर्शकही क्षणकाळ अवाक् झाले होते.

हा सारा प्रसग पुण्यात घडत असताना आपण तिथे असू नये याचे दुःख वाटते. साहित्यिकाच्या चर्चा पुण्याला काही नवीन नाहीत. काव्यसमेलने तर पोत्याने होतील; पण साहित्यिकाच्या शारीरिक झटापटी हा एक विलक्षण प्रकार आहे एकवीस रुपये वाचविण्याच्या नादात हा सोहळा पाहण्याचा आनंद मुकावा हे मोठेच दुर्दैव आहे. या बुद्दू शहाणपणाची याद आयुष्यभर राहील.

जाता जाता समेलनाबाबतची एक रजक प्रतिक्रियाही पाहण्यासारखी आहे.

ती प्रतिक्रिया आहे कवी अनिल यांची. समेलनाच्या दुसऱ्या दिवशी दिलेल्या मुलाखतीत पुण्यनगरीवर आगपाखड करताना ते म्हणतात-'शे-दीडशे लोकांचा धुमाकूळ ज्या शहरात हजारो लोक उघडचा डोळचानी पाहून गप्प बसतात, त्या भ्याड शहरात क्षणभरही थाबण्याची मला इच्छा नाही.' अनिलांचा संताप सात्त्विक आहे यात सशय नाही; पण या न्यायाने त्यांना भारतात थांबण्याची देखील इच्छा असू नये. कारण आणीबाणीच्या काळात मूठभर गुंड लोकांनी देशभर घातलेला नंगा नाच कोटचवधी मुक्या डोळचानी निःशब्दपणे पाहिला होता त्यात कवी अनिलही होते. ती परिस्थिती साहित्य समेलनापेक्षा खूपच वाईट होती

बाकी आपल्याला साहित्य समेलनादर विचार करण्याची तशी जरुरीच काय म्हणा. आपण साहित्यिक थोडेच आहोत ? आपल्याजवळ एकवीस रुपये तर नाहीतच, शिवाय आपल्याला मारामारीही करता येत नाही ! ☐

---

## निवडणूक वारे

पृष्ठ ६ वरून

अधिक महत्त्वाची गोष्ट म्हणजे एकसंध पक्ष म्हणून जनतापक्षाने कार्य करण्याची. घटकपक्ष अजूनही आपला वेगळेपणा विसरायला तयार नाहीत हे निरनिराळ्या राज्यात जनतापक्षात चालू असलेल्या सघर्षावरून दिसते. हरियाना मत्रिमंडळातून श्रीमती सुषमा स्वराज याना ज्या पद्धतीने काढले व परत घेतले, मध्यप्रदेशचे मुख्य मत्री कैलास जोशी यानी राजीनामा देऊ केला; पण त्या पदावर ते आता पुनः राहू इच्छित आहेत. या घटना पक्षातर्गत दडपणाच्या व सघर्षाच्या निदर्शक आहेत. असे संघर्ष चालू असेपर्यंत जनतापक्ष कोणताही कार्यक्रम परिणामकारकपणे पार पाडू शकणार नाही. काँग्रेससारखीच आपली गत होऊ द्यायला नको असेल तर केवळ सत्तेच्या राजकारणात न गुरफटता शिस्तबद्ध पक्षसघटनेकडे अधिक लक्ष द्यावयास हवे ☐

तरी रोजचे कामकाज हे भोजनोत्तर चर्चेचा गरमागरम विषय झाले आहे स्वत: न्यायमूर्ती सांगतात की, हाती घेतलेल्या कामाचे स्वरूप सत्यशोधन हेच आहे. त्यावर विचारणारे असाही प्रश्न विचारतात की सत्य शोधून काढले, पुढे काय ? त्यावर उत्तर असे दिले जाते की, पुढे काय ते सरकारने ठरवायचे. सरकारने ठरवायचे म्हणजे काय ? आयोगाच्या अहवालाच्या आधारे सरळ शिक्षा तर करता येत नाही. म्हणजे पुन्हा गुन्हेगाराना न्यायालतच न्यायचे ना. . . . ? साराच गोंधळ ! वेळ आणि पैसा यांची माती. असे आक्षेपही घेतले जातात. अर्थात आयोगाला या गोष्टीचा विचार करण्याचे प्रयोजन नाही. जास्तीत जास्त शास्त्रशुद्ध पद्धतीने आणि कमीत कमी वेळामध्ये आपले काम कसे संपविता येईल, या एकाच गोष्टीवर आयोगाने सारे लक्ष केंद्रित केले आहे—काही तक्रारीचा निचरा राज्यपातळीवर अन्य अधिकारी नेमून केला जात आहे. शहा आयोगाकडे एकूण ४८,००० तक्रारी आल्या-त्यापैकी सार्वजनिक जीवनामध्ये ज्याना अनन्यसाधारण महत्त्व आहे अशा वेचक तक्रारीवर आयोगाने आपले लक्ष केंद्रित केले आहे. आजवर झालेल्या कामकाजामध्ये आयोगाने अनेक वादग्रस्त गोष्टीबाबतची खरी परिस्थिती जाणून घेतली आहे. जमा झालेल्या पुराव्यावरून आणीबाणीपर्वामध्ये शासन कशा पद्धतीने काम करीत होते याची कल्पना येण्याइतका पुरावा निश्चितपणे गोळा झाला आहे. शासनामध्येही एक आतले वर्तुळ कसे तयार झाले होते आणि घटनात्मकदृष्ट्या ज्याना अधिकार नाहीत त्या मंडळींच्या अरेरावीमुळे कॅबिनेट दर्जाच्या मंत्र्यानीही महत्त्वपूर्ण निर्णय कसे घेतले याचा रजक इतिहास शहा आयोगाने नोंदवून घेतला आहे.

घटनेने दिलेल्या अधिकाराप्रमाणे न्यायमूर्ती शहा यानी त्याना – सुयोग्य वाटेल अशी काम करण्याची पद्धत निवडली आहे. त्या बरहुकूम विशिष्ट प्रकरणी साक्षीदाराना बोलावण्यात येते आणि त्यानी दिलेल्या जबान्या नोंदवून घेतल्या जातात. आवश्यकता भासेल तेव्हा स्वत: न्यायमूर्ती साक्षीदाराला खुलासा करण्यास सागतात.

### नेमकी चौकशी कशाची ?

शहा आयोगाची कार्यकक्षा तशी संदिग्ध आहे. एक विशिष्ट व्यक्ती अथवा काही व्यक्ती यावा नावानिशीवर उल्लेख करून – त्यांच्यावरील आरोपांची चौकशी करण्यासाठी हे कमिशन बसविलेले नाही. म्हणूनच ज्याच्या आधारे काही आरोप करता येतील अशी माहिती आणि पुरावे गोळा करणे हे या आयोगाचे पहिले काम आहे. देवराज अरस यांच्याविरुद्ध असलेल्या आरोपाची चौकशी करण्यासाठी नेमल्या गेलेल्या ग्रोव्हर आयोगाचे अथवा याच स्वरूपाच्या कामासाठी बन्सीलाल यांच्या संदर्भात नेमल्या गेलेल्या रेड्डी आयोगाचे काम तसे सोपे आहे कारण संबधित व्यक्ती आणि त्यांच्यावर असलेले आरोप याबद्दलच पुराव्याच्या आधारे छाननी करून निष्कर्ष काढण्याचे काम या आयोगांना करायचे आहे शहा आयोगाचे तसे नाही. उपलब्ध पुरावा व विश्वासार्ह साक्षीदाराच्या साक्षी यांच्या आधारे सत्य शोधून काढून काही निष्कर्ष काढायचे आहेत. अशा स्वरूपाच्या कार्यकक्षेमध्ये काम करणारा हा पहिलाच आयोग आहे. काही पुराव्याच्या आधारे एका अथवा अनेक व्यक्तीवर दोषारोप ठेवण्यात आले तर यासबधीच्या कायद्याच्या आधारे अशा आरोपीची सपूर्ण बाजू आयोगाला ऐकून घ्यावी लागेल. त्याच्याविरुद्ध साक्षी दिलेल्या साक्षीदाराची उलटतपासणी त्यांना घेता येईल. आयोगाला आपली बाजू स्पष्ट करणारी निवेदने त्यांना देता येतील आणि स्वत. अथवा आपल्या वकिलामार्फत बचाव करण्याची पूर्ण सधी त्याना मिळेल. आयोगाच्या या स्वरूपाची अजून कित्येक सुशिक्षित मंडळीनाही माहिती नाही. आणीबाणीमधील अतिरेकी प्रकाराना जबाबदार असलेल्या व्यक्तीची चौकशी करून त्यांना शिक्षा देण्यासाठीच आयोगाची नेमणूक करण्यात आली आहे असा जो समज आहे, तो पूर्णपणे चुकीचा आहे हे वरील विवेचनावरून स्पष्ट होईलच.

ज्या १९५२ च्या आयोगविषयक कायद्याच्या आधारे शहा आयोगाची नेमणूक करण्यात आली आहे त्या कायद्याच्या मर्यादा लक्षात घेतल्या तर करण्यात येत असलेल्या आरोपांमध्ये कितपत तथ्य आहे हे शासनाला कळविणे, फार तर निश्चितपणे दोषी ठरलेल्या व्यक्तीबाबत काही शिक्षा सुनाविणे या मर्यादामध्येच आयोगाला काम करावे लागते. म्हणजेच काही निश्चित गोष्टींची शिफारस करणे एवढेच आयोगाचे हाती राहते आणि शहाआयोगालाही या मर्यादेतच काम करावे लागणार आहे आणि या शिफारशी आधारभूत मानून भारतीय दंडविधायकामधील १८९ कलमाप्रमाणे आयोगाने दोषी ठरविलेल्या मंडळीविरुद्ध काम चालवावे लागणार आहे. म्हणजेच सर्व परिस्थितीची खुल्या वातावरणामध्ये चर्चा घडवून आणून, झालेल्या दोषाबद्दल, अधिकाराच्या गैरवापराबद्दल, जनतेला खरी माहिती देण्यासाठी कार्यरत राहणे आणि सत्य शोधून काढून ते जनतेसमोर ठेवणे एवढेच या आयोगाचे काम आहे. □

## □ सिद्धार्थ शंकर रे.... एक मुलाखत

मुलाखतच घ्यायची तर ती रेबाबूंची कशाला, अगदी बंगालमधला राजकारणी हवा असला तर ज्योती बसू आहेत, नक्षलवादी आहेत किंवा जनता पक्षाच्या खुर्चीवर दोलायमान अवस्थेमध्ये बसलेले सेनबाबूही आहेत; पण नाही; आम्हाला रेबाबू हवे आहेत ते पुढे घडणाऱ्या गोष्टीसाठी नव्हे, तर घडून गेलेल्या गोष्टीसबधी आणि बदलत असलेल्या परिस्थितीमध्ये आज ते नेमके कुठे उभे आहेत हे जाणून घेण्यासाठी. बाईंना आणीबाणी लागू करण्याचा सल्ला देणारे जे महाभाग होते त्यापैकीच एक रेबाबू. रेबाबूंची एक मुलाखत

'इंडिया टूडे' या पाक्षीकाने प्रसिद्ध केली आहे. बाईंच्या कारकीर्दीमध्ये केंद्रीय मंत्री म्हणून आणि नंतर बंगालचे मुख्यमंत्री म्हणून त्यांची कारकीर्द गाजली. उत्तर प्रदेशामध्ये बहुगुणांना हलवू शकणारा संजय इच्छा असूनही रेबाबूंची मुख्यमंत्रिपदाची खुर्ची खाली करून घेऊ शकला नाही! अर्थात त्याच्या चौफेर प्रयत्नांचे दणके या खुर्चीला जरूर जाणवले. तर असे हे रेबाबू एवढे रामायण झाल्यावरही ते म्हणतात की, बाईंबद्दलच्या त्यांच्या मतामध्ये फारसा फरक पडलेला नाही. निवडणुकीनंतर लगेच दिलेल्या एका मुलाखतीमध्ये त्यांनी इंदिराजींचा पराभव करून आपण केवढी मोठी चूक केली आहे हे मतदारांना जरा उशिरा कळेल, असे मत व्यक्त केले होते. त्याबाबत आता प्रतिक्रिया विचारली असता ते उत्तर देत नाहीत. म्हणतात, दुसरे काही तरी बोलू. शहाआयोगासमोर काही केंद्रीय मंत्र्यांनी ज्या साक्षी दिल्या त्या संदर्भातही ते कोणतेही भाष्य करीत नाहीत. आणीबाणीच्या काळात त्यांनी स्वीकारलेल्या भूमिकेबाबत आज ते इतकेच म्हणतात; 'यासंबंधीच्या प्रश्नांना, शंका–कुशंकाना मी योग्य वेळी उत्तर देईन.' स्वतःवर होणाऱ्या टीकाटिप्पणीबाबत ते म्हणतात, 'कित्येक वेळा माझ्या विरुद्ध टीकेची झोड हेतुतः उठविली जाते. अशा टीकेला मी उत्तर देऊ इच्छित नाही; परंतु प्रामाणिक टीकेच्या बाबतीत मी संवेदनाक्षम आहे १९७२ ते १९७७ पर्यंत आम्ही जे बंगालमध्ये केले त्याला अगदीच वाटाण्याच्या अक्षदा लावता येणार नाहीत. आम्ही सत्तेवर आलो त्या वेळी कायदा आणि सुव्यवस्थेची काय स्थिती होती, याचा आमचे टीकाकार विचारही करीत नाहीत, ही खेदाची बाब आहे. २७ लक्ष नागरिकांना नोकऱ्या मिळवून देण्याची अवघड जबाबदारी आमच्या शिरावर होती. प्रत्यक्षामध्ये आम्ही पाच लाख लोकांना रोजगार मिळवून दिला. घटत्या शेतीउत्पन्नामध्ये लक्ष घालून खाजगी, सरकारी आणि सहकारी शेती उत्पादनामध्ये लक्षणीय वाढ व्हावी यासाठी आम्ही प्रयत्न केले आणि यशही मिळविले'

**प्रश्न** : बारानगर आणि हावडा येथील कत्तलीबाबत तुमचे काय स्पष्टीकरण आहे?

**उत्तर** : त्या वेळी मी मुख्य मंत्री नव्हतो. कारण तुम्ही म्हणता तो प्रकार १९७१ सालचा आहे. मी मुख्यमंत्री नव्हतो तरीही मी त्या वेळी बंगालमध्ये आलो होतो. काँग्रेस आणि डावे कम्युनिस्ट यांनी या बाबतीत एकमेकावर आरोप-प्रत्यारोप केले होते आणि जनता दोघावरही नाराज होती.

**प्रश्न** : आता ज्योती बसूंच्या जागी तुम्ही असता तर काय केले असतेत?

**उत्तर** : आमच्या विविध योजना यशस्वी करण्यासाठी मी कार्यरत राहिलो असतो.

**प्रश्न** : ज्योती बसू यांच्या सरकारबद्दल तुमच्या काय प्रतिक्रिया आहेत?

**उत्तर** : अनेक नवीन योजनांची अंमलबजावणी करण्याचा बसू यांचा प्रयत्न आहे. या प्रयत्नामध्ये त्यांना किती यश मिळेल हे आताच सांगणे कठीण आहे. केवळ चार महिने सत्तेवर असलेल्या शासनाच्या कामाबद्दल आत्ताच प्रतिक्रिया सांगणे योग्य नव्हे. त्यासाठी आपल्याला काही काळ थांबावे लागेल.

**प्रश्न** : विविध राजकीय नेत्यांच्या अटकेबाबत तुमच्या काय प्रतिक्रिया आहेत?

**उत्तर** : यापैकी बहुतेक नेत्यांची आणि त्यातही विशेषकरून इंदिरा गांधी यांची अटक राजकीय कारणासाठी झालेली होती. अर्थात या प्रकाराची तपशीलवार चर्चा करण्याची माझी इच्छा नाही कारण हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे

**प्रश्न** : इंदिरा गांधीबद्दलच्या तुमच्या मतांमध्ये बदल झालेला नाही असे म्हणता खरे; परंतु प्रत्यक्षात काँग्रेस अध्यक्षपदाच्या निवडणुकीच्या वेळी तुम्ही अप्रत्यक्षपणे त्यांच्या विरोधी भूमिकाच घेतली होतीत ना?

**उत्तर** : काँग्रेसच्या कार्यपद्धतीबाबत मला निषेध नोंदवायचा होता आणि पक्षांतर्गत कार्यपद्धती लोकशाही प्रथाप्रमाणे चालावी असे मला वाटत होते आणि म्हणूनच मी निवडणूक लढविली आणि आजही मला वाटते की, माझा हेतू साध्य झाला.

**प्रश्न** : आणीबाणीची घोषणा ही योग्य गोष्ट होती असे आपल्याला वाटते का?

**उत्तर** : आणीबाणीबद्दल मी काहीही बोलणार नाही इंदिराजींबद्दल म्हणाल तर त्यांनी देशाची सेवाच केली. काही घोषणाबाबत माझे त्यांच्याशी मतभेद होते. आजही आहेत.

**प्रश्न** : अलाहाबाद उच्च न्यायालयाचा निर्णय आल्यावर बाईंनी राजीनामा देणे योग्य होते असे आपल्याला वाटते का?

**उत्तर** : प्रश्न खवचट आहे. कारण त्यांनी राजीनामा देण्याचे कारण नाही, असे मी त्याच वेळी जाहीररीत्या सांगितले होते. मग हा प्रश्न विचारण्याचे प्रयोजनच काय? बरे, ते केवळ माझे एकट्याचे मत होते असे नाही तर काँग्रेसमधील अनेक जबाबदार नेत्यांचे तेच मत होते. बाबू जगजीवन राम यांनी तर बाईंनी राजीनामा देऊ नये असे सांगणाऱ्या पत्रकावर सही केली होती.

**प्रश्न** : आणीबाणी लागू होण्यापूर्वी आणीबाणी लादण्यात येत आहे याची आपल्याला कल्पना होती काय?

**उत्तर** नाही, आणीबाणी घोषित होण्यापूर्वी मला त्या गोष्टीची माहिती नव्हती; पण त्याबाबत मी येथे जास्त बोलणार नाही. शहाआयोग या संदर्भात चौकशी करीत आहे. त्यामुळे येथे बोलणे सयुक्तिकही नाही.

**प्रश्न** : त्या वेळचे गृहखात्याचे राज्यमंत्री ओम मेहता यांनी एका मुलाखतीमध्ये आणीबाणी घोषित होण्यापूर्वी तुम्हाला त्याची कल्पना होती असे सांगितले आहे

**उत्तर** : ओम मेहता यांच्या या विधानाबाबतही मी काहीही बोलणार नाही. शहा आयोग आपले काम करीत आहे. तेव्हा नाही त्या गोष्टी इथे बोलण्यात प्रयोजन काय? त्याच वेळी रेबाबूंना सुब्रता मुखर्जी यांनी जाहीर मुलाखतीमध्ये व्यक्त केलेल्या खालील विधानाबाबतही प्रतिक्रिया विचारण्यात आली. त्यांनी आपल्या मुलाखतीमध्ये असे म्हटले होते की, रे यांनीच बाईंना आणीबाणी घोषित करण्याचा सल्ला दिला, इतकेच नव्हे तर ते स्वतः या संदर्भात बाईंबरोबर राष्ट्रपतीकडे गेले होते. बेचाळिसाव्या घटनादुरुस्तीचे शिल्पकारही सिद्धार्थ शंकर रे होते आणि वृत्तपत्रावर जाचक निर्बंध लादले जावेत यासाठी ते प्रयत्नशील होते. वरील विधानाबाबत कोणतीही प्रतिक्रिया व्यक्त करण्यास त्यांनी नकार दिला. शहा आयोग जोपर्यंत आपले काम करीत आहे तोपर्यंत आणीबाणी या विषयावर मी काहीही बोलणार नाही, हेही त्यांनी स्पष्ट केले.

**प्रश्न :** कॉंग्रेस अंतर्गत सत्तासंघर्ष कॉंग्रेसच्या आणि देशाच्या दृष्टीनेही अहितकारक आहे असे आपल्याला वाटत नाही काय ?

**उत्तर :** असा संघर्ष बरा नव्हे हे खरे असले, तरी परिस्थितीच अशी निर्माण झाली आहे की, काही काळ तरी असा संघर्ष चालणारच. ब्रह्मानंद रेड्डी यांना त्यांच्या आजच्या स्थानावरून हटविणे इष्ट नाही किंवा त्यांनी राजीनामा देण्याचीही गरज नाही, असे माझे स्पष्ट मत आहे.

**प्रश्न :** संजय गांधीबद्दल तुमचे काय मत आहे ?

**उत्तर** त्यांच्याबद्दल आपुलकी बाळगूनही स्पष्टपणे असे म्हटले पाहिजे की, सार्वजनिक जीवनामध्ये त्यांच्या मताचा पाठपुरावा करण्याचे कारण नाही.

**प्रश्न :** एका न्यायालयीन प्रकरणामध्ये तुम्ही बिर्लांचे वकील म्हणून काम पहात आहात, तुमच्या राजकीय भवितव्यावर या गोष्टीचा परिणाम होणार नाही काय ? का आपल्याला आता राजकीय भवितव्य नाही अशी तुमची खात्री झाली आहे ?

**उत्तर :** माझ्या राजकारणाचा, राजकीय भवितव्याचा आणि माझ्या व्यवसायीन कामाचा काहीही संबंध नाही. उद्या तुम्ही जर खून केलात आणि माझ्याकडे बचावासाठी आलात तर मी तुमचा वकील म्हणून उभा राहीन ! आजचे बंगालचे ॲडव्होकेट जनरल, त्यांची नेमणूक झाली त्या वेळी उद्योगपती हरिदास मुंदडा यांच्यातर्फे वकिली करीत होते. मी बिर्लांसाठी काम करतो म्हणजे माझी राजकीय मते वाऱ्यावर सोडून देतो असे नव्हे. एक वकील म्हणून माझ्याकडे येणाऱ्या पक्षकाराचे काम करणे हे माझे कर्तव्यच आहे. तसे करण्यात मी कुणावर मेहरबानी करीत नाही तर स्वत:च्या पोटापाण्याची सोय पहातो. □

## □ दारुबंदीचा खुळखुळा

दारुबंदीचा खुळखुळा अधूनमधून वाजत असतो. कधी कोणी कडवा गांधीवादी तो वाजवतो, तर कधी विनोबांच्या परंपरेमध्ये वाढलेला एखादा कार्यकर्ता कळकळीने दारुबंदीचे महात्म्य वर्णन करून सांगतो. इतके केशाला दारूच्या गुत्यात– एखादा रंगेल गादी याच विषयावर चर्चा करत मद्याचे घुटके घेतो. या चर्चेतून उमटणाऱ्या दारुबंदीच्या खुळखुळ्याचे निनाद तसे सौम्यच असतात; पण अलीकडे हा खुळखुळा वाजविला तो दस्तूर खुद्द पंतप्रधानांनी ! मग काय, चर्चा, वादविवाद यांना पेव फुटले. पंतप्रधान तर, 'या प्रश्नापायी माझे सरकार वाहून गेले तरी बेहत्तर; पण हा प्रश्न सुटावा म्हणून मी प्रयत्नशील रहाणारच !' असे म्हणू लागले. आता पंतप्रधानांनीच खुळखुळा हातात घेतल्यामुळे त्याचे झाले डमरू आणि या डमरूतून उलटसुलट निनाद उमटू लागले. इलस्ट्रेटेड वीकलीचा अगदी ताजा अंक पाहिला आहे ? त्यामध्ये या प्रश्नाची भरपूर चर्चा केली आहे. दारू पिण्याचे फायदे–तोटे, विविध राज्यांमध्ये सध्या असलेले दारुबंदीचे धोरण, गावठी दारूमुळे होणारी प्राणहानी याचा तपशील तर आहेच; त्यातल्या त्यात मला दोन गोष्टी विशेष महत्त्वाच्या वाटल्या एक... समजा, देशभर दारुबंदी झाली तर त्याचे आर्थिक परिणाम काय होतील ? आणि दुसरे... पंतप्रधानांची या प्रश्नाबाबत इतकी आग्रही भूमिका का ? या संदर्भात त्यांना काही विशेष अनुभव वगैरे आहे की काय ? या तिन्ही प्रश्नांची उत्तरे या लेखामध्ये पहावयास मिळतात. समजा, देशभर जर दारुबंदी झाली तर शासनाचे ५२० कोटी रुपयांचे नुकसान होईल केंद्रीय अर्थमंत्री एच्. एम्. पटेल म्हणतात, दारुबंदीमुळे होणारी ही आर्थिक हानी मला चांगलीच भेडसावते. हे झाले प्रत्यक्ष नुकसान. दारुबंदी आलीच तर तिच्या अमलबजावणीबाबतही जास्त कठोर धोरण स्वीकारावे लागेल म्हणजे त्या आघाडीवर खर्च वाढविणे आलेच आणि खरोखरच योग्य बंदोबस्त व्हावा असे वाटत असेल तर हा खर्च साधारणपणे ४८० कोटी रुपयांपर्यंत करावा लागेल. म्हणजे कायद्याने नीतिमत्ता शिकवण्याच्या या प्रयत्नापायी– सालिना हजार कोटी रुपयांचे नुकसान होईल. देशामध्ये दारूचे उत्पादन करणाऱ्या तीस संस्था असून त्या सालिना दहा कोटी रुपयाची दारू तयार करतात जवळजवळ दहा लाख लोक या व्यवसायामध्ये निर्मितीपासून विक्रीपर्यन्तच्या व्यवहारात गुंतले आहेत. त्यांना नवीन रोजगार उपलब्ध करून द्यावा लागेल. आधीच बेकारी थोडी, त्यात या दहा लाख उद्योगी लोकांना निरुद्योगी करण्याचा प्रपंच करून जबाबदारी वाढवून घ्यावी लागेल. विविध राज्यांची धरसोड वृत्ती केंद्राचे– दारुबंदीच्याबाबत असलेले सहानुभूतीचे धोरण यामुळे या व्यवसायावर सतत अशाश्वततेची टांगती तलवार आहे आला दिवस ढकलण्याच्या वृत्तीमुळे मद्याचा दर्जा यथातथा असतो. त्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेमध्ये भारतीय मद्य उभेच राहू शकत नाही. आता दारुबंदीचा पुरस्कार करणाऱ्यांना या साऱ्या गोष्टी माहिती नसतात असे थोडेच आहे ? पण तरीही हा खुळखुळा वाजविला जातो. आता पंतप्रधानांनी याबाबत सांगितलेला एक अनुभव मथाई यांनी आपल्या नुकत्याच प्रकाशित झालेल्या पुस्तकात नोंदला आहे. दारुबंदीच्या आग्रही भूमिकेबाबत मी मोरारजीभाईंना विचारले असता ते म्हणाले, 'त्यांच्या गावी एका तरुण माणसाने मद्य झोकून स्वत:च्या बहिणीबरोबर तिच्या इच्छेविरुद्ध शय्यासोबत केल्याचे उदाहरण माझ्या पाहण्यात आहे.' याबाबत स्वत: लेखकाने प्रतिक्रिया नोंदवली आहे. ती अशी की, कोणाही पंतप्रधानाला डॉन क्विकझोटप्रमाणे वागता येणार नाही. संपूर्ण दारुबंदीच्या पदरी संपूर्ण अपयश आल्याखेरीज रहाणार नाही. तर अशी ही दारुबंदीच्या खुळखुळ्याची कहाणी. या खुळखुळ्याचा मृदुग झाल्यामुळे निनादांची तीव्रता तिखट झाली. दारुबंदी केव्हा आणि कशी येईल ती येवो, तेथपर्यंत हा खुळखुळा अधूनमधून वापरला जाणारच की ! □

# महाराष्ट्र राज्य नाट्यस्पर्धा

## एकूण मामला निराशाजनकच

अवधूत साने

सतराव्या महाराष्ट्र राज्य, नाट्यमहोत्सवाच्या पुणे केन्द्राच्या स्पर्धेची सुरुवात दि. २२ नोव्हेंबर रोजी भरत नाट्यमदिरमध्ये झाली. स्पर्धेतील पहिल्या दिवशी थिएटर ॲकॅडमी पुणे, या सस्थेने 'फरारी' हे श्री. अशोक शहाणे व श्री मोहन गोखले यांनी नाट्य-रूपांतर केलेले नाटक सादर केले.

एक प्रतिष्ठित मध्यमवर्गीय नवरा खून करून फरारी झाला आहे, पोलिस त्याच्या पाठलागावर आहेत; तो आपल्याच घरात येऊन दिवसभर अडगळीच्या खोलीत राहतो आणि रात्री बाहेर येऊन खातो-पितो एक खुनी (नवरा असला तरी) आपण घरात लपवून ठेवला आहे यामुळे बावरलेली त्याची बायको आणि तो याच्यात भांडणाला सुरुवात होते. तो फरारी खुनी असल्याने तिला असलेली प्रतिष्ठा नाहीशी होते. ती एका खुन्याची बायको म्हणून लोक तिला हिणवतात, खोटी सहानुभूती दाखवितात. कारण ती तरुण आहे आणि मुख्य म्हणजे ती सुदर आहे. ती जिथे नोकरीला असते तिथले साहेब आणि शेजारी राहणारा, पहिल्यादा एकलकोंडा वाटणारा तरुण, तिला सहाय्य करू लागतात आणि तिच्या नवऱ्याचा संशय आणखीनच बळावतो. ती देखील नवऱ्याच्या वागण्याने वैतागते. तिच्या मनावर दडपण येते आणि त्यातच शेजारच्या अनुचे प्रेमप्रकरण. त्यामुळे ती आणखीनच धास्तावते आणि ह्या सर्व गोष्टी असह्य होऊन ती आजारी पडते. या सर्व गोष्टीना फरारी साक्षी असतो, तिला भेटायला येणारे लोक व तिला होणारा त्रास त्याला पाहवत नाही म्हणून तो पुन्हा एकदा प्रतिष्ठेन जगायचं ठरवितो आणि आपल्या नोकराचा खून करतो आणि पुन्हा नवीन जीवन जगायला लागतो. इथेच नाटक संपते.

हे नाटक पाहताना प्रेक्षकावर फारसा प्रभाव पडत नाही. नाटक पकड घेत नाही. तो (फरारी) तर कुठेच खुनी वाटत नाही. फरारीच्या भूमिकेत रवींद्र मकणी फारसा प्रभावी ठरत नाही. खरं तर नाटक त्याच्यावर आधारलेले आहे; पण त्याच्या बायकोच काम करणाऱ्या ज्ञानदा नाईक नाटकभर प्रभावी ठरतात. खुनी नवरा घरात असून बाह्य जगाला न कळता एवढंच काय पण घरातल्या नोकराला देखील कळू न देता त्याला जगवायच आणि स्वत: जगायचं. कोणाचीही मदत न घेता ह्या सर्व गोष्टी त्या आपल्या अभिनयातून चागल्या दाखवितात. शेजारच्या अनुची भूमिका करणारी हिमानी अर्जुनवाडकर देखील आपल काम उत्तम करतात. नायिकेबद्दलचे कुतूहल आणि आपलं प्रेमप्रकरण कोणालाही कळू नये म्हणून धडपड चागली वाटते. बाकीच्या कलाकारापैकी कोणीच उल्लेखनीय नाही.

पात्र बोलत असताना ते फक्त काही तरी बोलत आहेत आणि ते सवाद प्रेक्षकाना कळू नयेत म्हणून वापरण्यात आलेली कुमार गधर्वाची रेकॉर्ड कंटाळवाणी ठरते. कल्पना चागली आहे; पण तिचा उपयोग किती प्रमाणात करायचा? कितीही झालं तरी सहनशीलतेला मर्यादा असतात. नेपथ्य कथानकाला पूरक होते, दिग्दर्शनात विशेष चुणूक आढळत नाही. खरं पाहता मोहन गोखले याच दिग्दर्शन म्हटल्यावर बऱ्याच अपेक्षा होत्या; पण त्या कुठेच पूर्ण होत नाहीत. प्रकाशयोजनेचा तर घोळच होतो. नोकराची एन्ट्री–एक्झिट आणि दिवस उगवला केव्हा आणि रात्र झाली केव्हा काहीच कळत नाही. एक नवीन सच मात्र थिएटर ॲकॅडमीने उभा केला ते कौतुकास्पद आहे

महोत्सवात सादर झालेल लागोपाठ दुसरं वाईट नाटक, असच 'अशी पाखरे येती' या नाटकाबद्दल म्हणाव लागेल. हे नाटक माजी विद्यार्थी संघ सौ विमलाबाई गरवारे हायस्कूल यानी सादर केले साधिकरीत्या हे नाटक प्रेक्षकावर प्रभाव पाडू शकले नाही तरी पण त्यातील अप्पा (विकास फडणीस) आणि सरू (कु जोशी) ह्या पात्राची निवड अचूक होती. अरुण सरनाइकाचं काम करणारे निशिकांत श्रोत्री अगदीच हास्यास्पद ठरले. ते अतिशय बावरलेल्या स्थितीत रंगमंचावर वावरत होते. मुळात त्याना बहुतेक त्याची भूमिकाच कळली नसावी, असे वाटते. त्याच्या कामात सफाईदारपणा नव्हता. त्याच्या हालचाली कृत्रिम होत्या. बडाचे काम करणारा कलाकार काम व्यवस्थित करतो. नेपथ्य ठीक होते; पण पात्रासाठी एन्ट्री–एक्झिटसाठी वापरलेल्या पिवळ्या पट्ट्या खटकतात आणि तरीही पात्र चुकतात. दार लावणे–उघडणे तर प्रत्येक पात्र आपल्या मनाप्रमाणे करीत होते. ठराविक कडी त्याला नव्हतीच. प्रकाशयोजनेमध्ये खिडकीची कल्पना चागली वाटते. दिग्दर्शन सुमारच वाटते. बाकी उल्लेखनीय काही नाही.

सपदा थिएटर्सने सादर केलेली 'शाल्मली' ही कलाकृतीही सुमारच ठरली. एका अपघातात मेलेल्या सुदर तरुणीची ही कथा आहे. शाल्मली एका घाटात मोटार–अपघातात मरते आणि तिथे भूत होऊन ते घाटातून येणाऱ्या–जाणाऱ्यापैकी तीन तरुणाना दिसते. ती त्यांच्याशी मोकळेपणाने बोलते, आपल्या घरी घेऊन येते. पण ती घरात मात्र दिसत नाही; तिचा आवाज मात्र तीन तरुणांना ऐकू येत असतो. ती त्यांनाच दिसते. पण तिचे आई वडील या सर्व प्रकारात नकार देतात. कारण त्यांची पक्की खात्री असते की, शाल्मली अपघातात मेली आहे. त्याचा भुताखेतावर विश्वास नाही. त्यामुळे सगळेच घोटाळ्यात पडतात. तिसरा तरुण येतो तिथून नाटक सुरू होते. नाटकाच्या शेवटी तिघही मरतात. म्हणजे दोघं आपापसात मारामारी करून आणि तिसऱ्याला शाल्मली मारते. सवादातून

शाल्मली मेली आहे एवढेच कळते; पण पुढे तिचे खरच भूत होते का? भूत होऊन ती या तिघाना नादी लावते का? तिच्या म्हणण्याप्रमाणे ती भूत झाली नाहीय तर मग ती तिच्या आई–वडिलांना का भेटत नाही? वगैरे काही प्रश्न निर्माण होतात. त्यामुळे काहीच उलगडत नाही कारण आई वडलांचा भुताखेतांवर विश्वास नाही. तरी पण ती मेल्यानंतर भूतच झाली असली पाहिजे आणि सत्य जीवनातील तिला आपल्या सवयी अजूनही घालविता येत नाहीत म्हणून ती त्या तीन तरुणाना नादी लावते असंच म्हणावं लागेल.

शाल्मलीच्या प्रमुख भूमिकेत स्वाती देसाई चागलाच प्रभाव पाडतात त्याचा अभिनय उत्कृष्ट आहे; पण त्याचे हसणे त्यांच्या भूमिकेत आणि एकूण पडणाऱ्या प्रभावाला मारक ठरले तिसऱ्या तरुणाचं (व्यंकटेश) काम करणारे पुंडलिक पवळे पहिल्या अंकात चागल काम करतात; पण त्यांची उभं राहण्याची स्टाइल वाईट आहे. पहिल्या तरुणाचं काम करणारे भालचद्र पानसे सराईतपणे काम करतात. शाल्मलीच्या वडलांच्या भूमिकेत श्री. गोडबोले ठीक काम करतात. शेवटच्या अंकात घेतलेली मारामारी अत्यंत वाईट व हास्यपद ठरते. प्रमोद काळे तर अगदीच वाईट काम करतात. नेपथ्य कल्पनापूर्वक होते. प्रकाशयोजना नेहमीचीच होती दिग्दर्शकाने बाकीच्या पात्राकडे अजून सफाईने पहायला हवे होते.


विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य,
लेखनस्वातंत्र्य या मूलभूत
मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना
विचार करायला लावणारी
प्रभावी जीवनकथा

**मॅक्झिम गॉर्की**

**सुमती देवस्थळे**

मूल्य दहा रुपये

**राजहंस प्रकाशन**
१०२५ सदाशिव पेठ
पुणे ४११ ०३०


उदयोन्मुख नाटककाराचे नाटकावर आधारित ‘नाटक’ हे एक नव नाटक.

एक तरुण व एक तरुणी एका नाटक कंपनीत नायक-नायिकेचे काम करीत असतात. नाटकातील नायिकेचे प्रेमप्रसंग करता करता खरच एकमेकाच्या प्रेमात पडतात. त्या नाटकाचा सूत्रधार व कंत्राटदार (हा सर्व धंदे करणारा) याच्या मध्यस्थीने ते लग्न करतात; पण पुढे त्यांच्यात वाद निर्माण होतो अनिता (तरुणी) नोकरी करीत असते आणि तिचा नवरा विलास (तरुण) बिनकामाचा असतो आणि म्हणूनच त्यांच्या भाडणाला सशयाची झालर लावली जाते. कारण अनिता अजूनही नाटकातून कामं करते. नाटकाच्या तालमीनिमित्त ती आपल्या मित्राबरोबर (फडणीस) रात्री-बेरात्री फिरते. फडणीसशी तिचे अनैतिक सबंध असावेत असा विलासचा संशय आणि विलास व त्याची मैत्रीण प्रिया यांचे काही अनैतिक सबध असावेत असा अनिताचा संशय. म्हणूनच दोघेही आपले सुख मिळविण्याच्या प्रयत्नात असतात. सशयाचे रूपांतर खात्रीमध्ये होते आणि मग मत्सरातून प्रत्येकजण दुसऱ्याचा खून करण्यास प्रवृत्त होतो. त्याप्रमाणे अनिता तिघाचा खून करते. शेवटी स्वत.ला गोळी घालून घेतो आणि इथेच नाटक संपते.

जग ही एक रंगभूमी आहे असे मानून त्यावर वावरणारा प्रत्येकजण कलाकार आहे आणि तो कलाकार आपापल्या परीने आपली कैफियत मांडण्याचा आणि अंतिम सत्य जाणण्याचा निष्फळ प्रयत्न करतो आणि काहीच समजावून न घेता मरणाला सामोरा जातो. कारण तेच अंतिम सत्य असू शकेल. म्हणूनच जीवनाला शोभादर्शक यंत्र म्हटले आहे. प्रत्येकाने आपल्याला पाहिजे तसे ते फिरवावे. नियतीच या सर्वांची सूत्रधार आहे असं या नाटकातून सूचित केलं आहे.

सूत्रधाराचे काम करणारे दिलीप जनपंडित आपली भूमिका व्यवस्थितरीत्या पार पाडतात. स्मिता ओक आपल्या अभिनयकौशल्याने एकीकडे प्रेमविवाहित नवरा व दुसरीकडे आपला मित्र याच्यामध्ये झालेली एका स्त्रीची दोलायमान स्थिती उत्तम रीतीने दाखवितात. प्रिया (वासती फडणीस) काही ठिकाणी चांगल्या प्रकारे आपल्या भूमिकेतील भावना व्यक्त करतात. टीमवर्कमध्ये फडणीस (सुरेश नाईक) सामावून जातात.

दिग्दर्शनात कुठेही फारशी उणीव भासत नाही. आपापली कैफियत माडण्याची वापरण्यात आलेली पद्धत अतिशय सुरेख होती. थोडासा तोचतोचपणा येतो पण नाइलाज आहे दिलीप बदज याचे नेपथ्य सुरेख होते. झोपण्याची खोली, बैठकीची खोली, व्हराडा, खिडकी वगैरेची मांडणी कौतुकास्पद होती. साधेच पण कल्पनापूर्वक नेपथ्य असेच त्याबद्दल म्हणावे लागेल. संगीत अतिशय सुरेख. प्रसगाला आवश्यक आणि पूरक धुन वापरण्यात आल्या आणि मुख्य म्हणजे पाहिजे त्याच प्रसंगाला त्या वाजत होत्या. प्रकाशयोजना चागली होती पात्रांच्या दोलायमान स्थितीतील प्रसगांना वापरण्यात आलेली प्रकाशयोजना उल्लेखनीय होती. सजावटही व्यवस्थित होती. अशा तऱ्हेने महाराष्ट्र कामगार कल्याण यानी एक कौतुकास्पद नाट्यप्रयोग सादर केला.

**( उत्तरार्ध पुढील अंकी )**

हिंदी चित्रपट

# घरौंदा

## नवी वाट पण चाल जुनीच

**शिरीष सहस्रबुद्धे**

'घरौंदा' मी बऱ्याच उशिरा पाहिला. सुमारे महिनाभर त्याच्या प्रशस्तीचे डिंडिम ऐकून होतो. फिल्मफेअरच्या अतिचोखंदळ (ऊर्फ 'नाकझाडच्या'– हा माझ्या एका कोल्हापुरी मित्राचा शब्द.) चित्रसमीक्षकांनीसुद्धा त्याला तीन ताऱ्यांचा मानकरी ठरवून टाकल्यामुळेही लोक दचकले होते. अशा दुमदुमत्या पार्श्वभूमीवर एखादी कलाकृती पाहणं नेहमीच आनंदाचं ठरतं असं नाही. 'घरौंदा'नं मला तोच अनुभव दिला आहे. जेवढी जाहिरात आणि तारीफ केली गेली आहे तेवढा काही हा चित्रपट असामान्य, outstanding वाटत नाही, असं माझं नेहमीसारखंच स्पष्ट आणि अप्रिय मत नोंदवणं मला भागच आहे.

अर्थात हे लिहिताना एक गोष्ट मी प्रथमच मान्य करीन की, चालू हिंदी सिनेमांचा सर्वसाधारण दर्जा आणि धरमवीर किंवा अमर अकबर अंथनीसारखे गल्लाभरू लाटेतले चित्रपट यांच्याशी तुलना (करायचीच झाली आणि) केली, तर घरौंदा बऱ्याच वरच्या दर्जाचा, सुसह्य आणि नव्या धर्तीचा–नव्या शैलीचा चित्रपट ठरेल आणि याचं योग्य ते श्रेय, कथाकार डॉ. शंकर शेष, संवादलेखक गुलजार, संगीतकार जयदेव आणि मुख्य म्हणजे नवोदित दिग्दर्शक भीमसेन यांना जरूर दिलं जावं. घरौंदाचं मध्यवर्ती कथासूत्र नव्या दिशा, नव्या वाटा चोखाळणारं आहे हेही मान्य. प्रश्न आहे तो हाताळणीचा आणि प्रस्तुतीकरणाचा. हे प्रस्तुतीकरण काही तरी चमत्कारिकच, धेडगुजरी झालंय, असं मला वाटलं. म्हणजे एकीकडे भीमसेनमधला ताज्या दमाचा आणि स्वतःच्या नव्या convictions असणारा दिग्दर्शक आपली झलक अधूनमधून दाखवतो. (उदाहरण सगळ्याच गाण्यांचं 'टेकिंग' त्यातही 'मुझे प्यार तुमसे नहीं है' या गाण्याचं चित्रीकरण व प्रस्तुतीकरण.) तर दुसरीकडे हिंदी सिनेमातच शोभाव्यात अशा बालिश दृश्य–प्रसंगांनाही तोटा नाही. श्रीमंतांच्या चार बायकांनी जमून पत्ते कुटण्याचं दृश्य हे याचं एक उदाहरण. त्यातनं आपण फार काही साधलंय असा दावा भीमसेनही करू शकतीलसं वाटत नाही. कारण छाया (झरीना वहाब)ची गरिबीची पार्श्वभूमी प्रेक्षकांना अगोदरच माहित झालेली आहे. त्यात नव्यानं establish करण्यासारखं काय आहे? सुदीप (अमोल पालेकर) हा पांढरपेशा कारकून जास्त पैसे मिळविण्यासाठी रात्रीच्या वेळात म्हणे सिनेमांची पोस्टर्स चिकटविण्याचं कामही पत्करतो. पैशापेक्षाही तथाकथित अब्रू–प्रतिष्ठा मोलाची मानून ढोंगीपणानं सुद्धा, पण जिवापाड जपणाऱ्या मध्यमवर्गीय पांढरपेशाचे हे चित्रण यथार्थ म्हणता येईल काय? मोदीसाब (डॉ. लागू) हे, हार्टअटॅक येऊन जातोय तोच ताडकन उठून सिगरेट काढून पेटवितात आणि चक्क हिंडायला बाहेर पडतात, थोड्या वेळानं रेल्वेस्टेशनवरही पत्नीसह चक्कर टाकतात. हा प्रसंग तर साईबाबांच्या चमत्कारी सिनेमातच शोभावा असा आहे. मोदीसाब सुदीपला जी वागणूक देतात, तिच्यामागेही काही सुसंगत तर्काला पटेलसे तत्त्वज्ञान (theory या अर्थाने) गुलजार–भीमसेन वगैरे उभे करू शकलेले नाहीत आणि म्हणूनच घरौंदाचा शेवट हा तर्कदृष्ट्या ठिसूळ, भुसभुशीत झालेला आहे असं माझं मत बनलं. सुदीपच्या निराश मनःस्थितीतल्या एका वाक्यासरशी छायानं त्याच्यावरचं अस्सल प्रेम बाजूला ठेवून धाडकन मोदींशी विवाह करून मोकळं होणं हेही निदान माझ्या तर्कबुद्धीला व व्यवहारज्ञानाला पटेल अशा रीतीनं मांडण्यात आलेलं नाही. अर्थात तो बराचसा भावनांचा खेळ, तेव्हा मतभेदाला वाव आहेच. माणसाच्या आयुष्यात (मग ते पडद्यावर असो की प्रत्यक्षात) विसंगती नसतातच किंवा नसाव्यातच; सगळं कसं तर्कशुद्ध, सुसंगत आणि आखीव-रेखीव सरळसोट असतं किंवा असावं असा भाबडा आग्रह मी विलकूल धरणार नाही. तेव्हा अमुक एक गोष्ट तर्काला टिकली नाही की ती हिणकस असं कलेच्या प्रांतात तरी मी कधीच म्हणणार नाही. मुद्दा एवढाच की अशा विसंगती, अपघात, योगायोग हे सुद्धा आयुष्यातलेच वाटावेत. शक्य कोटीतले वाटावेत. मानवी वाटावेत. त्यांना अनाकलनीयता प्राप्त होऊ नये, चमत्कारांचं status त्यांना येऊ नये. घरौंदाच्या कथा-पटकथा-संवादांची तपासणी या निकषावर करून पाहणं उद्बोधक ठरेल. अर्थात श्रेष्ठ कलाकार हा अशा व्यावहारिकदृष्ट्या शक्याशक्य असलेल्या तथाकथित वास्तवाच्याही पलीकडे पाऊल टाकून शुद्ध कलात्मक (आणि कदाचित वरकरणी अवास्तव वाटणाऱ्या) वास्तवाचे सृजन करू शकतो हेही मला मान्यच आहे. (उदाहरणार्थ जी. ए. कुलकर्णींच्या अनेक कथा, विशेषतः रूपके असलेल्या कथा.) पण भीमसेन अजून त्या कोटीला पोचलेले नाहीत असं मी म्हटलं तर ते त्यांच्यावर अन्यायकारक नक्कीच होणार नाही, अशी आशा वाटते. शिवाय त्यांची ही पहिली निर्मिती अलीकडच्या काही लोकप्रिय बड्या दिग्दर्शकांच्या डझनांनी निघणाऱ्या उत्पादनांपेक्षा दर्जेदार आहे हेही खरंच आहे.

अमोल पालेकर, झरीना वहाब व डॉ. श्रीराम लागू यांच्या अभिनयाचा दर्जा सांगितला जातो तेवढा असामान्य मुळीच वाटला नाही आणि बडे बाबू वगळता इतर दुय्यम पात्रांकडून तर भीमसेननं अगदीच जुजबी आणि बेंगरूळ कामं करवून घेतली आहेत. मोदींच्या ऑफिसचेही भीमसेनकृत चित्रण अतिशयोक्तिपूर्ण आणि अतएव चित्राच्या (विशेषतः उत्तरार्धातील) मुराशी न जुळणारे आहे. उपेक्षित ठरलेले गुणी संगीतकार जयदेव यांचे संगीतनियोजन व भूपेंद्र–रूना लैलाची गीते हा घरौंदानं दिलेला सगळ्यात मोठा निर्विकल्प आनंद म्हणायला हवा.



## दादांचे मंत्रिमंडळ व्यापाऱ्यांना अखेर असे शरण गेले : पृष्ठ ४ वरून

तील होते. शिवाय योजनेला यशवंतराव चव्हाण यांची म्हणून ओळखली जाणारी मंडळी कडाडून विरोध करत आहेत. त्याचाही राग तिरपुडे याना आला आहे. यशवंतराव चव्हाण याना प्रतिशिवाजी म्हटले जाते. शरद पवार त्याचे मानसपुत्र मानले जातात. प्रतिशिवाजीचे मानसपुत्र म्हणून शरद पवार यांचाही उल्लेख 'बालराजे' म्हणून केला जातो. पश्चिम महाराष्ट्रातील मातब्बरांचा त्याचप्रमाणे यशवंतरावाना मानणाराचा आदिवासी योजनेला विरोध आहे म्हणून तिरपुडे या शिष्टमंडळाजवळ म्हणाले, 'त्या बाळराजांनाही सांगा, व्यापाऱ्यांचे हितसंबंध सांभाळणार असल तर आम्हाला स्वतंत्र विदर्भाची मागणी करावी लागेल! घेऊन बसा, तुम्ही तुमचा महाराष्ट्र!'

कांग्रेस सरकार पुरोगामी आहे असे म्हटले जाते तर मग आदिवासींच्या हितावर निखारे ठेवून त्यांच्या संसारावर गाढवाचे नांगर फिरवणारे निर्णय ते कसे घेते? सर्वांत वाईट गोष्ट कोणती असेल तर आदिवासींचे प्रतिनिधी म्हणून मंत्रिमंडळात बसलेले ही गोष्ट सहन कशी करतात? व्यापारी, दलाल याचा प्रभाव त्यांच्यावर एवढा कसा पडला आहे? रमेश वळवी गृहखात्याचे राज्यमंत्री आहेत. ते आदिवासी आहेत. आदिवासी आपल्याबद्दल काय बोलतात, आपला उद्धार कसा करतात हे त्यांनी 'हरून् अल्–रशिद' होऊन जरा ऐकावेच! नाही तर खात्याकडून ते माहीत करून घ्यावे. आदिवासीचा आणखी एक आक्षेप आहे. 'व्यापाऱ्यांकडून निवडणुकीसाठी पैसा हवा म्हणून सरकार व्यापाऱ्यांच्या म्हणण्याप्रमाणे वागत आहे.' योजना चालू करण्याचा निर्णय कायम केला नाही तर आम्ही सत्याग्रह करू, असेही मोरमारे यांनी सांगितले.

व्यापाऱ्यांच्या तोंडी आदिवासीना देणारा निर्णय सरकाने घेतला; परतु त्याविरुद्ध आवाज उठवण्याचे जनता पक्ष मनातही आणत नाही आदिवासींच्या या प्रश्नाकडे लक्ष द्यावे असे जनता पक्षाला वाटतही नाही. कांग्रेस व जनता पक्षाचा तोंडावळा फारसा वेगळा नाही याचेच हे बोलके उदाहरण आहे तिरपुडे याना आदिवासीविषयी खरोखरच कळवळा असेल तर त्यानी राजीनामा देऊनच आदिवासीना फायदा करून देणाऱ्या योजनेचा पाठपुरावा करावा. भेटीला आलेल्या शिष्टमडळाजवळ अशी भाषा बोलून प्रकरण धसास लागणार नाही. व्यापाऱ्यांकडून पैसे गोळा करण्याच्या नादात आदिवासींचा पाठिंबा कांग्रेस गमावत आहे! कांग्रेसला हे महाग पडेल! हे कळेल तेव्हा वेळ निघून गेलेली असेल! ☐


चवदार तळे सत्याग्रह, मनुस्मृतिदहन या घटनांची सविस्तर माहिती

# महाडचा मुक्तिसंग्राम

लेखक

प्रा. रा. म. बिवलकर । प्रा. झुंबरलाल कांबळे

किंमत वीस रुपये

प्रस्तावना : प्रा. नरहर कुरुंदकर

पुरस्कार : श्री. भय्यासाहेब आंबेडकर

राजहंस प्रकाशन । १०२५ सदाशिव पेठ । नागनाथ पाराजवळ । पुणे ३०

[टॉलस्टॉय पुस्तक योजनेतील ग्राहकांनी वरील पुस्तक व 'आर् डॉक्युमेंट' ही कादंबरी कार्यालयातून घेऊन जावी.]